# गुन्हयाचा प्रकार :- दुहेरी खुन

# ( गुप्तधनासाठी गळा कापुन खुन )

**पोलीस स्टेशन :- किल्लारी पोलीस ठाणे**

**तालुका :- किल्लारी जिल्हा :- लातुर**

**तपासी अंमलदार :- सहा.पोलीस निरीक्षक श्री.अनंत्रे**

## गुन्हयाची प्राथमिक माहीती :-

१) पोलीस स्टेशन :- किल्लारी पोलीस ठाणे, किल्लारी, जि.लातुर
गुरनं. ८१ /२०११ , भादविक.३०२, २०१, ३४.

२) फिर्यादी :- विलास बाबुराव पांचाळ, धंदा- शेती रा.पांचाळ माळ,नणंद, ताो.किल्लारी, जि.लातुर

३) आरोपी :- १) सुभाष गणेश गिर ( महाराज ) रा.नणंद, ताो. किल्लारी, जि.लातुर
२) सुभाष विरभद्रप्पा कुभार, रा. बस्वकल्याण, जि.बिदर, कर्नाटक
३) नंदकिशोर बालरेड्डी कोलथाने,रा.सस्तापुर,(बस्व कल्याण)जि. बिदर, राज्य कर्नाटक.

४) पिडीत :- १) विठ्ठल कांबळे
२) सुरेखा शिवराज गोकुळे

५) अ.घ.ता.वे. :- दिनांक २३/१०/२०११ रोजी

ठिकाण :- १) समाधान बाबुराव पांचाळ यांचे शेतातील विहीरीत, पांचाळमाळ,नणंद, ताो.किल्लारी, जि.लातुर
२) लघु पाट बंधारे विभागाच्या तलावाच्या बांधा वरील पाणी सोडण्याचे चिमणी मध्ये, नणंद, ताो. किल्लारी, जि.लातुर

६) थोडक्यात हकीकत :- यातील मयत यांना कोणीतरी अज्ञात आरोपीताने अज्ञात कारणांसाठी त्याचे डोके, व दोन्ही हात हे कोणत्या तरी तिक्ष्ण हत्याराने धडा वेगळे करुन डोके व हात असे व धड हे वेगवेगळया ठिकाणी टाकुन दिले. तसेच अज्ञात महिलेला अज्ञात कारणांसाठी, तिक्ष्ण हत्याराने गळा कापुन, मुंडके धडापासुन वेगळे करुन खुन करुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

७) दोषारोप :- ०७ / २०१२ दिनांक ३१ /०१ /२०१२

८) कोर्टाचा निकाल :- मा.सेशन कोर्ट, लातुर यांनी आरोपी १) सुभाष गणेश गिर ( महाराज ) यास भादवि.कलम ३०२ प्रमाणे जन्मठेप व ४०० रुपये दंङ दंडे न भरल्यास ५ महीने कैद व भादवि.कलम २०१ प्रमाणे १ वर्ष कैद व १०० रुपये दंड . दंड न भरल्यास १ महीना कैद अशी शिक्षा ठोठावली. तसेच आरोपी २) सुभाष विरभद्रप्पा कुभार व ३) नंदकिशोर बालरेड्डी कोलथाने यांची निर्दोष मुक्तता केली.

## तपासाचा आराखडा / क्रमवारी :-

१) किल्लारी पोलीस ठाण्यात नणंद गावातील तंटा मुक्तीचे अध्यक्ष श्री.तानाजी शामराव पाटील यांनी फोनद्वारे माहीती दिली कि, समाधान बाबुराव पांचाळ यांचे शेतातील विहीरीत पोत्याचे गाठुडे तरंगत असुन त्यातुन मनुष्याचा पाय बाहेर आला आहे,असे कळविल्याने पोलीस तपासी अंमलदार यांनी स्टेशन डायरीला नोंद केली.

२) पोलीस तपासी अंमलदार हे तपास पथकासह घटनास्थळावर पोहोचल्यानंतर घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली असता,विहीरीतील पाण्यावर एका पोत्याचे गाठुडयात मानसाचे प्रेत व त्याचा एक पाय बाहेर अश्या अवस्थेत मिळुन आले.

३) पोलीस तपासी अधिकारी यांनी घटनास्थळावरुनच उप विभागिय पोलीस अधिकारी श्री.पंडीत नवसारे, व अप्पर पोलीस अधिक्षक श्री.श्रीकृष्ण कोकाटे यांना फोनद्वारे माहीती दिली.

४) पोलीस व साक्षीदार यांनी विहीरीतले पोत्याचे गाठुडे हे बाजेच्या सहाय्याने विहीरीच्या बाहेर काढले प्रेताची परिस्थिती बघितल्यानंतर वैदयकीय अधिकारी श्रीमती पठाण, प्राथमिक आरोग्य केंद्र, लामजना यांना घटनास्थळावर येवुन प्रेताचे पोस्ट मार्टम करण्याबाबत विनंती केली.

५) त्या दरम्यान स्टेशन डायरी नोंद वरुन प्रेताचे दिसती परिस्थितीचा दोन पंचासमक्ष इन्कवेस्ट पंचनामा करण्यात आला.पाण्यात प्रेत असल्याने विहीरीतील जलचर प्राण्यांनी काही ठिकाणची प्रेताची चामडी खाल्लेली दिसत असल्याने इन्कवेस्ट पंचनाम्यात तसा उल्लेख करण्यात आला.तसेच घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.

६) मयताचे प्रेताचा वैदयकीय अधिकारी यांनी त्यांचे स्टॉफसह हजर राहुन जागेवरच पोस्ट मार्टेम केले.व मयताचे मरणाबाबतचे प्राथमिक अहवाल दिला की, Body is highly decomposed, the exact cause of death can not be given. However viscera is preserved for C.A.असा अभिप्राय दिला. मयताचे फोटो घेण्यात आले.मयताचे शरीर कुजल्याने व ठेवण्याचे स्थितीत नसल्याने ग्रामपंचायत नणंद यांना सदर प्रेताचे अंत्यविधीचे पत्र देवुन वनविभागाच्या वनिकरणात जेसीबीच्या सहाय्याने खड्डा खणुन अंत्यविधी करण्यात आला.

७) सदर गुन्हयाबाबत विलास बाबुराव पांचाळ यांनी फिर्याद दिल्याने पोलीस स्टेशनला गु र नं.८१/११ भादवि.कलम ३०२, २०१,३४ अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. साक्षिदारांना विचारपुस करुन जबाब नोंदविण्यात आले.आजुबाजुच्या गावामध्ये सलग तीन ते चार दिवस दवंडीद्वारे माहीती देऊन मयताची ओळख पटविण्याचा व गुन्हयाशी संबंधीत माहीती मिळविण्याचा प्रयत्न केला. तसेच स्थानिक वर्तमानपत्रात सदर घटनेबाबत बातमी देण्यात आली.

८) गुन्हयाचे घटनास्थळाचा डम्प डाटा काढयासाठी सायबर सेलला कळविण्यात आले.घटनास्थळी पुन्हा येऊन मयताचे डोके व हात शोधण्याचा प्रयत्न केला.त्यासाठी विहीरीतले पाणी इंजिन लावुन काढले असता मयताचे डोके व हात मिळुन आले नाही. मयताची ओळख काढणे साठी सर्व जिल्हयात व जिल्हा अंतर्गत पोलीस स्टेशनला तपासयादया पाठविण्यात आल्या.

९) सिमे लगतच्या गावामध्ये, कर्नाटक राज्यात जाऊन हरविलेल्या व्यक्तींचे नोंदीबाबत मयताचे फोटो व तपासयादी दाखवुन माहीती घेतली.परंतु काही एक माहीती मिळुन आली नाही.

१०) सदर गुन्हयाचे तपासात असतांना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.हिरमुखे यांनी नणंद जवळील तलावाचे चिमणीमध्ये एक स्त्रीचे प्रेत पाण्यात तरंगत असल्याचे कळविले वरुन पोलीस अधिकारी स्टाफसह घटनास्थळी हजर झाले.

११) अशा परिस्थितीत प्रेत बाहेर काढणे शक्य नसल्याने पोलीस अधिकारी यांनी व पाटबंधारे विभागाचे अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली लोकांच्या मदतीने चिमणीस एकाबाजुने छिद्र पाडुन प्रेत काढण्यात आले.ते प्रेत विवस्त्र अवस्थेत मुंडके विना होते.एक पाय घोटयात लहान होता.प्रेताचे इन्कवेस्ट पंचनामा करण्यात आला. भरमशेटे राजकुमार रा. गडीगौडगांव, ताा. बस्वकल्याण,जि.बिदर,कर्नाटक हे त्यांचे मुलीस नणंद येथे सोडण्यास आले असता, त्यांनी वरील प्रेत ओळखुन सांगितले कि,मयत ही सुरेखा शिवराज गोकुळे हीचे असुन ती दिनांक १८/१०/११ पासुन बेपत्ता असल्याचे सांगितले.त्यावरुन मयताची बहीण कमळाबाई गुरुनाथप्पा सुकणा व भाऊ- चंद्रकांतशरणप्पा शेटे यांना फोनकरुन बोलाविले व त्यांनी प्रेत पाहुन व ओळखुन ते त्यांची बहीण सुरेखा शिवराज गोकुळे हीचे असल्याचे ओळखले.

१२) वैद्यकीय अधिकारी श्री.पेंढारकर, प्राथमिक आरोग्य केंद्र, लामजना यांना विनंती केल्याने त्यांनी मयताचे घटनास्थळीच पोस्टमार्टम करुन अहवाल दिला.अप्पर पोलीस अधिक्षक श्री. कोकाटे व उप विभागिय पोलीस अधिकारी श्री.नवसारे यांनी घटनास्थळी येऊन तपासा बाबत सुचना दिल्या. मयताचे मुंडके नसल्याने त्यांनी प्रेत ताब्यात घेण्यास नकार दिला. त्यामुळे वनविभागाच्या जंगलात खड्डा खणुन प्रेताचा अंत्यविधी करण्यात आला.मयताचे अंगावरील कपडे तपासकामी जप्त करण्यात आले.

१३) मयताचे नातेवाईकांना विचारपुस केली असता मयत सुरेखा ही विठ्ठल कांबळे यांचे सोबत बस्वकल्याण, जि. बिदर, कर्नाटक येथे राहत होती व ते दोघेही बेपत्ता आहेत, अशी माहीती दिली.त्या वरुन बस्वकल्याण येथिल ॲड. भास्करराव कांबळे यांना फोन करुन किल्लारी बोलाविले वरुन मयत पुरुषाचे फोटो पाहुन ते त्यांचे वडीलच असल्याची शक्यता व्यक्त केली. त्यांचे वडीलांबाबत विचारपुस करुन तसा त्यांचा सविस्तर जबाब नोंदविला.

१४) मयत विठ्ठल कांबळे व सुरेखा गोकुळे यांचे मोबाईलचे CDR व घटनास्थळाचा डम्प डाटा हस्तगत केला असता विठ्ठल कांबळे यांचे मोबाईलचे IMEI.च्या मोबाईल हॅण्डसेट मध्ये सुभाष गणेश गिर रा. नणंद यांचे पत्नीच्या नावे असलेले,वेगवेगळया नंबरचे दोन सिम कार्ड वापरल्याचे निष्पण्ण झाले.

१५) गून्हयातील संशयीत आरोपी सुभाष गणेश गिर (महाराज) यास पोलीस स्टेशनला आणुन त्यास विश्वासात घेवुन विचारपुस केली असता,त्याने गुन्हा कबुल केला.तसेच गुन्हयात १) सुभाष विरभद्रप्पा कुंभार रा. बस्वकल्याण व २) नंदकिशोर बाल रेड्डी कोलथाने रा. सस्तापुर यांचेसह तांदुळ ओढवुन गुप्तधन मिळवण्यासाठी पुरुष व स्त्रिचे मुंडक्याची पुजा करण्याची आवश्यकता वाटल्याने आम्ही त्यांचे मुंडके कापुन त्यांचा खुन केल्याचे कबुल केले.आरोपी सुभाष गिर यास सोबत घेवुन इतर दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांना गुन्हयात अटक केली. त्याबाबत आरोपींनी केलेल्या गुन्हयाचे कारण बाबत वरिष्ठ अधिकारी यांना दुरध्वनीद्वारे माहीती दिली.

१६) दुसरे दिवशी आरोपीतांनी मयत पुरुष विठ्ठल कांबळे व स्त्रि सुरेखा गोकुळे यांचे मुंडके काढुन देण्याची तयारी दर्शविल्याने भा.पु.का.क.२७ प्रमाणे दोन पंचासमक्ष आरोपीतांचे निवेदन व पंचनामा करुन दोन्हींचे मुंडके,धारदार सुरी तसेच त्यांचे अंगावरचे घटनेच्या वेळचे कपडे असे वेगवेगळया ठिकाणा वरुन जप्त करण्यात आले.वैद्यकीय अधिकारी यांना जागेवरच बोलावुन पोस्ट मार्टम करण्यात आले.त्यांचे DNA सॅम्पल काढुन घेण्यात आले.नमुद दोन्ही घटनास्थळांचा वेगवेगळा पंचनामा करण्यात आला.मयताचे मुंडक्यांचे, व घटनास्थळावरुन जप्तकेलेले वस्तुंचे वेगवेगळे फोटो काढण्यात आले. मयताचे नातेवाईकांना प्राथमिक आरोग्य केंद्र येथे बोलावुन मयताचे मुंडके दाखविण्यात आले.ते विठ्ठल

कांबळे व सुरेखा गोकुळे यांचे मुंडके असल्याचे त्यांचे नातेवाईकांनी पाहुन ओळखल्यानंतर दोन्ही मुंडक्यांचे वनविभागाच्या जंगलात खड्डा करुन पुरुन त्यांची विल्हेवाट लावण्यात आली.

१७) तपासादरम्यान जप्त केलेल्या वस्तु CA अहवालासाठी प्रोदशिक न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, औरंगाबाद येथे व DNA सॅम्पल न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, मुंबई येथे पाठविण्यात आले.आरोपीतां कडुन मोबाई हॅण्डसेट, गुन्हा करते वेळी त्यांचे अंगावरचे कपडे, पंचासमक्ष जप्त करण्यात आले.मयत सुरेखा हिचे कानातील झुमके आरोपीतांनी ज्या सोनाराला विकले होते, त्या सोनाराकडुन पंचासमक्ष जप्त करण्यात आले.

१८) आरोपी हे शेवटी मयतासोबत बस स्टॅण्डवर बसलेले असतांना ज्या साक्षिदारांनी पाहीले होते, त्या साक्षिदारांचे जबाब घेण्यात आले.आरोपी विरुद्ध भरपुर पुरावा उपलब्ध झाल्याने त्यांचे विरुद्ध भादवि.क. ३०२,२०१,३४ प्रमाणे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले

१९) दोषारोप :- ०७ / २०१२ दिनांक ३० / ०१ / २०१२

**कोर्टाचा निकाल** :- :- मा.सेशन कोर्ट, लातुर यांनी आरोपी १) सुभाष गणेश गिर (महाराज) यास भादवि.कलम ३०२ प्रमाणे **जन्मठेप** व ४०० रुपये दंड, व दंड न भरल्यास ५ महीने कैद व भादवि.कलम २०१ प्रमाणे १ वर्ष कैद व १०० रुपये दंड . दंड न भरल्यास १ महीना कैद अशी **शिक्षा ठोठावली.**

तसेच आरोपी क्रमांक २) सुभाष विरभद्रप्पा कुभार व ३) नंदकिशोर बालरेड्डी कोलथाने यांची **निर्दोष मुक्तता केली.**

## पुराव्याचे स्वरूप :-

१ ) साक्षिदार / तोंडी पुरावा Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब.

फिर्याद :- विलास बाबुराव पांचाळ याची फिर्याद.

मयताचे नातेवाईक, घटनास्थळी हजर असलेले साक्षीदारांचे जबाब

इन्कवेस्ट पंचनामे , घटनास्थळ पंचनामे, आरोपीतांचे कपडे जप्ती पंचनामे, दागिणे व इतर वस्तु जप्त करतांना उपस्थितीत असलेले सर्व पंच.

मयतांना आरोपीतासोबत शेवटचे पाहणारे साक्षीदारांचे जबाब.

२) कागदपत्रीय पुरावा

PM नोट्सः- पोस्ट मार्टम करणारे वैदयकीय अधिकारी यांनी तयार केलेली.

घटनास्थळावरील फोटो.

मोबाईलचे C D R रेकॉर्ड.

CA अहवाल

DNA अहवाल.

३) इतर पुरावे. :- कॅलेंडर ऑफ इव्हीडंस ( आरोपीताचा पुरावा तक्ता )

| अ क्र. | आरोपीताचे नाव | आरोपीचा गुन्हयातील सहभाग / कृती | आरोपीविरूद्ध पुरावा |
|---|---|---|---|
| १.<br><br>२.<br><br>३. | सुभाष गणेश गिर ( महाराज )<br><br>सुभाष विरभद्रप्पा कुभार<br><br>नंदकिशोर बालरेड्डी कोलथाने | विठ्ठल कांबळे व सुरेखा शिवराज गोकुळे यांना इतर दोन आरोपीतांचे मदतीने तांदुळ उडवुन गुप्तधन मिळविण्याच्या लालसेपोटी त्यांचे मुंडके कापुन धडावेगळे करुन धड व मुंडके यांची वेगवेगळया ठिकाणी विल्हेवाट लावुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. | १. आरोपीतांचे कपडे जप्ती पंचनामे, दागिणे व इतर वस्तु जप्त केलेले पंचनामे<br>२. मोबाईलचे C D R रेकॉर्ड.<br>३. CA व DNA अहवाल. |

## गुन्हयाची सुनावणी प्रक्रीया :-

घटनेदरम्यान प्रत्यक्षदर्शी साक्षिदार नसल्याने केस वस्तुजन्य पुरावे व परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारीत आहे.

मयत विठ्ठल कांबळे याचे मोबाईलचे आय.एम.ई.आय.नंबर वरुन त्यांचे मोबाईलमध्ये कोणत्या कंपनीचे सिम कार्ड कोण वापरीत आहे, यांचे कॉल डिटेल्स रेकॉर्ड वरुन आरोपीतांपर्यंत पोहोचता आले. मोबाईल कंपन्यांकडुन प्राप्त सीडीआर रिपोर्ट संबंधित कंपन्यांकडुन प्रमाणित करुन घेतले.

दोन्ही प्रेताचे घटनास्थळी शवविच्छेदन करणारे डॉक्टरांनी मयताचे प्रेताची त्या वेळची परिस्थिती व त्यांचे मरणाचे कारणांबाबत पोस्टमार्टम नोट्स मध्ये नमुद केले.

केस मधिल साक्षिदार, मयताचे नातेवाईक, पंचनाम्यातील पंच, मयतास शेवटी बघणारे साक्षिदार यांची साक्ष, भौतिक पुरावे, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळेतील तंत्रज्ञांचे अहवाल व त्यांची साक्ष महत्त्वाची ठरली.

## तपासातील उणीवा दुर करण्यासाठी / मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना

- पांचाळ माळ शेतातील विहीरीत पोत्यामध्ये गाठुडयात मयत विठ्ठल कांबळे यांचे प्रेत तरंगत होते. सदरची विहीर २५ फुट व्यासाची व २४ फुट खोलीची १४ फुट पाणी असलेली बांधलेली नाही. गाठुडे विहीरी बाहेर काढणेस अडचण निर्माण झाली. त्यामुळे तपासात अडथळा निर्माण झाला.

**उपाय योजना** :- विहीरीत सोल बांधुन बाज सोडुन बाजेच्या सहाय्याने साक्षिदार व पोलीसांच्या मदतीने पोत्यांचे गाठुडे बाहेर काढले. त्या नंतर वैद्यकीय अधिकारी यांना घटनास्थळावर बोलावुन घेवुन जागेवरच प्रेताचे पोस्ट मार्टम करण्यात आले.

## तपासातील महत्त्वाचे मुद्ये / सबळ मुद्ये

१ ) मयत विठ्ठल कांबळे याचे मोबाईल कोण व्यक्ती वापरत आहे ? या बाबत त्यांचे मोबाईलचे IMEI नंबर वरुन मोबाईल वापरत असलेल्या इसमाचा कॉल डिटेल्स रेकॉर्ड काढुन आरोपीताचा शोध घेण्यात आला .

२ ) आरोपीतांना अटक केल्यानंतर त्यांनी दोन्ही मयत व्यक्तींना का मारले, याबाबत भा.पु.का.क. २७ प्रमाणे दिलेले निवेदन, मयतांचा खुन केल्यानंतर त्यांच शिर, हात धडा वेगळे करुन पुरुन ठेवले त्या ठिकाणचा केलेला मेमोरंडम पंचनामा

३ ) न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळेतिल तंज्ञज्ञ, पोस्ट मार्टम करणारे वैद्यकीय अधिकारी यांचे अहवाल.

४ ) केस चालु असतांना आरोपीच्या नातेवाईकांनी साक्षिदारांवर दबाव आणला. तपासी अंमलदार यांनी तात्कालीन पोलीस अधिक्षक यांचे परवानगीने स्वत: हजर राहुन साक्षिदारांचे लक्ष विचलीत होवु दिले नाही. तसेच साक्षिदार फितुर (होस्टाईल ) होणार नाहीत याची तपासी अंमलदार यांनी जातीने काळजी घेतली.

## तपासाचे विश्लेषण :- सुधारण्यासाठी सुचना :

१) चोरुन नेलेल्या मोबाईलचे CDR, SDR , TOWER LOCATION, ची माहीती संबंधित मोबाईल कंपनी कडुन मागविण्यात आल्या नंतर कंपनीचे नोडल अधिकारी यांचे कडुन CDR, SDR, IMEI. NO.,TOWER LOCATION, चे प्रमाणपत्र भारतीय पुरावा कायदा कलम ६५ ( ब ) प्रमाणे घेणे आवश्यक आहे

२) गंभीर स्वरुपाचे गुन्हयात सरकारी पंच घेण्यात यावे. त्यामुळे दोषसिद्धिचे प्रमाण वाढते.

३) मयताचे अंगावरील कपडे जप्ती पंचनाम्यात रक्ताचे डाग कोठे आहेत, त्यांचे आकारमान, मार्कींग करणे गरजेचे आहे.

४) इन्कवेस्ट पंचनाम्यात जखमांचे प्रकार, स्वरुप तसेच मृत्युचे कारण त्रोटक स्वरुपात लिहु नये.

## तपास :-

१) किल्लारी पोलीस ठाण्यात नणंद गावातील तंटा मुक्ती समितीचे अध्यक्ष श्री.तानाजी शामराव पाटील यांनी समाधान बाबुराव पांचाळ यांचे शेतातील विहीरीत पोत्याचे गाठुडे तरंगत असुन त्यातुन मानसाचा एक पाय बाहेर आला आहे,असे फोनद्वारे कळविल्याने तपासी अंमलदार यांनी स्टेशन डायरीला नोंद करून ते स्टॉफसह घटनास्थळावर पोहोचले.

२) पोलीस तपासी अधिकारी यांनी घटनास्थळावरुनच उप विभागिय पोलीस अधिकारी श्री. नवसारे, व अप्पर पोलीस अधिक्षक श्री.श्रीकृष्ण कोकाटे यांना फोनद्वारे माहीती दिली.

३) स्टेशन डायरी नोंद वरुन प्रेताचे दिसती परिस्थितीचा पंचासमक्ष इन्कवेस्ट पंचनामा करण्यात आला.तसेच घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.

४) मयताचे प्रेताचा वैदयकीय अधिकारी यांनी घटनास्थळावर पोस्ट मार्टेम केले.मयताचे फोटो घेण्यात आले.मयताचे शरीर कुजल्याने व ठेवण्याचे स्थितीत नसल्याने अंत्यविधी करण्यात आला.

५) विलास बाबुराव पांचाळ यांनी फिर्याद दिल्याने गुरनं.८१/११ भादवि.कलम ३०२, २०१, ३४ प्रमाणे अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. साक्षिदारांना विचारपुस करुन त्यांचे जबाब नोंदविले. आजुबाजुच्या गावामध्ये सलग तीन ते चार दिवस दवंडी द्वारे मयताची ओळख पटविण्याचा व माहीती मिळविण्याचा प्रयत्न केला.तसेच स्थानिक वर्तमानपत्रात बातमी दिली.

६) गुन्हयाचे घटनास्थळाचा डम्प डाटा सायबर सेल मार्फत काढयासाठी सांगुन मयताचे डोके व हात शोधण्यासाठी विहीरीतले पाणी इंजिन लावुन काढले.मयताचे डोके व हात मिळुन आले नाही. मयताची ओळख काढणे साठी तपासयादया पाठविण्यात आल्या.

७) गुन्हयाचे तपासात असतांना गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.हिरमुखे यांनी माहीती दिली की, नणंद जवळील तलावाचे चिमणी मध्ये एक स्त्री जातीचे प्रेत पाण्यात तरंगत असुन त्यातुन दुर्गंधी सुटल्याचे कळविले वरुन पोलीस अधिकारी स्टाफसह घटनास्थळी हजर झाले.

८) घटनास्थळावरुन अशा परिस्थितीत प्रेत बाहेर काढणे शक्य नसल्याने लोकांच्या मदतीने चिमणीस एका बाजुने छिद्र पाडुन त्यातुन प्रेत बाहेर काढण्यात आले.मयताचे माने पासुनच मुंडके नव्हते. अंगावर साडी नव्हती.एक पाय घोटयात लहान होता.प्रेताचे दिसते परिस्थितीचा इन्कवेस्ट पंचनामा करण्यात आला. भरमशेटे राजकुमार प्रेत ओळखुन सांगितले कि,मयत ही सुरेखा शिवराज गोकुळे ही १८/१०/११ पासुन बेपत्ता असल्याचे सांगितल्यावरुन मयताचे बहीण - कमळाबाई गुरुनाथप्पा सुकणा व भाऊ-चंद्रकांत शरणप्पा शेटे यांना फोन करुन बोलाविले.त्यांनी प्रेत पाहुन ते त्यांची बहीण सुरेखा शिवराज गोकुळे हीचे असल्याचे ओळखले.

९) डॉक्टरांनी घटनास्थळीच पोस्टमार्टम करुन अहवाल दिला.मयताचे मुंडके नसल्याने नातेवाईकांनी प्रेत ताब्यात घेण्यास नकार दिला. त्यामुळे प्रेताचा अंत्यविधी करण्यात आला.मयताचे अंगावरील कपडे तपासकामी जप्त करण्यात आले.

१०) मयत विठ्ठल कांबळे व सुरेखा गोकुळे यांचे मोबाईलचे सीडीआर व घटनास्थळाचा डम्प डाटा हस्तगत केला.विठ्ठल कांबळे यांचे मोबाईलमध्ये सुभाष गणेश गिर रा.नणंद यांची पत्नीच्या नावे असलेले,वेगवेगळया नंबरचे दोन सिम कार्ड वापरत असल्याचे आढळुन आले.

११) आरोपी सुभाष गणेश गिर (महाराज) यास पो.स्टे.ला आणुन विचारपुस केली.त्याने गुन्हा कबुल केला.तसेच सदर गुन्हयात १) सुभाष विरभद्रप्पा कुंभार २) नंदकिशोर बाल रेड्डी यांचेसह तांदुळ ओढवुन गुप्तधन मिळवण्यासाठी त्यांचे मुंडके कापुन त्यांचा खुन केल्याचे कबुल केले. सुभाष गिर यास व इतर दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांना गुन्हयात अटक केली. आरोपीतांना अटक केल्याचे व त्यांनी गुन्हा कबुल करुन आरोपींनी केलेल्या गुन्हयाचे कारण बाबत वरिष्ठ अधिकारी यांना दुरध्वनी द्वारे माहीती दिली.

१२) दुसरे दिवशी आरोपीतांनी मयत पुरुष विठ्ठल कांबळे व स्त्रि सुरेखा गोकुळे यांचे मुंडके भारतीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे दोन पंचासमक्ष आरोपीतांचे निवेदन व पंचनामा करुन दोन्हींचे मुंडके, धारदार सुरी तसेच त्यांचे अंगावरचे त्या वेळचे कपडे असे वेगवेगळया ठिकाणा वरुन जप्त करण्यात आले.डॉक्टरांनी जागेवरच पोस्ट मार्टम करण्यात आले.त्यांचे DNA सॅम्पल काढुन घेण्यात आले.दोन्ही घटनास्थळांचा वेगवेगळा पंचनामा करण्यात आला. मयताचे मुंडक्यांचे, व घटनास्थळावरुन जप्त केलेले वस्तुंचे वेगवेगळे फोटो काढण्यात आले. मयताचे नातेवाईकांना मयताचे मुंडके दाखविण्यात आले.ते विठ्ठल कांबळे व सुरेखा गोकुळे यांचे मुंडके असल्याचे त्यांचे नातेवाईकांनी पाहुन ओळखले.

१३) तपास दरम्यान जप्त केलेल्या वस्तु CA अहवालासाठी औरंगाबाद येथे व DNA सॅम्पल मुंबई येथे पाठविण्यात आला.आरोपीतां कडुन मोबाई हॅण्डसेट, गुन्हा करते वेळी त्यांचे अंगावरचे कपडे, पंचासमक्ष जप्त करण्यात आले.मयत सुरेखा हिचे कानातील झुमके आरोपीतांनी ज्या सोनाराला विकली होती त्या सोनाराकडुन पंचासमक्ष जप्त करण्यात आले.आरोपी हे शेवटी मयता सोबत बस टॅण्ड व इतर बसलेले असतांना साक्षिदारांनी पाहीले होते, त्या साक्षिदारांचे जबाब घेण्यात आले.

# गुन्हयाचा प्रकार :- खुन

**पोलीस स्टेशन :- सिव्हील लाईन पोलीस ठाणे**

**तालुका :- अकोला जिल्हा :- अकोला**

**तपासी अंमलदार :- १) पोलीस निरीक्षक श्री.शेख.**

**२) पोलीस निरीक्षक श्री गायकवाड.**

## गुन्हयाची प्राथमिक माहीती :-

१) पोलीस स्टेशन :- सिव्हिल लाईन,अकोला
गुरनं.५८९/२०००, क.३०२,२०१,१२० ब, ४६८,४७१,३६४ भा.दं.वि.

२) फिर्यादी :-सौ.कौशल्याबाई यादव नावकार, वय ४०, धंदा- घरकाम, रा.हनुमाननगर, लहान उमरी, अकोला, जि.अकोला.

३) आरोपी :- १) अजय गालट
२) बाजीराव राठोड
३) सुभाष झोपे
४) सुभाष लढ्ढा
५) सुदेश माहेश्वरी

४) पिडीत :- यादव शंकर नावकार

५) अ.घ.ता.वे. :- दिनांक ०३/०९/२००० रोजी सकाळी ०८ : ०० वा.
ठिकाण :- लहान उमरी ,अकोला.

६) थोडक्यात हकीकत :- फिा.चे पती हरविलेबाबत पो.स्टे.सिव्हिल लाईन, अकोला येथे मिसिंग दाखल केली. फिर्यादी हया एक दिवस त्यांचे शेतावर गेल्या असता त्याना समजले कि, त्यांचे शेत विकले गेले आहे. त्याबाबत त्यांनी लॅण्ड रेकॉर्ड ऑफीसला जावुन खात्री केली असता, त्यांचे पतीचे, शेतीमुळेच अपहरण करण्यात आल्याचे लक्षात आल्याने त्यांचे फिर्यादी वरुन पो.स्टे.ला गुरन.५८९/२००० भा.दं.वि.क.३६४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.आरोपी नं.१ याने मयताचे बनावट हस्ताक्षर व अंगठा करून बनावट मुखत्यार पत्र (पॉवर ऑफ ॲटर्नी) स्वतःचे नावे बनवुन आरोपी नं.२ चे मदतीने आरोपी नं.३ ते ५ यांचे सोबत शेत विक्रीचा व्यवहार करण्यासाठी मयताचे अपहरण करून खुन केला.

७) कोर्टाचा निकाल :- १ ) सेशन कोर्ट, अकोला यांनी मुख्य आरोपी अजय गालट यास फाशीची शिक्षा व इतर ३ आरोपी- सुभाष झोपे, सुभाष लढ्ढा, व सुदेश माहेश्वरी यांना जन्मठेप व आरोपी बाजीराव राठोड यांस दोन वर्ष शिक्षा सुनावली.

२) मा. उच्च न्यायालय, नागपुर यांनी मुख्य आरोपी अजय गालट यास आजन्म कारावास व इतर तीन आरोपी यांना निर्दोष सोडले.

३) मा.सर्वोच्च्य न्यायालय, नवी दिल्ली यांनी मुख्य आरोपी अजय गालट यांस आजन्म कारावासाची शिक्षा दिली आहे.

## तक्रार / फिर्यादीची थोडक्यात हकीकत :-

४) फिर्यादी सौ.कौशल्याबाई यादव नावकार,वय ४० वर्ष,धंदा घरकाम,रा.हनुमान नगर,लहान उमरी, अकोला, जि.अकोला यांनी पती यादव शंकर नावकार हे दि.०३/९/२००० रोजी सकाळी ०८ : ०० वा.अर्ध्या तासात घरी येतो असे सांगुन बाहेर निघुन गेले.त्यांचे शेजारी राहणारे साक्षिदाराकडे वेगवेगळया दिवशी दुरध्वनी आले कि,मी शिर्डीला,पंढरपुरला जात आहे,तेथुन महाराजां सोबत पशु पतीनाथ येथे जात आहे, एक महीना परत यायला लागेल,असे सांगितले. काही दिवसानंतर फिर्यादीस पत्र प्राप्त झाले कि, मी पशुपतीनाथ येथे जात आहे. म्हणुन फिर्यादीने पो.स्टे.सिव्हिल लाईन, अकोला येथे पती यादव शंकर नावकार हे हरवल्याबाबत मिसिंग दाखल केली. त्यानंतर फिर्यादी हया एक दिवस त्यांचे शेतावर गेल्या असता त्यांना तेथिल लोकांनी सांगितले कि, त्यांची शेती विकली गेली आहे, त्याबाबत त्यांनी लॅण्ड रेकॉर्ड ऑफीसला जावुन खात्री केली असता, त्यांचे पतीचे, शेतीमुळेच अपहरण करण्यात आल्याचे लक्षात आल्याने त्यांचे फिर्यादी वरुन पो.स्टे.ला गुरन.५८९/ २००० भा.दं.वि.क.३६४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. इस्टेट ब्रोकर अजय गालट याने मयताचे बनावट हस्ताक्षर व अंगठा करून बनावट पॉवर ऑफ अॅटर्नी बनवुन मयतासारखा दिसनारा इसम बाजीराव उर्फ साजु राठोड हयास उभे करून शेत जमिन आरोपी १) सुभाष झोपे २) सुभाष लढ्ढा ३ ) सुदेश माहेश्वरी यांना शेती विक्रीचा व्यवहार करण्यासाठी मयताचे अपहरण करून खुन केला.

## तपासाचा आराखडा / क्रमवारी :-

१) यातील मयत यादव शंकर नावकार हे हरविल्याची फिर्यादीने पोलीस ठाणेस खबर दिली.
२) मिसिंग दाखल झाल्याने मिसिंग व्यक्ती यादव शंकर नावकार यांचा स्थानिक पोलीसांनी इतर पोलीस ठाणेस बिनतारी संदेश पाठवुन शोध घेतला.
३) फिर्यादीचे पती मिळुन न आल्याने व त्यांचे पतीचे शेतीचे जमिनीचे कारणावरून अपहरण झाल्याचे कळाल्याने फिर्यादी सौ.कौसल्याबाई यादव नावकार यांनी सिव्हिल लाइन पोलीस ठाणेस त्यांचे पतीचे अपहरण झाल्याची तक्रार / फिर्याद दाखल केली. सदर अपहरणाच्या तक्रारीत संशयीतांची नावे देण्यात आलेली असल्याने त्यांचा शोध घेतला. परंतु ते तपासात सहकार्य करत नव्हते.
४) गुन्हयाचे तपासात पोलीसांनी साक्षिदारांचे जाब जबाब नोंदविले.
५) फिर्यादीस प्राप्त पोस्ट कार्ड तपास कामी जप्त करण्यात आले.
६) फिर्यादीचे शेजा-यांना आलेले फोन कॉल्स, संदेश या बाबत तपास सुरू करण्यात आला.
७) मध्यप्रदेशातील भैसदेही पोलीस ठाणे हद्दीत पुरूषाचे प्रेत मिळुन आल्याचे माहीती मिळाल्याने स्थानिक पोलीसांसह फिर्यादी त्या ठिकाणी गेली असता मयत इसम हा तिचा पती यादव शंकर नावकार हा असल्याचे तिने ओळखले.
८) पोलीस ठाणेस दाखल असलेल्या गुन्हयास वाढीव कलम ३०२,२०१,१२० ब,४६८,४७१ भा.दं.वि.हे वाढविण्यात आलेबाबत मा.पोलीस अधिक्षक,अकोला व मा.न्यायदंडाधिकारी यांना रिपोर्टाने कळविण्यात आले.

९) तपासादरम्यान सुनिल मानमोडे हया इसमाने येवुन माहीती दिली कि, अजय गालट याने यादव शंकर नावकार यांचे अपहरण करून त्यांचा मध्यप्रदेश हद्दीत नेवुन खुन केला आहे. त्यावेळी मी अजय गालट याचे सोबत होतो, असे शरण येवुन पोलीसांना हकीकत सांगितल्याने पोलीस पथकाने सुनिल मानमोडे यास अटक करून बारकाइने विचारपुस करून जबाब नोंदविला. दरम्यान मुख्य आरोपी अजय गालट याचा शोध घेणे सुरू होते. परंतु तो मिळुन येत नव्हता.

१०) आरोपी सुनिल मानमोडे याने सांगितलेली हकीकतीची शहनिशा करण्यासाठी भारतीय पुरावा कायदा क.२७ प्रमाणे मेमोरंडम पंचनामा करण्यात आला.

११) त्याच दरम्यान मुख्य आरोपी अजय गालट हा नागपुर यैथुन अकोल्याकडे येत असतांना त्यास अटक करण्यात येवुन पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली.

१२ ) आरोपीताने गुन्हयात वापरलेले हत्यार, वाहन असे पंचनामा करून जप्त करण्यात आले.

१३) गुन्हयात मुख्य आरोपीतास मदत करणारे इतर आरोपीतांना अटक करण्यात आली.

१४) आरोपीताने विकलेली शेत जमिनीचे मोबदल्यात मिळालेले पैसे ज्या बँकेत जमा केले होते त्या बँकेचा शोध घेवुन आरोपीताचे बँक खात्याचे व्यवहार बंद करणे बाबत कळविण्यात आले.

१५) आरोपीताने बनावट बनविलेले दस्ताऐवज हे हस्ताक्षर तज्ञ यांचे कडेस पाठविण्यात आले. त्यांचा अहवाल प्राप्त केले असता बनावट दस्तएवजातील हस्ताक्षर आरोपीताचे हस्ताक्षरा बरोबर तंतोतंत जुळले.

१६) आरोपी सुनिल मानमोडे यास Cr.P.C, क ३०६ प्रमाणे माफीचा साक्षिदार बनविण्यात आले.

१७) **कोर्टाचा निकाल :-**

१ ) सेशन कोर्ट, अकोला यांनी मुख्य आरोपी अजय गालट यास फाशीची शिक्षा व इतर ३ आरोपी- सुभाष झोपे, सुभाष लढ्ढा,व सुदेश माहेश्वरी यांना जन्मठेप व आरोपी बाजीराव राठोड यांस दोन वर्ष शिक्षा सुनावली.

२) मा.उच्च न्यायालय मुंबई, नागपुर खंडपीठ येथे मुख्य आरोपी अजय गालट यास आजन्म कारावास व इतर तीन आरोपी यांना निर्दोष सोडले

३) मा.सर्वोच्य न्यायालय, नवी दिल्ली येथे आरोपी अजय गालट यास आजन्म कारावासाची शिक्षा दिली आहे.

**यातील आरोपीवर मालमत्ता चोरीचे जवळपास ५० गुन्हे दाखल आहेत.परंतु एकाही गुन्हयात त्यास शिक्षा झाली नाही. परंतु याच गुन्हयात त्यास सत्र न्यायालयाने दिलेली शिक्षा मा.सर्वोच्च न्यायालयानेही कायम ठेवली.**

## पुराव्याचे स्वरूप :-

१ ) साक्षिदार / तोंडी पुरावा Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब

फिर्याद :- सौ. कौशल्याबाई यादव नावकार यांनी दिलेली फिर्याद.

फिर्यादी शेजारी राहणारे साक्षिदार ज्यांचे मोबाईलवर फोन व संदेश आले होते, त्यांचा जबाब.

माफीचा साक्षिदार, प्रत्यक्ष साक्षिदार सुनिल मानमोडे याचा जबाब.

मयत व्यक्तीस, मुख्य आरोपी अजय गालट याचे सोबत शेवटचे पाहणारे साक्षिदार यांचे जबाब

आरोपीताने वाहनात पेट्रोल भरले त्या पेट्रोल पंपावरील कर्मचा-याचा जबाब.

२) कागदपत्रीय पुरावा

PM नोट्स:- पोस्ट मार्टम करणारे वैदयकीय अधिकारी यांनी तयार केलेली.

३) हस्ताक्षर तज्ञ अहवाल

हस्ताक्षर तज्ञ यांचा अहवाल.

४) इतर पुरावे. :- कॅलेंडर ऑफ इव्हीडंस ( आरोपीताचा पुरावा तक्ता )

| अ क्र. | आरोपीताचे नाव | आरोपीचा गुन्हयातील सहभाग / कृती | आरोपीविरूद्ध पुरावा |
|---|---|---|---|
| १ | अजय गालट | मयताचे चलाखीने अपहरण करून मध्यप्रदेशच्या हद्यीतील कोथलकुंड मधील भैसदेही पोलीस ठाणे हद्यीत खुन करून पुरावा नष्ट करण्याचे इरादयाने प्रेताची विल्हेवाट लावली. | १. सुनिल मानमोडे- प्रत्यक्ष साक्षिदार<br>२. बाजीराव राठोड- प्रत्यक्ष साक्षिदार<br>३. पॉवर ऑफ ॲटर्नी, नोंदणी करणारा<br>४. पेट्रोल पंपा वरील कर्मचारी<br>५. शेतीची खरेदी करणारा यातील आरोपी सुभाष झोपे |
| २ | बाजीराव राठोड | मयतासारखा दिसणारा बाजीराव राठोस याने यादव नावकार म्हणुन बनावट पॉवर ऑफ ॲटर्नी तयार करण्यास मदत केली. तसेच पॉवर ऑफ ॲटनी वर मयताचे नावाचे बनावट अंगठा व सही केली. | १. पॉवर ऑफ ॲटर्नी ,नोंदणी करणारा अधिकारी |
| ३ | १.सुभाष झोपे<br>२.सुभाष लढ्ढा<br>३.सुदेश माहेश्वरी | बनचावट शेती मालक (बाजीराव राठोड) याचे कडुन मुख्य आरोपीच्या मध्यस्थीने मयताची शेत जमिन खरेदी केली. | १. सुनिल मानमोडे- प्रत्यक्ष साक्षिदार.<br>२. बाजीराव राठोड- प्रत्यक्ष साक्षिदार.<br>३. सुरेश देशमुख, प्रत्यक्ष साक्षिदार. |

## गुन्हयाची सुनावणी प्रक्रीया :-

१ ) साक्षिदारांची नावे :-

फिर्यादी :- सौ.कौशल्याबाई यादव नावकार

फिर्यादीं शेजारी राहणारे साक्षिदार ज्यांचे मोबाईल वर फोन व संदेश आले होते त्यांचा जबाब.

इन्कवेस्ट पंचनाम्यातील पंच :-

घटनास्थळी मयताचे व घटनास्थळाचे छायाचित्रण करणारा / फोटो काढणारा

फोटोग्राफर याचे जबाब व फोटो.

माफीचा साक्षिदार प्रत्यक्ष साक्षिदार सुनिल मानमोडे याचा जबाब.

मयत यास मुख्य आरोपीसोबत शेवटचे पाहणारे साक्षिदारांचे जबाब

आरोपीताने वाहनात पेट्रोल भरले त्या पेट्रोल पंपावरील कर्मचा-याचा जबाब.

बनावट पॉवर ऑफ ॲटर्नीवर यादव नावकार म्हणुन सहया करणारा आरोपी

बनावट पॉवर ऑफ ॲटर्नीवर समक्ष म्हणुन सहया करणारे साक्षिदार यांचे जबाब.

बनावट पॉवर ऑफ ॲटर्नी नोंदणी करणारे नोंदणी अधिकारी यांचा जबाब.

शेतीची खरेदी करणारा आरोपी सुभाष झोपे.

हस्ताक्षर तज्ञ यांचा अहवाल

फिंगर प्रिंट एक्सपर्ट यांचा अहवाल

PM नोट्सः- पोस्ट मार्टम करणारे वैदयकीय अधिकारी यांनी तयार केलेली.

मिसींगचा तपास करणारे पोलीस हवालदार

गुन्हा दाखल करणारे पोलीस ठाणे अंमलदार

पोलीस तपासी अंमलदार पोलीस निरीक्षक श्री.शेख.

पोलीस तपासी अंमलदार पोलीस निरीक्षक श्री.गायकवाड.

## तपासातील उणीवा दुर करण्यासाठी / मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना

- यातील मुख्य आरोपी अजय गालट यास कोर्ट कामकाजाचे व प्रशासनाचे सर्व नियम माहीत होते. त्यामुळे तपास करतांना पावलोगनिक अडथळे निर्माण व्हायचे.आरोपीस खोटे आरोप तक्रारी करण्याची सवय असल्यामुळे तो तपास यंत्रणेवर व न्यायव्यवस्थेवर खोटे आरोप करीत होता. त्यामुळे तपासात अडथळा निर्माण होत असे.

  **मात करण्यासाठी सुचना :-** कायदेशीर कार्यकक्षा जाणुन तपास सुरू ठेवायचा. तसेच संयम राखुन काम करायचे.

- गुन्हयात वापरलेल्या हत्याराचा जंगलमध्ये शोध घेतांना तपास पथकाचे अंगावर सपटणारा प्राणी पडुन २०० मिटर खोल दरीत पोलीस पडलेत.

  **मात करण्यासाठी सुचना :-** काळजीपुर्वक तपास करावा.

## तपासातील महत्त्वाचे मुद्दे / सबळ मुद्दे

१ ) फिर्यादीची साक्ष चांगली झाली.

२ ) प्रत्यक्ष घटना बघणारा आरोपी हा माफीचा साक्षिदार झाल्याने त्याची साक्ष चांगली झाली.

३ ) माफीचा साक्षिदाराचे क. २७ भा.पु.का.प्रमाणेचे निवेदन व मेमोरंडम पंचनामा करण्यात आल्याने तो एक महत्त्वाचा पुरावा ठरला.

४ ) आरोपीताचे घटनास्थळी घेतलेले फिंगरप्रिंटचा अहवाल प्राप्त करुन घेतला. सदरच्या अहवाल हा महत्तवपुर्ण पुरावा ठरल्याने आरोपीतास शिक्षा झाली.

५) बनावट दस्ताऐवजांवर सहया करणारे आरोपीतांचे हस्ताक्षर तज्ञाचा अहवाल हा जुळुन आला

५) पोस्टमार्टेम करणारे वैदयकीय अधिकारी यांची साक्ष चांगली झाली.

६) गुप्तबातमीदार यांनी आरोपीबाबत पुरवलेली माहीती महत्त्वाची ठरली.

## तपासाचे विश्लेषण :-

१) सुधारण्यासाठी सुचना :

मिसिंगच्या तपासात शेजारी राहणारे यांचे फोनवर आलेले मॅसेजवर लक्ष केंद्रीत करून मयताचे सिडीआर रिर्पोटच्या अनुषंगाने लोकेशन मिळवुन मयताचा शोध घेता आला असता. तसेच मयताने पाठविलेले मेसेजची सत्यता पडताळणीसाठी एक टिम त्यांनी सांगितलेल्या गावांना / शहरांना भेटी देवुन मयताचा तपास करून शोध घेता आला असता.

१) तपास :-

सदर गुन्हयाचा तपास मिसिंगपासुन सुरू झाला. नंतर अपहरणाच्या तपासात अपहरीत व्यक्तीचा खुन झाल्याचे निष्पण्ण झाल्याने खुनाचा तपासादरम्यान आरोपीचा शोध घेणेकामी गुप्तबातमीदार यांची मोलाची मदत झाली. आरोपीताचा शोध घेवुन अटक करण्यात आली. प्रत्यक्ष घटना पाहणा-या आरोपीतास माफीचा साक्षिदार बनविण्यात आले. डॉक्टर, फिंगरप्रिंट एक्सपर्ट, हस्ताक्षर तज्ञ यांचे अहवाल महत्त्वाचे पुरावे ठरले. तसेच मयतास मुख्य आरोपीसोबत शेवटचे पाहणारे साक्षीदारांचे जबाब यावर मा.सेशन कोर्ट, अकोला यांनी ग्राहय मानुन मुख्य आरोपी यास शिक्षा सुनावली.

२) प्रतिबंधात्मक कारवाई :-

सदर गुन्हा घडण्याअगोदर फिर्यादीचा पती व आरोपी यांचेत काही वाद विवाद, बोलाचाली किंवा देवाण घेवाण झाली होती काय ? असल्यास आरोपीताविरूद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करून दखलपाञ स्वरूपाचा मोठा गुन्हा घडण्यास रोखता आले असते काय ?

३) गुप्तवार्ता संकलन :-

गुन्हयाची उकल होण्यासाठी गुप्तबातमीदार यांची फार मोलाची मदत झाली आहे.

# गुन्हयाचा प्रकार :- खुन

## ( खंडणीसाठी अपहरण करुन खुन )

**पोलीस स्टेशन :- खंडाळा पोलीस ठाणे**

**तालुका :- खंडाळा जिल्हा :- सातारा.**

## गुन्हयाची प्राथमिक माहीती :-

पोलीस स्टेशन :- खंडाळा, ताो.खंडाळा, जि. सातारा.

गुरनं. / २०१४ , क.३०२, ३६३, ३६४ अे , २०१, ३८६ भा.दं.वि.

१) फिर्यादी : सुर्यकांत महादेव भांडे, रा.शिरवळ, ताो.खंडाळा, जि. सातारा.

२) आरोपी :- १) लहु ऊर्फ लहुकुमार रामचंद्र ढेकणे, वय धंदा - सुतारकाम रा.

३) पिडीत :- चि. संकेत सुर्यकांत भांडे वय ३ वर्ष ९ महीने.

४) अ.घ.ता.वे. :- दिनांक २२/०९/२०१४ रोजी ०१ : ३० वा.

ठिकाण :- लिटील एंजेल्स स्कुल, शिरवळ, ताो.खंडाळा, जि.सातारा.

५) थोडक्यात हकीकत :- फिााचा मुलगा संकेत सुर्यकांत भांडे, वय ३ वर्ष ९ महीने हा शिशु गटात लिटील एंजेल्स स्कुल, शिरवळ येथे शिकत होता. तो नेहमीप्रमाणे दि.२२/९/१४ रोजी सकाळी ०७ : ३० वा. शाळेत गेला असता अज्ञात व्यक्तीने शाळेमधुन त्याचे अपहरण करून त्यास जिवे ठार मारले.

## तक्रार / फिर्यादीची थोडक्यात हकीकत :-

६) फिर्यादी सुर्यकांत महादेव भांडे हे त्यांची पत्नी सौ. सुनंदा, आई श्रीमती रत्नाबाई, भाउ चंद्रकांत, भावजयी सौ.अलका तसेच दोन मुले चि.सुरज वय ६.५ वर्ष आणि चि.संकेत वय ३.९ वर्ष यांचे सह एकत्र राहत होते.मोठा मुलगा सुरज हा इयत्ता १ ली मध्ये तर लहान मुलगा संकेत हा शिशु गटात लिटील एंजल्स, शिरवळ, ताो.खंडाळा, जि.सातारा येथे शिक्षण घेत होते. दिनांक २२/९/२०१४ रोजी सकाळी ०७ : ३० वा.चि.सुरज व संकेत हे नेहमीप्रमाणे शाळेत गेले होते. दुपारी ०१ : ३० वा फिर्यादीचा भाऊ चंद्रकांत हा नेहमीप्रमाणे शाळेत मुलांना आणण्यास गेला. तेव्हा सुरज शाळेत मिळाला परंतु लहान मुलगा संकेत हा मिळुन आला नाही. तेव्हा चंद्रकांत याने शाळेत चौकशी केली असता, संकेत हा घरी गेल्याचे समजले. म्हणुन चंद्रकांत सुरजला सोबत घरी घेऊन आला. परंतु संकेत हा घरी मिळुन आला नाही. चंद्रकांत हा फिर्यादीचे कारखान्यात संकेतचा शोध घेण्यास गेला असता, त्यांचे घरातील मोलकरीण शबाना हिने फोन करुन सांगितले की, घरी एका अज्ञात व्यक्तीचा फोन आला होता, त्याने फोन करुन सांगितले की, संकेतला किडनॅप करण्यात आले असुन मुलगा जिवंत हवा असेल तर, मला १ लाख रु.द्यावे लागतील.आणि पोलीसांना कळविले तर मुलगा जिवंत मिळणार नाही. पैसे कोठे द्यायचे ते ठिकाण व वेळ सांगण्यासाठी मी नंतर फोन करतो.असे सांगितले` पो.स्टे.ला खबर दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला.

## तपासाचा आराखडा / क्रमवारी :-

०७) यातील मयत चि.संकेत सुर्यकांत भांडे यास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने खंडणीसाठी अपहरण केले असल्याची फिर्यादीने पो.स्टै.ला खबर दिल्याने अज्ञात व्यक्ती विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

०८) तपास सुरु केल्यानंतर संकेतच्या शाळेतुन अज्ञात आरोपीताचे वर्णन मिळाले. त्याचे रेखाचित्र तयार केले. अज्ञात आरोपीताचा, अपहरीत मुलगा संकेत यांचा शोध घेण्यासाठी सर्व पोलीस ठाणे व जिल्हा पोलीस मुख्यालय, यांना बिनतारी संदेश व तपास यादयाद्वारे कळविण्यात आले.

०९) फिर्यादीचे मित्र, नातेवाईक, फिर्यादीची पत्नी सौ.सुनंदा यांच्या मैत्रिणी, तसेच इतर नातेवाईक यांचेकडे चौकशी करुन तपास करण्यात आला. तसेच संकेतच्या शाळेतील शिक्षिकांचे नोंदविण्यात आले. फिर्यादीचे घरी येणारे फोन कॉल्स टॅप करण्यास सुरवात करण्यात आली. त्यावरुन आरोपीचे फोन हे पुणे शहर व त्या परीसरातुन येत असल्याचे समजले. परंतु आरोपी कोण आहे हे समजुन येत नव्हते.

१०) आरोपीताने पैशांसाठी वेगवेगळया फोन बुथवरुन २/३ वेळेस फोन करुन वेगवेगळे ठिकाण व वेळ सांगितली.त्याने फोन केलेले शेवटचे ठिकाण सातारा - पुणे रोडवरील ढाब्यावर पोलीसांनी सापळा रचला परंतु आरोपी त्या ठिकाणी ालाच नाही.

११) दोन दिवसानंतर आरोपीताने चिडुन जाऊन फोन करुन सांगितले कि, जर मला पैसे मिळाले नाही तर मी तुमचे मुलाला ठार मारेन, आणि तुम्ही पोलीसांना कळविले तर तुमचा मुलगा परत कधीच जिवंत मिळणार नाही.

१२) आरोपीने दिलेल्या धमकीमुळे फिर्यादी घाबरुन गेल्याने त्यांनी पुणे सातारा महामार्ग क्र.४ वर जाऊन आरोपीने सांगितलेल्या ठिकाणी पैशांची बॅग ठेवली. तेथे फिर्यादीस दोन चिठ्ठया मिळाल्या त्यापैकी एका चिठ्ठीत पैसे कोठे ठेवायचे तर दुस-या चिठ्ठीत **" मुलगा घरी सुखरुप मिळेल, तु आता घरी जा "** असे लिहीलेले होते. फिर्यादी दोन्ही चिठठ्या घरी घेऊन आला. नमुद चिठ्ठया फिर्यादीने पोलीसांना दिल्या.

१३) तपासामध्ये काहीच प्रगती होत नसल्याने गुन्हयाचा तपास स्थानिक पोलीसांकडुन काढुन स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला.तेथिल तपासी अधिकारी यांनी फिर्यादीकडे १ महिना आधी फर्निचरचे काम करण्यासाठी काही सुतार मजुरीने कामास लावले होते, त्या मजुरांचे नाव पत्ते घेऊन त्यांचा तपास केला.लहुकुमार रामचंद्र ढेकाणे १ महीन्यापासुन घरी आला नाही अशी माहीती मिळाल्याने पोलीसांनी त्याचा फोटो व त्याचे हस्ताक्षर असलेली वही ताब्यात घेतली.त्याचा फोटो व वर्णन सर्व पो.स्टे. ठाण्यास पाठविण्यात आले.

१४) आरोपी पुण्याचे गुलटेकडी परीसरात लपला असल्याची माहीती मिळाल्याने पुणे पोलीसांच्या मदतीने त्यास सापळा रचुन अटक केली. त्याचे ताब्यातुन रोख रक्कम २५,०००/- रु.मिळाले.त्याने गुन्हयाची कबुली देऊन सांगितले कि,अपहरण केलेला मुलगा संकेत यास अपहरण केलेल्या दिवशीच म्हणजे दि.२२/९/२०१४ रोजी गळा आवळुन खुन करुन त्याचा मृतदेह उसाचे शेतात टाकल्याचे सांगितले.

१५) गुन्हयास वाढीव क. ३०२, २०१ भा.दं.वि. हे वाढविण्यात आले बाबत मा.पोलीस अधिक्षक सातारा व मा.न्यायदंडाधिकारी यांना रिपोर्टाने कळविण्यात आले.

१६) आरोपीने संकेतचा मृतदेह पुरलेल्या ठिकाणी जाऊन पाहीले असता,मृतदेह मिळुन आला नाही.त्या ठिकाणी सापडलेली हाडे न्यायवैद्यक प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवली असता ती हाडे मानवाची नाहीत,असा अहवाल न्यायवैद्यक प्रयोगशाळेतुन प्राप्त झाला.

१७) आरोपीचे घरातुन त्याचे हस्ताक्षर असलेली वही व घटनास्थळावर मिळालेल्या चिठ्ठया एकाच व्यक्तीचे आहे, असा हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल प्राप्त झाला.

१८) आरोपीविरुदध पुरावा उपलब्ध झाल्याने कोर्टात दोषारोप पत्र पाठविण्यात आले.

१९) **कोर्टाचा निकाल** :-

१) सेशन कोर्ट सातारा यांनी आरोपी लहुकुमार रामचंद्र ढेकाणे यास क.३०२ प्रमाणे जन्मठेप क. ३६४ ए प्रमाणे सुद्धा जन्मठेप, क.३६३ प्रमाणे ५ वर्ष कारावास, क. २०१ भा.दं.वि. प्रमाणे ५ वर्ष कारावास, क.३८४ प्रमाणे ७ वर्ष कारावास, अश्या वेगवेगळया शिक्षा दिल्या. या सर्व शिक्षा आरोपीताने एकत्रीत भोगाव्याचे आहेत, असा निर्णय दिला.

२) उच्च न्यायालय मुंबई ,यानी आरोपी लहुकुमार रामचंद्र ढेकाणे यास पुराव्या अभावी निर्दोष मुक्त केले.

३) मा.सर्वोच्य न्यायालय, नवी दिल्ली यांनी आरोपी लहुकुमार रामचंद्र ढेकाणे याची उच्च न्यायालय मुंबई यांनी पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केल्याचा आदेश रद्य करुन, सत्र न्यायालय, सातारा यांनी सुनावलेली शिक्षा कायम ठेवली.

## पुराव्याचे स्वरूप :-

१ ) साक्षिदार / तोंडी पुरावा Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब.

फिर्याद :- सुर्यकांत महादेव भांडे यांची

फिर्यादीचे मित्र, नातेवाईक, फिर्यादीची पत्नी सौ.सुनंदा यांचे मैत्रिणी, तसेच इतर नातेवाईक, संकेतच्या शाळेतील शिक्षिकांचे जबाब नोंदविण्यात आले.

२) कागदपत्रीय पुरावा.

घटनास्थळाचा पंचनामा

आरोपीचे मोबाईल फोनचे सिडीआर, एसडीआर रिर्पोट.

३) हस्ताक्षर तज्ञ अहवाल

आरोपीताने फिर्यादीसाठी सोडलेल्या धमकीच्या दोन चिठ्ठया व त्याचे घरातुन जप्त केलेली त्याचे हस्ताक्षरात असलेली वही यांचा अहवाल.

४) इतर पुरावे. :- कॅलेंडर ऑफ इव्हीडंस ( आरोपीताचा पुरावा तक्ता )

| अ क्र. | आरोपीताचे नाव | आरोपीचा गुन्हयातील सहभाग / कृती | आरोपी विरूद्ध पुरावा |
|---|---|---|---|
| १ | लहु ऊर्फ लहुकुमार रामचंद्र ढेकाणे | मयत लहान मुलगा संकेत सुर्यकांत भांडे याचे त्याचे शाळेतुन खंडणी साठी अपहरण करून गळा आवळुन खुन करुन प्रेताची विल्हेवाट लावुन पुरावा नष्ट केला | १. आरोपी फिर्यादीकडे सुतार कामासाठी मजुरीने येत होता हे फिर्यादी व साक्षि. यांचे जबाबावरुन सिद्ध झाले.<br>२. संकेतच्या शाळेतील शिक्षिका यांचे जबाब, व त्यांनी आरोपीतास ओळख परेड दरम्यान ओळखणे.<br>३. आरोपीने फिर्यादीस खंडणीसाठी ज्या टेलीफोन बुथवरुन फोन केला, व त्याच बुथवरुन स्वताचे घरी फोन केला, त्या फोनचे CDR रिर्पोट<br>४. हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल. |

## गुन्हयाची सुनावणी प्रक्रीया :-

### १ ) साक्षिदारांची नावे :-

१) फिर्याद :- फिर्यादी सुर्यकांत महादेव भांडे यांची साक्ष महत्तपुर्ण ठरली.

२) फिर्यादीची पत्नी सौ.सुनंदा इतर नातेवाईक,संकेतच्या शाळेतील शिक्षिकांचे नांदविलेले जबाब तसेच त्यांनी आरोपीताचे सांगितलेल्या वर्णनावरुन रेखचित्र बनविण्यात आल्याने आरोपीतास गुन्हयात अटक करण्यात आली.

३) एसटीडी .बुथ चालकाचा जबाब.त्याने ओळखुन सांगितले कि,आरोपीताने याच बुथ वरुन फोन केला आहे.

४) पानवाल्याचा जबाब.त्यात त्याने आरोपीताने त्याचेच दुकानातुन पिडीत अपहरीत मुलगा यास चॉकलेट खरेदी करुन दिली आहे.

५) हस्ताक्षर तज्ञ यांचा अहवाल.

६) गुन्हा दाखल करणारे पोलीस ठाणे अंमलदार

७) पोलीस तपासी अंमलदार पोलीस निरीक्षक

८) स्थानिक गुन्हे शाखेचे तपासी अंमलदार पोलीस निरीक्षक

## तपासातील उणीवा दुर करण्यासाठी / मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना.

- फिर्यादीने स्थानिक पोलीस स्टेशनला त्यांचेकडे मजुरीने सुतार काम करणारे मजुरांची माहीती दिली. मात्र पोलीसांनी त्याबाबत काळजी, चौकशी केली नाही. त्यामुळे तपासाला गती येऊ शकली नाही.

  **मात करण्यासाठी सुचना :-** फिर्यादीकडे काम करणारे किंवा त्यांचे कौटुंबिक / आर्थिक परिस्थितीची माहीती असणारे लोकांकडे विचारपुस करुन तपासाची दिशा ठरवावी. व त्यांची माहीती काढुन त्यांचे हालाचालींवर बारकाईने नजर ठेवावी.

- पोलीसांनी सुरुवातीला जेव्हा आरोपीस पकडणेसाठी सापळा तयार केला होता व फिर्यादीकडे ज्या नोटा दिल्या होत्या, त्यांचे नंबर लिहुन ठेवले नाही.

  **मात करण्यासाठी सुचना :-** आरोपीताने खंडणीसाठी मागितलेल्या पैशांची देवाण घेवाण करण्याचे अगोदर फिर्यादीस विश्वासात घेऊन देण्यात येणाऱ्या नोटांचे नंबर लिहुन दोन पंचासमक्ष त्यांचा पंचनामा करण्यात यावा.

- आरोपीचा कबुली जबाब पोलीसांनी स्वत:च नोंदविला.

  **मात करण्यासाठी सुचना :-** आरोपीताचा कबुली जबाब दंडाधिकारी यांचे कडुन Cr.P.C. १६४ प्रमाणे नोंदवुन घेतला पाहीजे. तसेच अहपहरीत संकेतचा मृतदेह ज्या ठिकाणी पुरुन ठेवला होता, त्या ठिकाणचा पंचनामा आरोपीताचे निवेदन घेऊन सरकारी पंच घेऊन मेमोरंडम पंचनामा करण्यात यावा.

## तपासातील महत्त्वाचे मुद्दे / सबळ मुद्दे

१ ) आरोपी लहुकुमार हा घटनेपुर्वी काही दिवस अगोदर फिर्यादी सुर्यकांत यांचे घरी सुतार कामासाठी मजुरीने येत होता, ही बाब फिर्यादीने व साक्षिदारांचे जबाबावरुन सिध्द होते.

२ ) संकेतचे ज्या शाळेतुन अपहरण करण्यात आले, तेथिल शिक्षकांचे जबाब घेण्यात आले त्यावेळी त्यांनी अज्ञात व्यक्तीचे केलेले वर्णन शिक्षिकांनी ओळख परेडमध्ये आरोपीताला ओळखले, त्यामुळे आरोपीताने अपनयनचा अपराध केल्याचे सिध्द होते.

३ ) आरोपी लहुकुमार याने ज्या एसटीडी. बुथवरुन फोन कॉल केलेले होते, तेथिल बुथ मालकांनी देखिल आरोपीस ओळखले, त्यांनी दिलेल्या माहीती व वेळेनुसार CDR तपासले असता, त्याच बुथवरुन आरोपीने फिर्यादीचे घरच्या नंबरवर कॉल केल्याचे सिध्द झाले.

४ ) आरोपीचे घरातुन त्याची हस्ताक्षर असलेली जप्त केलेली वही व घटनास्थळावर मिळालेल्या चिठ्ठया यातील अक्षर हे एकाच व्यक्तीचे असल्याचे हस्ताक्षर तज्ञांचा अहवालामुळे आरोपीताने फिर्यादीकडे खंडणी मागितल्याचे सिदध होते.

## तपासाचे विश्लेषण :-

२) सुधारण्यासाठी सुचना :- फिर्यादी यांचेकडे अपहरणाच्या १ महीना अगोदर सुतार कामासाठी आलेल्या मजुरांची माहीती फिर्यादीने स्थानिक पोलीसांकडे दिली होती. त्या मजुरांवर स्थानिक पोलीसांनी लक्ष केंद्रीत करुन तपास केला असता, तर आरोपीची माहीती लवकर मिळुन गुन्हा उघडकीस येऊन जनमानसात पोलीस खात्याची प्रतिमा उंचावण्यास मदत झाली असती.

३) तपास :-

संकेतच्या शाळेतुन मिळालेल्या अज्ञात आरोपीताचे वर्णनावरुन रेखाचित्र तयार केले. अज्ञात आरोपीताचा,अपहरीत मुलगा संकेत यांचा शोध घेण्यासाठी सर्व ठिकाणी बिनतारी संदेश व तपास यादया द्वारे कळविण्यात आले. फिर्यादीचे मित्र, नातेवाईक, फिर्यादीची पत्नी सौ.सुनंदा यांची मैत्रिणी, तसेच इतर नातेवाईक यांचेकडे चौकशी करुन तपास करण्यात आला. तसेच संकेतच्या शाळेतील शिक्षिकांचे जबाब नोंदविण्यात आले. फिर्यादीचे घरी येणारे फोन कॉल्स टॅप करण्यास सुरवात करण्यात आली. आरोपीने दिलेल्या धमकीमुळे फिर्यादी हे घाबरुन गेल्याने त्यांनी पुणे सातारा महामार्ग क्र.४ वर जाऊन आरोपीने सांगितलेल्या ठिकाणी पैशांची बॅग ठेवली. तेथे फिर्यादीस दोन चिठ्ठया मिळाल्या त्या पैकी एका चिठ्ठीत पैसे कोठे ठेवायचे तर दुस-या चिठ्ठीत **" मुलगा घरी सुखरुप मिळेल, तु आता घरी जा "** असे लिहीलेले होते. फिर्यादी यांनी दोन्ही चिठठ्या घरी घेऊन आल्यानंतर त्या चिठ्ठया फिर्यादीने पोलीसांना तपासकामी दिल्या. तपासामध्ये काहीच प्रगती होत नसल्याने गुन्हयाचा तपास स्थानिक पोलीसांकडुन काढुन घेऊन स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेचे तपासी अधिकारी यांनी फिर्यादीकडे १

महिना आधी फर्निचरचे काम करण्यासाठी काही सुतार मजुरीने कामास लावले होते, त्या मजुरांचे नाव पत्ते घेऊन त्यांचा तपास केला असता लहुकुमार रामचंद्र ढेकाणे १ महीन्यापासुन घरीच आला नाही अशी माहीती मिळाल्याने पोलीसांनी त्याचा फोटो व त्याचे हस्ताक्षर असलेली वही ताब्यात घेतली. त्याचा फोटो व वर्णन सर्व पोलीस ठाण्यास पाठविण्यात आले. आरोपी लहुकुमार हा पुण्याचे गुलटेकडी परीसरात लपुन बसला असल्याची माहीती मिळाल्याने त्यास पुणे पोलीसांच्या मदतीने सापळा रचुन अटक केली. त्याचे ताब्यातुन रोख रक्कम २५,०००/- रु. मिळाले. त्याने गुन्हयाची कबुली दिली व अपहरण केलेला मुलगा संकेत यास अपहरण केलेल्या दिवशी म्हणजे दिनांक २२/०९/२०१४ रोजी गळा आवळुन खुन करुन त्याचा मृतदेह उसाचे शेतात टाकल्याचे सांगितले. आरोपीचे घरातुन त्याचे हस्ताक्षर असलेली वही व घटनास्थळावर मिळालेल्या चिठ्ठया एकाच व्यक्तीचे आहे, असा हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल प्राप्त झाला. परिस्थिजन्य पुराव्याचेआधारे सत्र न्यायालय, सातारा यांनी आरोपीस शिक्षा सुनावली.

# गुन्हयााचा प्रकार :- खंडणी वरुन खुन

**पोलीस स्टेशन :- खदान पोलीस ठाणे,मलकापुर.**

**तालुका :- अकोला जिल्हा :- अकोला**

**तपासी अंमलदार :- पोलीस निरीक्षक श्री.सपकाळ**

## गुन्हयाची प्राथमिक माहीती :-

१) पोलीस स्टेशन :- खदान,मलकापुर गांव, अकोला

गुरनं.१५२ / २०१३, भा.दं.वि. क.३०२, ३४१, ३८५, २०१, १२० ब, ५०६ (ब), ३४

आर्म ॲक्ट क.३ /२५, ५,७,२७ (१), (२), (३ ), २८, ४/२५

२) फिर्यादी :- अनिल रामभाउ अधनकर वय ३७ वर्ष,धंदा किराणा दुकान रा.मलकापुर,जि.अकोला

३) आरोपी :- १) मोहन ऊर्फ बल्लु हरीभाऊ मार्कंड, वय ४०, धंदा ठेकेदारी, रा.मलकापुर

२) निलेश रामभाऊ काळंके, वय ३५, धंदा - सदस्य ग्रामपंचायत, मलकापुर

३) अविनाश सुरेश वानखडे, वय ४० वर्ष, धंदा सदस्य, ग्रामपंचायत मलकापुर

४) डिगंबर हरीभाऊ फाटकर, वय ४६, धंदा मजुरी, रा. मलकापुर

५) विष्णु नारायण डाबके, वय २८, धंदा गोडावुन किपर, रा.कुंभारी

४) मयत :- सिध्देश्वर गुणवंतराव देशमुख- सरपंच मलकापुर, वय ३२, रा.संतोष नगर,मलकापुर, जि.अकोला.

५) अ.घ.ता.वे.:- दिनांक २०/०८/२०१३ रोजी १७ : ०० वा.

ठिकाण :- मोहनसिंग ठाकुर यांचे घरा समोर,मलकापुर, अकोला.

६) थोडक्यात हकीकत :- यातील फिर्यादी हे मयत सिध्देश्वर गुणवंतराव देशमुख व साक्षिदार डिगांबर संतसेवा पाटील असे मोटर सायकल क्रमांक MH-30-N-6443 या वरुन ट्रिपल सिट ग्राम पंचायत कार्यालयासमोरुन जाणारे रोडने तुकाराम चौकाकडे जात असतांना, आरोपी नामे १) मोहन ऊर्फ बल्लु हरीभाऊ मार्कंड , २) निलेश रामभाऊ काळंके यांनी समोरुन मोटर सायकलवर यंवुन फिर्यादीची मोटर सायकल अडवुन मोहन मार्कंड याने त्याचेजवळील बंदुकीने सरपंच सिध्देश्वर देशमुख यांचे पोटावर, छातीवर व डोक्यात गोळया झाडल्या व आरोपी निलेश काळंके याने त्याचे हातातील चाकुने त्यांचे पोटात खुपसुन खुन केला.

## तक्रार / फिर्यादीची थोडक्यात हकीकत :-

दिनांक २३/८/२०१३ रोजी ग्राम पंचायत, मलकापुर येथिल जलस्वराज योजनेच्या पाईप लाईनच्या नालीच्या खोद कामाच्या कारणावरुन मोहन ऊर्फ बल्लु हरीभाऊ मार्कंड रा.सुरेका नगर, मलकापुर, अकोला व ग्रामपंचायत सदस्य विनायक ऊर्फ विनोद वानखडे यांचा वाद झाला होता. त्या वादानंतर विनायक वानखेडे व त्यांचे साथीदाराने (१)मोहन ऊर्फ बल्लु हरीभाऊ मार्कंड,ठेकेदार (२) निलेश रामराव काळंके, ग्राम पंचायत सदस्य,मलकापुर (३) अविनाश सुरेशराव वानखडे यांचेवर लोखंडी पाईप, लाकडी दांडे, गुप्ती, चाकु, व कुदळ या शस्त्राने प्राणघातक हल्ला केला होता.

या प्राणघातक हल्लयात फिर्यादी अनिल रामभाऊ अधनकर वय ३७ धंदा किराण दुकान रा.VHB. कॉलनी, मलकापुर, अकोला ग्राम पंचायत मलकापुरचे सरपंच मयत सिध्देश्वर गुणवंतराव देशमुख यांचाही सहभाग होता हया कारणा वरुन व त्या प्राणघातक हल्ल्यास सरपंच देशमुख हेच कारणीभुत असल्याचा राग मनात ठेवुन १) मोहन ऊर्फ बल्लु हरीभाऊ मार्कंड २) निलेश रामराव काळंके यांनी मोटर सायकलने येवुन फिर्यादी हे त्यांचे मोटर सायकल क्र. MH-30-N-6443 या वरुन साक्षिदार डिगांबर संतसेवा पाटील यांचेसह ट्रिपल सिट बसुन मलकापुर ग्राम पंचायत कार्यालया समोरुन जाणारे

रोडने तुकाराम चौकाकडे जात असतांना, आरोपी यांनी फिर्यादीची मोटर सायकल रस्त्यात अडवुन मोहन मार्कंड याने त्याचेजवळील बंदुकीने सिध्देश्वर देशमुख यांचे पोटावर, छातीवर व डोक्यात गोळया झाडुन व निलेश काळंके याने त्याचे हातातील चाकु सिध्देश्वर देशमुख यांचे पोटात खुपसुन जिवे ठार मारले.फिर्यादी हे त्यांना वाचविण्यास गेले असता त्यांना चाकुचा धाक दाखवुन जिवे मारण्याची धमकी दिली.

## तपासाचा आराखडा / क्रमवारी :-

१) प्रत्यक्ष घटना बघणारे अनिल रामभाउ अधनकर, वय ३७ वर्ष, यांनी फिर्याद दिल्याने पोलीस ठाणे खदान येथे गुन्हा रजि.नं. १५२ / २०१३, कलम ३०२, ३४१, १२० ब, ५०६ (ब), ३४ भा.दं.वि. व आर्म ॲक्ट कलम ३ /२५ प्रमाणे दाखल करण्यात आला.

२) मयत सिध्देश्वर गुणवंतराव देशमुख, वय ३२ वर्ष, धंदा सरपंच, ग्राम पंचायत,मलकापुर,अकोला रा.संतोष नगर, मलकापुर,अकोला यांचे प्रेताचा इंन्कवेस्ट पंचनामा करुन प्रेत पोस्ट मार्टमसाठी शासकीय रुग्णालय, अकोला येथे पाठविण्यात आले. त्या ठिकाणी तीन वैद्यकीय अधिकारी यांचे पथकाद्वारे पोस्ट मार्टम करण्यात आले. पोस्ट मार्टम नोट प्राप्त करण्यात आली.

३) शासकीय रुग्णालय, अकोला येथे पोस्ट मार्टम नंतर मयताचे अंगावरील रक्ताने माखलेले कपडे पंचनामा करुन जप्त करण्यात आले.तसेच मयताचे शरीरातील अग्नीशस्त्राचे दोन गोळया काढुन त्या वेगवेगळया दोन प्लास्टिक डबीत सिल बंद करण्यात आले.तसेच मयताचे शरीरात गोळीने ज्या भागातुन शरीरात प्रवेश केला, व ज्या भागातुन बाहेर पडली त्या भागातील त्वचा काढुन त्या वेगवेगळया डबीत सिल बंद करुन बॅलेस्टिक तपासणी करीता न्याय वैज्ञानिक प्रयोग शाळा, येथे पाठविण्यात आले.

४) घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.घटनास्थळावरुन अग्नीशस्त्रातुन फायर केलेल्या दोन पितळी पुंगळया, एक बुलेट, एक जिवंत काडतुस,मयताचे डाव्या पायातील बुट, पेन व चष्मा, साक्षिदार डिगांबर पाटील यांचे रक्ताचे डाग असलेला टी शर्ट,जप्त करण्यात आले.

५) तसेच घटनास्थळावरील रक्त मिस्त्रीत माती, साधी माती,असे वेगवेगळया कापसाचे बोळयावर घेवुन जप्त करण्यात आले.तसेच, पोस्ट मार्टम नंतर मयताचे अंगावरील रक्ताने माखलेले कपडे आणि रक्त असे न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळेत पाठविण्यात आले.गुन्हयाचे तपासात पोलीसांनी प्रत्यक्षदर्शी साक्षिदार १) अनिल रामभाऊ अधनकर २) डिगांबर संतसेवा पाटील यांचे Cr.p.c १६४ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आले.तसेच इतर साक्षिदारांना विचारपुस करुन जबाब नोंदविले.तपासात आरोपीतांनी मयतास सरपंच पद सोड नाहीतर, २० लाख रुपये दे नाहीतर तुला जिवानिशी ठार मारु अश्या धमक्या दिल्याचे जबाबात सांगितल्याने गुन्हयास भादवि.कलम ३८५ हे वाढीव कलम लावण्यात आले. तपासाचे पगती बाबत वरीष्ठ अधिकारी यांना अवगत करण्यात आले.

६) गुन्हयातील आरोपी १) मोहन ऊर्फ बल्लु हरीभाउ मार्कड वय ४० वर्ष धंदा ठेकेदार रा.सुरेखा नगर, अकोला २) निलेश रामराव काळंके वय ३५ वर्ष रा.VHB कॉलनी, मलकापुर, अकोला यांना अटक करण्यात येवुन पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली.

७) तपासात आरोपी मोहन मार्कंड व निलेश काळंके यांनी गुन्हयात वापरलेले अग्निशस्त्र व चाकु हे नष्ट करण्यासाठी विष्णु नारायण डापके रा.कुंभारी, अकोला यास सोपविल्याने पोलीसांनी त्यास सदर गुन्हयात अटक केली.

८) आरोपी विष्णु नारायण डापके याने पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे निवेदन केल्याने शासकीय पंचा समक्ष मेमोरंडम पंचनामा करण्यात येवुन गुन्हयातील अग्निशस्त्र व चाकु कुंभारी धरणाचे पाण्यातुन काढुन दिल्याने ते जप्त करण्यात आले.तसेच गुन्हयातील मोटर सायकल ही आरोपी निलेश काळंके याने तसेच आरोपीने गुन्हा करते वेळी अंगात घातलेले कपडे, रक्ताने भरलेले हे मोहन मार्कंड यांचे कडुन पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे काढुन दिल्याने जप्त करण्यात आले.

९) आरोपी अविनाश सुरेश वानखडे रा. VHB कॉलनी, मलकापुर, अकोला हा गुन्हा घडल्या नंतर फरार होता त्याचा शोध घेवुन अटक करण्यात आली.आरोपी हा ग्राम पंचायत, मलकापुर येथे ३ वेळा निवडुण आला होता.२ वेळा उप सरपंय व १ वेळा सरपंच या पदावर राहीला होता.त्याला सरपंच पद मिळावे या करीता त्याने आरोपींतासह कट रचुन राजकारणाचे वैमनस्यातुन सिध्देश्वर गुणवंतराव देशमुख यांना जिवानिशी ठार मारण्याचा कट रचला असे तपासात निष्पण्ण झाले.

१०) **कोर्टाचा निकाल :-**

१ ) सेशन कोर्ट अकोला यांनी आरोपी मोहन ऊर्फ बल्लु हरीभाउ मार्कंड यास दुहेरी जन्मठेप व द्रव्यदंड, आरोपी निलेश रामराव काळंके, अविनाश सुरेश वानखडे यांना जन्मठेप व द्रव्यदंड, आरोपी विष्णु नारायण डापके यास ५ वर्ष सक्त मजुरी शिक्षा ठोठावण्यात आली.तसेच आरोपी डिगांबर हरीभाऊ फाटकर यास पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली.

## पुराव्याचे स्वरूप :-

१ ) साक्षिदार / तोंडी पुरावा Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब

साक्षिदारांचे जबाब.
पंच :- इन्कवेस्ट पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा, व इतर पंचनाम्यातील सर्व पंच.
वैद्यकीय अधिकारी :- पोस्टमार्टम करणारे हॉस्पिटलचे डॉक्टर यांचे जबाब.

२) कागदपत्रीय पुरावा.

PM नोट्सः- पोस्ट मार्टम करणारे वैदयकीय अधिकारी यांनी तयार केलेली.
इन्कवेस्ट पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा, मेमोरंडम पंचनामा,बॅलेस्टिक अहवाल, सी.ए अहवाल.
ओरोपीतांचे मोबाईल फोनचे सीडीआर व एसडीआर रिर्पोट.

३) इतर पुरावे. :- कॅलेंडर ऑफ इव्हीडंस ( आरोपीताचा पुरावा तक्ता )

| अ क्र. | आरोपीताचे नाव | आरोपीचा गुन्हयातील सहभाग / क् .ती | आरोपी विरूद्ध पुरावा |
|---|---|---|---|
| १ | मोहन ऊर्फ बल्लु हरीभाऊ मार्कंड | सिध्देश्वर गुणवंतराव देशमुख यांना जिवेनिशी ठार मारण्याचा कट रचला व इतर आरोपींचे मदतीने त्यांना गावठी पिस्तोल मधुन त्यांचे शरीरावर गोळया झाडुन खुन केला. | १. गुन्हयात वापरलेली गावठी पिस्तोल, मॅगझिन त्यात एक जिवंत काडतुस, व मोटर सायकल<br>२. मोबाईल फोन.व त्याचे सिमकार्डचे एसडीआर व सीडीआर रिर्पोट<br>३. रक्ताचे नमुने. |
| २ | निलेश रामराव काळंके | सिध्देश्वर गुणवंतराव देशमुख यांना जिवेनिशी ठार मारण्याचा कट रचला व खुन करण्यास इतर साथिदारांना मदत केली. | १. गुन्हयात वापरलेला चाकु.व मोटर सायकल<br>२. मोबाईल फोन.व त्याचे सिमकार्डचे एसडीआर व सीडीआर रिर्पोट<br>३. रक्ताचे नमुने. |
| ३ | अविनाश सुरेशराव वानखडे | सिध्देश्वर गुणवंतराव देशमुख यांना जिवेनिशी ठार मारण्याचा कट रचला व त्यांचे पोटात चाकु खुपसुन खुन केला. | १. मोबाईल फोन.व त्याचे सिमकार्डचे एसडीआर व सीडीआर रिर्पोट |
| ४ | डिगांबर हरीभाउ फाटकर | सिध्देश्वर गुणवंतराव देशमुख यांना जिवेनिशी ठार मारण्याचा कट रचला व खुन करण्यास इतर साथिदारांना मदत केली. | **निर्दोष** |
| ५ | विष्णु नारायण डापके | आरोपी मोहन ऊर्फ हरीभाऊ मार्कंड व निलेश रामराव काळंके यांनी सिध्देश्वर देशमुख यांना ठार मारणे करीता वापरलेली शस्त्रे पिस्तोल, चाकु हे कुंभारी धरणाचे पाण्यात नष्ट केली. | पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे केलेले निवेदन व मेमोरंडम पंचनामा. गुन्हयातील वापरलेले शस्त्रे कुंभारी धरणाचे पाण्यातुन काढुन दिली. |

## गुन्हयाची सुनावणी प्रक्रीया :-

१) फिर्याद :- अनिल रामभाउ अधनकर यांची फिर्याद.
२) इन्कवेस्ट पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा, मेमोरंडम पंचनामा व इतर सर्व पंच यांच्या साक्षी चांगल्या झाल्या.
३) गुन्हयातील प्रत्यक्ष साक्षिदार तसेच फिर्यादी हे फितुर होऊन सुद्धा परिस्थितीजन्य पुराव्या वरुन आरोपीतांना शिक्षा झाली.
४) PM नोट्स:- पोस्ट मार्टम करणारे वैदयकीय अधिकारी पथयांनी तयार केलेली त्यात मयताचे शरीरावर जखमा कोठे कोठे व कोणत्या हत्तयाराने आल्या हा महत्त्वाचा पुरावा ठरला.
५) संबंधित मोबाईल कंपनीचे सीडीआर रिर्पोट व ते देणारे नोडल अधिकारी यांची साक्ष.
६) जप्त केलेले मयताचे रक्त, माती, यांचे सी.ए.रिर्पोट आरोपीतांविरुद्ध पुरावा झाला.
७) आरोपीतांनी ज्या पिस्तोल मधुन गोळया झाडुन मयताचा खुन केला त्या पिस्तोलचा बॅलेस्टिक रिर्पोट, ज्यात याच पिस्तोल मधुन गोळया झाडल्याचा अहवाल आल्याने तो आरोपीतां विरुद्ध एक महत्त्वपुर्ण पुरावा निष्पण्ण झाला.

## तपासातील उणीवा दुर करण्यासाठी / मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना

- यातील आरोपी मोहन ऊर्फ बल्लु हरीभाऊ मार्कंड व साक्षिदार विनायक ऊर्फ विनोद वानखडे यांचत ग्राम पंचायत, मलकापुर, अकोला येथिल जलस्वराज योजनेच्या पाईप लाइनच्या खोदकामाचे कारणा वरुन घटनेच्या अगांदर दिनांक २७/०४/२०१३ रोजी वाद झाला होता.त्या वाद नंतर विनोद वानखडे व त्याचे साथीदाराने १) मोहन हरीभाऊ मार्कंड २) निलेश रामराव काळंके ३) अविनाश सुरेशराव वानखडे यांचेवर लोखंडी पाईप, लाकडी दांडे, गुप्ती, चाकु व कुदळ अशा शस्त्रांनी प्राणघातक हल्ला केला होता.

  **मात करण्यासाठी सुचना :-** आरोपीतांवर झालेल्या प्राणघातक हल्ल्यात मयत सरपंच सिध्देश्वर गुणवंतराव देशमुख यांचाही सहभाग होता या कारणावरुन त्यांचा खुन झाला आहे.खुनास सदरची पार्श्वभुमी असुन आरोपीतांवर प्राणघातक हल्ला झाल्यानंतर प्रतिबंधात्मक कारवाई करणे गरचे आहे. तसेच गावातील गुप्त बातमीदार व पोस्टे.चे गोपनीय कर्मचारी यांना सक्रीय करुन राजकीय हालचालींवर लक्ष ठेवावे.

- प्रत्यक्षदर्शी फिर्यादी अनिल रामभाऊ अधनकर व साक्षिदार डिगांबर संतसेवा पाटील यांचे Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आले होते.केसच्या साक्षी दरम्यान दोन्ही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार फितुर झाले.

  **मात करण्यासाठी सुचना :-** सदरची घटना ही भर दिवसा रस्त्यावर घडलेली आहे. प्रत्यक्ष घटना पाहणारे आणखी साक्षीदार असण्याची दाट शक्यता आहे. तसे इतर साक्षिदार शोधुन त्यांना विश्वासात घेऊन त्यांचे जबाब नोंदऊन घ्यावेत.तसेच सदरचे साक्षिदार फितुर होणार नाहीत या करीता त्यांना योग्य ते संरक्षण पुरवावे.

## तपासातील महत्त्वाचे मुद्दे / सबळ मुद्दे

१ ) घटनास्थळावरुन मयत सिध्देश्वर देशमुख यांचा स्पोर्ट शु, पेन, चष्मा, त्यांचे सांडलेले रक्त,ओली माती, पिस्तोलच्या दोन पितळी पुंगळया,एक जिवंत काडतुस,तसेच रक्ताच्या थारोळयात पडलेली फायर कलेली बुलेट व फियादीची मोटर सायकल हया आरोपीतांची असल्याची पुराव्यानिशी निष्पण्ण झाल्याने त्यांना शिक्षा झाली.

२ ) मयत सिध्देश्वर देशमुख याचे रक्ताने भरलेले पॅन्ट, शर्ट, बनियन व अंडर वेअस तसेच एका पायातील सॉक्स, व उजव्या पायातील कॅम्पंस कंपनीचा स्पोर्ट शुज हा घटनास्थळी मिळालेला.

३ ) मयत सिध्देश्वर देशमुख याचे रक्त नमुना, पोस्ट मार्टम करतांना मयताचे शरीरात आढळलेल्या पिस्तोलच्या ३ बुलेट, तसेच शरीरावर पिस्तोल मधुन झाडलेल्या गोळी ने शरीरावरील त्या भागाचे जखमेच्या त्वचेचा नमुना यांचा अहवाल प्राप्त करुन घेतला.

४ ) प्रत्यक्षदर्शी साक्षिदार डिगांबर संतसेवा पाटील यांचे अंगावरील असलेला शर्ट व त्यावर असलेले मयताचे रक्ताचे डाग हे मयताचेच असल्याचे सी.ए. अहवाल प्राप्त झाला.

५) आरोपी मोहन मार्कंड याचा मोबाईल फोन व त्याचे सीडीआर आणि एसडीआरचा अहवाल.

६) आरोपी निलेश काळंक याचा मोबाईल फोन व त्याचे सीडीआर आणि एसडीआरचा अहवाल.

७) आरोपीताने गुन्हयात वापरलेली मोटर सायकल क्रमांक MH-30-N-6443 ही त्याचीच असल्याचे वाहनाचे मुळ कागदपत्रांवरुन सिद्ध झाली.

८) आरोपीताने गुन्हयात वापरलेली पिस्तोल देशी बनावटीची लोखंडी मॅगझिन सह त्यात एक जिवंत काडतुस व एक स्टेनलिस्टचा चाकु यांचा बॅलेस्टिक अहवाल प्राप्त झाला त्यात याच हत्त्यारांनी मयतास मरण आले असल्याचा निष्कर्षा वरुन हा भक्कम पुरावा झाला.

९) आरोपी मोहन मार्कंड याचे रक्ताचे डाग असलेले कपडे.

१०) आरोपीतांचे रक्ताचे नमुने हे त्यांचेच असल्याचे पुराव्यात निष्पण्ण झाले.

११) आरोपीतांच्या मोबाईल क्रमांकाचे सीडीआर व एसडीआर रिपोर्ट.

## तपासाचे विश्लेषण :- सुधारण्यासाठी सुचना :

१) गंभीर स्वरुपाचे गुन्हयात सरकारी पंच घेण्यात यावे. त्यामुळे दोषसिद्धिचे प्रमाण वाढते.

२) मयताचे अंगावरील कपडे जप्ती पंचनाम्यात रक्ताचे डाग कोठे आहेत, त्यांचे आकार, मार्कींग करणे गरजेचे आहे.

३) इन्कवेस्ट पंचनाम्यात जखमांचे प्रकार, आकार, स्वरुप तसेच मृत्युचे कारण त्रोटक स्वरुपात लिहु नये.

## तपास :-

गुन्हयाचा तपास प्रत्यक्ष दर्शी फिर्यादी यांनी फिर्यादी दिल्याने व घटना पाहणारे साक्षीदार हे आरोपींना ओळखत असल्याने आरोपी निष्पण्ण करण्यास अडचण निर्माण झाली नाही. आरोपींतांचा शोध घेऊन त्यांना गुनहयात अटक करण्यात आली. त्यांचे कडुन गुन्हयात वापरलेले शस्त्रे, मोटर सायकल, मोबाईल फोन तसेच मयताचे रक्त लागलेले कपडे, इत्यादी पुरावा जमा करुन बॅलेस्टिक एक्सपर्ट, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचा अहवाल प्राप्त करुन आरोपीतां विरुद्ध दोषारोप पत्र सादर केले.वैद्यकीय अधिकारी, बॅलेस्टिक अहवाल, सी.ए.अहवाल महत्त्वाचे पुरावे ठरले. यावर मा.सेशन कोर्ट अकोला यांनी आरोपीतांना शिक्षा सुनावली.

## प्रतिबंधात्मक कारवाई :-

सदर गुन्हा घडण्याअगोदर आरोपी व फिर्यादी यांचेत अगोदर ग्राम पंचायत मलकापुर, येथील जलस्वराज योजनेच्या पाईप लाईन नालीच्या खोदकामाचे कारणा वरुन भांडण झाले होते. त्यात आरोपींवर प्राणघातक हल्ला करण्यात आल्यामुळे संबंधितांवर प्रतिबंधात्मक कारवाई करावी.

## गुप्तवार्ता संकलन :-

पोलीस स्टेशनचे गोपनीय कर्मचारी / बिट अंमलदारांना हद्दीत अगोदर घडलेल्या दोन्ही पाटर्यामध्ये झालेल्या वादाचे गांर्भीर्य लक्षात घेऊन वरीष्ठांना त्या बाबत आगावु कल्पना देऊन गाव स्तरांवर बातमीदार यांना सतर्क करणे गरजेचे आहे.तसेच नविन बातमीदार तयार करण्यात यावे.

# गुन्हयाचा प्रकार :- खुन

**पोलीस स्टेशन :- कफ परेड पोलीस ठाणे**

**तालुका :- मुंबई जिल्हा :- मुंबई**

**तपासी अंमलदार :- पोलीस निरीक्षक श्री.नाफडे**

## गुन्हयाची प्राथमिक माहीती :-

१) पोलीस स्टेशन :- कफ परेड पोलीस ठाणे, मुंबई. गुरनं.१२३/२००६, क.३०२,२०१,३४ भा.दं.वि.
२) फिर्यादी :- ASI / बी.जी. घोरपडे, नेमणुक - नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई
३) आरोपी :- १) मोहम्मद मुन्ना सरदार खान
२) शहनाझ् बानु मोहम्मद मुन्ना खान
३) विधी संघर्षित बालीका
४) पिडीत :- मेहनाझ मोहम्मद मुन्ना खान
५) अ.घ.ता.वे. :- दिनांक ०२/०७/२००६ रोजी ०० : ३० वा. नंतर
ठिकाण :- रूम नं.३६७, साईबाबा मंदिरा जवळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर झोपडपट्टी, कफ परेड, मुंबई

६) थोडक्यात हकीकत :- यातील आरोपीतांची मयत मुलगी मेहनाझ हिची त्यांचे घराजवळ राहणारा मुलगा नामे विद्यानंद याचे बरोबर ओळख झाली व ओळखीचे रूंपातर प्रेमात झाले.त्यांचे प्रेमाबाबत मयताचे आई वडीलांना माहीत झाले नंतर त्यांनी त्यांचे प्रेमास व लग्नास विरोध केला. मयत व विद्यानंद हे घरातुन पळुन गेले. आरोपीतांनी त्यांना तुमचे लग्न लावुन देतो, असे सांगुन त्यांना बोलावुन घेतले. मयतास आरोपीतांनी त्यांचे घरी घेवुन जावुन रात्री गळा आवळुन ठार केले. नंतर सु-याचे सहाय्याने शरीराचे तुकडे करून घरातील दोन गोण्यामध्ये भरून ते नागपाडा पोलीस ठाणे हद्दीत नागपाडा ब्रिज जवळ ठेवुन पुरावा नष्ट केला.

## तपासाचा आराखडा / क्रमवारी :-

१) नागपाडा पोलीस ठाण्यास सुरूवातीस खुनाचा गुन्हा नोंद झाल्यानंतर तपास सुरू झाला. मयताचे मृतदेहाचे अवयवाचे फोटोग्रॉफ घेण्यात आले. मृतदेहाचे तुकडे पोस्टमार्टमसाठी पाठविण्यात आले. डॉक्टरांनी सर्व अवयव एकत्र करून मत दिले कि, सदर मृतदेह हा महिलेचा असुन गळयाभोवती गळफास देवुन मरण आले असुन इतर सर्व जखमा हया मृत्यु नंतरच्या आहे.

२) नागपाडा पोलीसांनी मृतदेह ज्या गोणीत ठेवला होता त्या गोणीवरील "उत्तम दर्जाची मसुर दाळ " व इंग्रजीतील " जी.एन. " हया अक्षराचे आधारे वाशी मार्केट मध्ये जावुन तपास केला. सदरचा माल पुरविणारे, वाहतुक करणारे, हमाल, व इतर इसमांकडे तपास करून आरोपीताचा छडा लावला.

३) आरोपीतांना सदर गुन्हयात अटक केली. सदरचा गुन्हा कफ परेड पोलीस ठाण्याचे हद्दीत घडलेला असल्याने आरोपी निष्पण्ण झाल्यानंतर पुढील तपास कफ परेड पोलीस ठाणेस वर्ग करण्यात आल्याने गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री.बी.एच.पाटील यांनी केला.

४) पोलीस निरीक्षक श्री.बी.एच.पाटील यांनी गुन्हयातील दोन्ही आरोपी अटक केल्यानंतर त्यांचे कडुन खुन कसा केला बाबत माहीती प्राप्त करून घेतली. पोस्ट मार्टम रिर्पोट, इतर साक्षिदार, व वस्तुजन्य पुराव्याचे आधारे आरोपीतांनी त्यांची मुलगी मेहनाझ हिस रात्री गळा आवळुन ठार करून सु-याचे सहाय्याने शरीराचे तुकडे करून ते घरातील बाथरूम मध्ये धुतले. त्यानंतर शरीराचे तुकडे घरातील दोन गोण्यांमध्ये भरून आरोपी क्रमांक १ याने ते सायकल वरून रात्रीचे वेळेस नागपाडा पोलीस ठाणे हद्दीत नागपाडा ब्रिजजवळ ठेवुन दिले बाबत हकीकत समोर आली. त्या अनुषंगाने ज्ञानवैज्ञानिक प्रयोग शाळे कडुनही सकारात्मक अहवाल प्राप्त झाले.

**कोर्टाचा निकाल** :- १) सेशन कोर्ट मुंबई यांनी मुख्य आरोपी १) मोहम्मद मुन्ना सरदार खान

२) शहनाझ् बानु मोहम्मद मुन्ना खान यांना जन्मठेप व १०००/-रू.दंड. व दंड न भरल्यास एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली.

३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी आरोपीतांना दिलेली शिक्षा कायम ठेवली.

## पुराव्याचे स्वरूप :-

१ ) साक्षिदार / तोंडी पुरावा Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब

फिर्याद :- ASI / बी.जी. घोरपडे, नेमणुक - नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई यांनी दिलेली.

विद्यानंदचा चुलत भाउ राजेंद्रचा जबाब.

श्रीमती अल्का जाधव यांचा जबाब.

वाशी मार्केट मधिल वाहतुक करणारे, संबधित व्यापारी, हमाल यांचे जबाब.

डॉ.चिखलीकर, पोस्ट मार्टेम करणारे वैदयकीय अधिकारी यांनी तयार केलेली PM नोट्स.

२) कागदपत्रीय पुरावा

PM **नोट्स**:- पोस्ट मार्टम करणारे वैदयकीय अधिकारी यांनी तयार केलेली.

३) इतर पुरावे. :- कॅलेंडर ऑफ इव्हीडंस ( आरोपीताचा पुरावा तक्ता )

| अ क्र. | आरोपीताचे नाव | आरोपीचा गुन्हयातील सहभाग / कृती | आरोपी विरूद्ध पुरावा |
|---|---|---|---|
| १ | मोहम्मद मुन्ना खान सरदार खान | त्यांची मुलगी मेहनाझ हिस रात्री गळा आवळुन ठार करून सु-याचे सहाय्याने शरीराचे तुकडे करून ते घरातील बाथरूम मध्ये धुतले. त्या नंतर शरीराचे तुकडे घरातील दोन गोण्या यांमध्ये भरून आरोपी क्रमाक १ याने ते सायकल वरून रात्रीचे वेळेस नागपाडा पोलीस ठाणे हद्दीत नागपाडा ब्रिज जवळ ठेवुन दिले | १. आरोपीताने त्याचे दुकानातील वापरात असलेल्या गोण्या वापरल्या , ज्यावर " उत्तम दर्जाची मसुर दाळ " व इंग्रजीतील " जी.एन. "लिहीलेले परिस्थिती जन्य पुरावा.<br>२. कफ परेड पो.स्टे.ला आरोपीने अर्जावरून दिलेला तोंडी जबाब.<br>३. त्या वेळेस अर्जावर सहया केलेले इतर साक्षिदार. |
| २ | शहनाझ मोहम्मद मुन्ना खान सरदार खान | आरोपी नं.१ सह त्यांची मुलगी मेहनाझ हिचा गळा दाबुन मारून तिचे शरीराचे तुकडे सु-याने करण्या करीता व प्रेताची विल्हेवाट लावण्या करीता मदत केली. | वरील प्रमाणे. |

## गुन्हयाची सुनावणी प्रक्रीया :-

१) सुनावणीदरम्यान इतर प्रत्यक्षदर्शी साक्षिदार नसल्याने केस वस्तुजन्य पुरावे व परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारीत आहे.

२) शवविच्छेदन करणारे डॉक्टर श्री.चिखलीकर यांनीही त्यांचे साक्षीत मयत मुलीस सुरूवातीस गळा दाबुन ठार मारल्याचे व त्यानंतर तिचे शरीराचे तुकडे केल्याबाबत नमुद केले.

३) साक्षिदार, पंच, भौतिक पुरावे, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळेतील तंत्रज्ञ यांची साक्ष महत्त्वाची ठरली.

४) मा.न्यायालयाने गुन्हयाचा उद्येश, शेवटी बघितल्याचा पुरावा, ज्या गोण्या मध्ये मृतदेहाचे तुकडै मिळाले त्या गोण्या आरोपींचे दुकानात पोहोचविल्याबाबतचा पुरावा. आरोपींची गुन्हया अगोदरची व नंतरची वर्तणुक इत्यादी बाबी सिद्ध होत असल्याने त्या आधारे दोन्ही आरोपींना दिनांक ११/०७/२००८ रोजी दोषसिद्ध ठरविले.

## तपासातील उणीवा दुर करण्यासाठी / मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना

यातील मयत व आरोपी हे अज्ञात होते. त्यांचा शोध घेऊन तपास करणे हे मुंबई सारख्या महानगरात खुप अडचणीचे व आव्हानाचे काम होते.

**मात करण्यासाठी सुचना :-** कायदेशीर कार्यकक्षा जाणुन तपास सुरू ठेवायचा. तसेच संयम राखुन काम करायचे.घटनास्थळा वरील वस्तुंचा, आजुबाजुच्या परिसराचा तसेच मयताचे अंगावरील जिन्नस, वस्तु, तसेच कपडयांवरुन मयताची ओळख काढण्याचा प्रयत्न करावा.

## तपासातील महत्त्वाचे मुद्दे / सबळ मुद्दे

१ ) गुन्हयात प्रत्यक्षदर्शी साक्षिदार नसल्याने सदरचा गुन्हा परिथितीजन्य व भौतिक पुराव्यावर सदरची केस आहे.

२) गुन्हयातील आरोपी व मयत अज्ञात असुन पोलीसांनी तपास करुन मयत व अज्ञात आरोपीतांचा शोध लावला. त्यांचे विरुद्ध पुरावा गोळा करण्यात आला.

३ ) आरोपीने मयताचे तुकडे ज्या गोण्यांमध्ये भरले होते त्या गोण्यांवर लिहीलेले अक्षरांचे सहाय्याने वाशी मार्केट मधिल माल पुरविणारे, वाहतुक करणारे, हमाल यांना विचारपुस करुन त्यांचे जबाब नोंदविल्याने त्यांनी आरोपीतां बाबत माहीती दिली. त्यांनी त्यांचे जबाबा प्रमाणे साक्ष दिल्याने आरोपीतां शिक्षा झाली.

४ ) पोस्टमार्टेम करणारे वैदयकीय अधिकारी यांची साक्ष चांगली झाली.

५ ) न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळेतिल तंत्रज्ञ यांची साक्ष महत्त्वाची ठरली.

६ ) इतर परिस्थितीजन्य व भौतिक पुरावे महत्त्वाचे ठरले.

# गुन्हयाचा प्रकार :- मकोका.

**पोलीस स्टेशन :- कोतवाली पोलीस ठाणे.**

**तालुका :- अमरावती.**

**जिल्हा :- अमरावती शहर.**

**तपासी अंमलदार :-**

**१) सहा.पो.आयुक्त श्री.श्रीकांत महाजन**

**२) पोलीस निरीक्षक श्री.शिरभाते**

## गुन्हयाची प्राथमिक माहीती :-

७) पोलीस स्टेशन :- कोतवाली पोलीस ठाणे,अमरावती शहर.
गुरनं.३२५/२०१० ,भादवि क. ३९५,३९७,४१२,४१४,१२० ब.
महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी अधिनियम क.३, ४
भारतीय हत्यार कायदा क. ३ , ४ / २५

८) फिर्यादी :- किशोर पोहेकर - खंडेलवाल ज्वेलर्स येथे काम करणारा कर्मचारी

९) आरोपी :- १) दिलीप ऊर्फ दिल्या रामराव कोरडे वय ३० वर्ष , धंदा - मजुरी, रा.भांडेगांव ताो.जि.हिंगोली
२) जन्या ऊर्फ जनार्दन रामराव वाघमारे ऊर्फ राजेश साने वय २७ वर्ष, धंदा - मजुरी , रा.भांडेगांव ,ताो.जि.हिंगोली.
३) रफीक शेख नाबी शेख ऊर्फ शेखर प्रशांत पाटील ऊर्फ रॉबर्ट जॉन डिसुजा वय ३८ वर्ष ,धंदा- मजुरी, रा.राणीबेन्नुर ,जि.हावेरी, कर्नाटक राज्य.
४) अनिल भगवान मोहनकर वय २५ वर्ष, धंदा- मजुरी, रा.सिंधी कॅम्प जवळ, आर्वी ,जि. वर्धा
५) दिलीप ऊर्फ काल्या किसनराव वाघ वय ४० वर्ष,धंदा - मजुरी रा. सुलतानपुरा, मोर्शी, जि.अमरावती
६) ओमप्रकाश ऊर्फ ओम्या भारत भटकर वय २५ वर्ष धंदा -मजुरी ,रा. भगीरथवाडी, अकोला, ताो.जि.अकोला.
७) शिवाजी विठ्ठल भोसले ऊर्फ भोला वय २८ वर्ष,धंदा-मजुरी रा.बोरखेडी,ताो.शेणगांव, जि.हिंगोली
८) नसरीन बानो रफीक शेख वय ३५ वर्ष धंदा-मजुरी रा.गांधीनगर,हारीहर, धावलगीरी,कर्नाटक राज्य
९) शेख सलीम शेख फरीद वय ३९ वर्ष धंदा-मजुरी रा.गैबीपुरा रोड,रिसोड, जि.वाशीम
१०) सौ.अंजली ऊर्फ आरती जनार्दन वाघमारे वय २६ वर्ष धंदा-मजुरी रा.भांडेगांव, ताो.जि.हिंगोली.
११) तान्या ऊर्फ तानाजी विठ्ठल भोसले ऊर्फ भोले वय २७ वर्ष धंदा-मजुरी रा.बोरखेडी ताो.शेणगांव जि.हिंगोली.

४) पिडीत :- दिपक खंडेलवाल

५) अ.घ.ता.वे. :- दिनांक ३१/०८/२०१० रोजी १४ : ०० वा.

ठिकाण :- खंडेलवाल ज्वेलर्स, जय स्तंभ चौक, अमरावती.

६) थोडक्यात हकीकत :- वरील तारखेस वेळी व ठिकाणी अमरावती शहरातील खंडेलवाल ज्वेलर्स, शोरूमध्ये ज्वेलरी शॉपचे मालक दिपक खंडेलवाल हे त्यांचे कर्मचारी यांचे सह काम करीत असतांना तीन इसम ग्राहक म्हणुन दुकानात शिरले.त्यापैकी एक जण मोठे पोट असलेला व दाढी असलेला हा अंगठी घेण्याचे बहाण्याने ट्रायल घेत होता.तेवढयात त्याने एक १० सेकंदाचा मोबाईल कॉल रिसीव्ह केला.कॉल संपताच इतर तीन इसम दुकानात येवुन एकाने गेटवरील व्यक्तीची मान दाबली, दुस-याने दुकान मालकावर चाकुचा वार केला. इतर दरोडेखोरांनी पिस्तोल व इतर शस्त्रांचा धाक दाखवुन ८२ सोन्याच्या बांगडया, अंदाजे ५० लाख रू.किं.चा माल लुटून दोन मोटर सायकलीवर पळुन गेले.

७) दोषारोप क्रमांक :- ३९ / २०११ दिनांक ०४/०३/२०११

**८) कोर्टाचा निकाल :-**

१ ) मा.विशेष न्यायालय, अमरावती यांनी आरोपी क्रमांक २- जनार्दन वाघमारे , आरोपी क्रमांक ३ - मोठे पोट असलेला व दाढी असलेला रफीक शेख, आरोपी क्रमांक ४ -अनिल मोहनकर, आरोपी क्रमांक ५- दिलीप वाघ, आरोपी क्रमांक ६- ओमप्रकाश भटकर, व आरोपी क्रमांक ११-तानाजी भोसले ऊर्फ भोले यांना दोषी ठरवुन महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (प),(पप), ३(२),३ (४) अन्वये व कलम ३९७, १२० ब प्रमाणे शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

२) आरोपी क्रमांक २, ३, ११ यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (प),(पप) अन्वये दोषी ठरवुन १२ वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व ५ लाख रूपये प्रत्येकी दंड व दंड न भरल्यास २ वर्षाच्या अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

३) आरोपी क्रमांक ४ ते ६ यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (प),(पप) अन्वये दोषी ठरवुन १० वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व ५ लाख रूपये प्रत्येकी दंड व दंड न भरल्यास २ वर्षाच्या अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

४) आरोपी क्रमांक २ ते ६, ११ यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (२) अन्वये दोषी ठरवुन ०५ वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व ५ लाख रूपये प्रत्येकी दंड व दंड न भरल्यास २ वर्षाच्या अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

५) आरोपी क्रमांक ४ ते ६ यांना भारतीय हत्त्यार कायदा कलम ३, ४ / २५अन्वये दोषी ठरवुन ०१ वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व ५ हजार रूपये प्रत्येकी दंड व दंड न भरल्यास २ महिने अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

६) आरोपी क्रमांक ८ नसरीन बानो रफीक शेख यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (५) अन्वये दोषी ठरवुन ०४ वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व २ लाख रूपये दंड व दंड न भरल्यास ९ महिन्याच्या अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

७) आरोपी क्रमांक १० अंजली जनार्दन वाघमारे यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (५) अन्वये दोषी ठरवुन ०४ वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व २ लाख रूपये दंड व दंड न भरल्यास ९ महिन्याच्या अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

८) आरोपी क्रमांक १- दिलीप रामराव कोरडे, आरोपी क्रमांक ७- शिवाजी विठ्ठल भोसले ऊर्फ भोला तसेच आरोपी क्रमांक शेख सलीम शेख फरीद यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (५) अन्वये निर्दोष सुटका करण्यात आली आहे.

**समरी :- ०८ आरोपी दोषी व ०३ आरोपी निर्दोष**

## तक्रार / फिर्यादीची थोडक्यात हकीकत :-

दिनांक ३१/०८/२०१० रोजी १४:०० वा.चे सुमारास अमरावती शहरातील खंडेलवाल ज्वेलर्स या नावाने असलेल्या ज्वेलरी शॉप मध्ये ज्वेलरी शॉपचे मालक दिपक खंडेलवार हे त्यांचे कर्मचारी यांचे सह काम करीत असतांना तीन इसम ग्राहक म्हणुन दुकानात शिरले. त्यापैकी एक जण मोठे पोट असलेला व दाढी असलेल्या इसम ( जो तपासअंती आरोपी क्रमांक ३- रफीक शेख नाबी शेख ऊर्फ शेखर प्रशांत पाटील ऊर्फ रॉबर्ट जॉन डिसुजा वय ३८ वर्ष धंदा- मजुरी, रा.राणीबेन्नुर, जि.हावेरी,कर्नाटक म्हणुन निष्पण्ण झाला ) हा दुकानातुन अंगठी घेण्याच्या बहाण्याने ट्रायल घेत होता.तेवढयात त्याने १० सेकंदाचा एक मोबाईल कॉल रिसीव्ह केला.कॉल संपल्या नंतर इतर तिन इसम दुकानात आले. एकाने गेटवरील व्यक्तीची मान दाबली, दुस-याने दुकान मालकावर चाकुचा वार केला. इतर दरोडेखोरांनी दुकानात काम करणारे नोकर आणि दुकान मालक यांना पिस्तोल व इतर शस्त्रांचा धाक दाखवुन त्यांना दुकानातील शेजारच्या दुस-या खोलीत नेले.आणि ८२ सोन्याच्या बांगडया, अंदाजे ५० लाख रू.किं.चा माल लुटून दोन मोटर सायकलीवर पळुन गेले.

## तपासाचा आराखडा / क्रमवारी :-

१२)गुन्हा घडल्यानंतर लागलीच तपासी अंमलदार पोलीस निरीक्षक श्री.शिरभाते यांनी घटनास्थळाला भेट देवुन घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळावरील सिसिटीव्ही फुटेज पाहुन चार संशयीत आरोपीतांचे स्थिरचित्र बनविले.

१३)गुन्हा घडल्यानंतर लागलीच मोबाईल कंपन्यांकडुन घटनेच्या दिवसाचे सिडीआर घेण्यात आले. त्यात विशेषत १० सेकंदाच्या कॉलचा अभ्यास करून व्होडाफोन टावर आयडी २२२११ वरून घटनेच्या वेळी मोबाईल नंबर १) ७७९८० ६५१०६ मोबाईल नंबर २) ९५४५६ १५४१५ या दोन मोबाईल क्रमांकावर १० सेकंदाचा कॉल केलेला दिसुन आला.

१४) त्याच प्रमाणे त्याच टावर अंतर्गत मोबाईल क्रमांक ७७९८० ६५१३४ या मोबाईल क्रमांकाचा वरील दोन्ही क्रमांकाबरोबर संपर्क होता.व घटना घडल्या नंतर लागलीच हे तिन्ही मोबाईल क्रमांक हे टावरच्या कक्षेच्या बाहेर होते. त्या तिन्ही क्रमांकाचे मेलद्वारे नाव, पत्ता, व सीडीआर प्राप्त केला.

१५) या मोबाईल क्रमांकावरून आयएमईआय क्रमांक काढुन त्यांचे इतर आरोपी मोबाईल धारकांचे संबध व लोकेशन काढण्यात आले.व आरोपी ज्या दिशेन पळुन गेले त्या परिसरात आरोपींतांचा शोध घेण्यात आला.

१६) हे तिन्ही मोबाईल फक्त एकमेकांशी व मोबाईल क्र.९७६३२ ८५२२९ या मोबाईल क्रमांकाशीच संपर्कात होते. व त्या वरून आरोपी क्रमांक ३ - रफीक शेख नाबी शेख ऊर्फ शेखर प्रशांत पाटील ऊर्फ रॉबर्ट जॉन डिसुजा वय ३८ वर्ष धंदा- मजुरी,रा.राणीबेन्नुर, जि.हावेरी,कर्नाटक हा निष्पण्ण झाला.

१७) नमुद चारही मोबाईल क्रमांकाचे गुन्हयापुर्वी, गुन्हा करते वेळी, व गुन्हा घडल्या नंतर काही कालावधीकरीता चालु राहणे, व नंतर बंद होणे असे होत असल्याने संशय बळावला. म्हणुन या चारही क्रमांकाचे सीडीआर मधिल आयएमईआय नंबर वरून आरोपी १) दिलीप ऊर्फ किसनराव वाघ २) तानाजी विठ्ठल भोसले ऊर्फ भोले हे निष्पण्ण झाले. त्यांना ओळखणा-यांचे जबाब नोंदविण्यात आले.

१८) तसेच सुरवाडी ताो.तिवसा, जि.अमरावती येथे गेलेल्या तपास पथकाने आरोपी दिलीप ऊर्फ किसनराव वाघ याचे घरी जावुन त्याचा शोध घेतला.परंतु तो मिळुन आला नाही.त्याचे घरात एका मोबाईल हॅण्डसेटचा रिकामा बॉक्स मिळुन आला.त्याचे पत्नीस सीसीटीव्ही फुटेज दाखविले असता तिने पतीस ओळखले.पतीस आरोपी जनार्दन रामराव वाघमारे ऊर्फ राजेश साने रा.ताो. भांडेगांव जि.हिंगोली हा सोबत घेवुन गेला असल्याचे त्यास ओळखल्याने त्या भागात गेलेल्या पोलीस तपास पथकात माहीती देण्यात आली. त्या अन्वये तेथुन आरोपी दिलीप रामराव कोरडे यास ताब्यात घेवुन सिसिटीव्ही.फुटेज दाखविले, असता त्याने उर्वरीत आरोपींची माहीती दिल्याने इतर दरोडेखोर निष्पण्ण झाले.

१९)त्याअनुषंगाने कर्नाटक मधिल पथकाने आरोपी जनार्दन रामराव वाघमारे व रफीक शेख नाबी शेख यांना राणेबेन्नुर,जि.हवेली येथुन ताब्यात घेण्यात आले.त्या नंतर बुलढाणा येथुन अनिल भगवान मोहनकर ,आरोपी दिलीप किसनराव वाघ,आरोपी ओमप्रकाश भारत भटकर यांना ताब्यात घेण्यात आले.तपासाअंती त्यांचे कडुन अग्नीशस्त्र व एक जिवंत काडतुस जप्त करण्यात आले.

२०) इतर आरोपीतांचा शोध पथकामार्फत तपास करण्यात येवुन विविध ठिकाणाहुन आरोपी व दरोडयातील लुटुन नेलेला माल हस्तगत करण्यात आला.

२१) दरोडयातील आरोपी यांना या स्वरूपाचे गुन्हे करण्याची सवय व सराईत असल्याची व त्यापैकी काही आरोपीतांनी महाराष्ट्र राज्यात इतर ठिकाणी अशा प्रकारचे गुन्हे केलेले आहेत.व अशा गुन्हयांची संबंधीत न्यायालयाने दखल सुद्धा घेतली आहे.त्यांची गुन्हेगारी संघटना असल्याचे दिसुन आल्या वरून सदर गुन्हयात आरोपीतांविरूद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (प),(पप), ३(४),३ (५) हे वाढवुन लावण्याल आले.

११) दोषारोप क्रमांक :- ३९ / २०११ दिनांक ०४/०३/२०११

## ८) कोर्टाचा निकाल :-

१ ) मा.विशेष न्यायालय, अमरावती यांनी आरे ापी क्रमांक २- जनार्दन वाघमारे , आरोपी क्रमांक ३ - मोठे पोट असलेला व दाढी असलेला रफीक शेख, आरोपी क्रमांक ४ -अनिल मोहनकर, आरोपी क्रमांक ५- दिलीप वाघ, आरोपी क्रमांक ६- ओमप्रकाश भटकर, व आरोपी क्रमांक ११-तानाजी भोसले ऊर्फ भोले यांना दोषी ठरवुन महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (प),(पप), ३(२),३ (४) अन्वये व कलम ३९७, १२० ब प्रमाणे शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

२) आरोपी क्रमांक २, ३, ११ यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (प),(पप) अन्वये दोषी ठरवुन १२ वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व ५ लाख रूपये प्रत्येकी दंड व दंड न भरल्यास २ वर्षाच्या अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

३) आरोपी क्रमांक ४ ते ६ यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (प),(पप) अन्वये दोषी ठरवुन १० वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व ५ लाख रूपये प्रत्येकी दंड व दंड न भरल्यास २ वर्षाच्या अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

४) आरोपी क्रमांक २ ते ६, ११ यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (२) अन्वये दोषी ठरवुन ०५ वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व ५ लाख रूपये प्रत्येकी दंड व दंड न भरल्यास २ वर्षाच्या अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

५) आरोपी क्रमांक ४ ते ६ यांना भारतीय हत्त्यार कायदा कलम ३, ४ / २५अन्वये दोषी ठरवुन ०१ वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व ५ हजार रूपये प्रत्येकी दंड व दंड न भरल्यास २ महिने अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

६) आरोपी क्रमांक ८ नसरीन बानो रफीक शेख यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (५) अन्वये दोषी ठरवुन ०४ वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व २ लाख रूपये दंड व दंड न भरल्यास ९ महिन्याच्या अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

७) आरोपी क्रमांक १० अंजली जनार्दन वाघमारे यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (५) अन्वये दोषी ठरवुन ०४ वर्ष कठोर कारावासाची शिक्षा व २ लाख रूपये दंड व दंड न भरल्यास ९ महिन्याच्या अधिकच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

८) आरोपी क्रमांक १- दिलीप रामराव कोरडे, आरोपी क्रमांक ७- शिवाजी विठ्ठल भोसले ऊर्फ भोला तसेच आरोपी क्रमांक शेख सलीम शेख फरीद यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (५) अन्वये निर्दोष सुटका करण्यात आली आहे.

## पुराव्याचे स्वरूप :-

१ ) साक्षिदार / तोंडी पुरावा Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब

फिर्याद :- किशोर पोहेकर यांनी दरोडयाची दिलेली.
साक्षिदारांचे जबाब.
फोटोग्राफर यांचा जबाब.
फिंगर प्रिंट एक्सपर्ट यांचा जबाब.

२) कागदपत्रीय पुरावा

घटनास्थळाचा पंचनामा.
सिसिटीव्ही फुटेज व त्या वरून बनविलेले संशयीत आरोपीतांचे स्थिरचित्र.
ज्वेलर्स दुकानातील घटनेच्या दिवशीचा, दरोडयापुर्वी दुकानातील साठा व दरोडया नंतरचा साठा, तसेच इतर ग्राहकांना विकलेला माल याचे संपुर्ण अभिलेख.
फिंगर प्रिंट एक्सपर्ट यांचा अहवाल
दुकान मालक दिपक खंडेलवाल यांना दरोडेखोरांनी केलेल्या दुखापतीचे प्रमाणपत्र.
आरोपीतांकडुन जप्त करण्यात आलेले सोन्याचे दागिने,मालाचा जप्ती पंचनामा.
आरोपीतांनी गुन्हयात वापरलेली मोटर सायकलचा जप्ती पंचनामा.
आरोपीतांनी गुन्हयात वापरलेल्या पिस्तोलचा जप्ती पंचनामा.
सिसिटीव्ही फुटेजचे कॉम्प्युटरची हार्ड डिस्क.
सिसिटीव्ही फुटेजचे रेकॉर्डेड सिडी कॉपी

३) हस्ताक्षर तज्ञ अहवाल

हस्ताक्षर तज्ञ यांचा अहवाल :- सिसिटीव्ही फुटेज मध्ये आरोपी ज्या ठिकाणी उभे होते,त्या ठिकाणचे घेण्यात आलेले फिंगरप्रिंट.

इतर पुरावे. :- कॅलेंडर ऑफ इव्हीडंस ( आरोपीताचा पुरावा तक्ता )

| अ क्र. | आरोपीताचे नाव | आरोपीचा गुन्हयातील सहभाग / कृती | आरोपी विरूद्ध पुरावा |
|---|---|---|---|
| १ | दिलीप ऊर्फ दिल्या रामराव कोरडे | आरोपी जन्या ऊर्फ जनार्दन रामराव वाघमारे याने लुटीचे मालाचे विक्रीचे पैशातुन दिलेल्या नगदी रकमेतुन साक्षिदार बळीराम जगताप याचे नावावर वाशीम येथील शोरूम मधुन नविन हिरो होंडा मोटर सायकल विकत घेतली. | १. साक्षिदार-बळीराम जगताप यांचा जबाब<br>२. मोटर सायकल खरेदीचे सर्व कागदपत्रे<br>३. विकत घेतलेली मोटर सायकल.<br>**निर्दोष** |
| २ | जन्या ऊर्फ जनार्दन रामराव वाघमारे ऊर्फ राजेश साने | गुन्हेगारी संघटना तयार केली. आरोपी क्रमांक ३ ते ६ व ११ यांचे सह कट करून खंडेलवाल ज्वेलर्स, येथे चाकु,पिस्तोल चा धाक दाखवुन दरोडा घातला.व दुकान मालक दिपक खंडेलवाल यांना गंभीर दुखापत केली. | १. सिसिटीव्ही फुटेज<br>२. साक्षिदारांचे जबाब.<br>३. जप्त अग्निशस्त्र पंचनामा. |
| ३ | रफीक शेख नाबी शेख ऊर्फ शेखर प्रशांत पाटील ऊर्फ रॉबर्ट जॉन डिसुजा | -- ׀ ׀-- | -- ׀ ׀-- |
| ४ | अनिल भगवान मोहनकर | -- ׀ ׀-- | -- ׀ ׀-- |
| ५ | दिलीप ऊर्फ काल्या किसन राव वाघ | -- ׀ ׀-- | -- ׀ ׀-- |
| ६ | ओमप्रकाश ऊर्फ ओम्या भारत भटकर | -- ׀ ׀-- | -- ׀ ׀-- |
| ७ | शिवाजी विठ्ठल भोसले ऊर्फ भोला | आरोपी क्र.९ यास चोरीच्या काही बांगडया गोंविद वर्मा नावाचे सोनाराला विकण्या साठी दिल्या. | **निर्दोष** |
| ८ | नसरीन बानो रफीक शेख | आ.क्र.३ ची पत्नी असुन दरोडयाचे लुटीतील माल जो आरोपी क्र.३ चे वाटयाला आलेला तो सोनाराकडे गहाण | १. जप्त करण्यात आलेले सोन्याचे दागिने<br>२. ज्या सोनाराकडे दागिणे गहाण ठेवले त्या सोनाराचा जबाब.<br>३. गहाण ठेवलेल्या दागिन्यांवर दिपक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | टाकला व काही सान्याचे बांगडया बनविले. | खंडेलवाल यांचे दुकानाचे विशेष खुन असलेले चिन्ह. |
| ९ | शेख सलीम शेख फरीद | आरोपी क्र.७ याने चोरीच्या काही बांगडया गोंविद वर्मा नावाचे सोनाराला विकल्या. | **निर्दोष** |
| १० | सौ.अंजली ऊर्फ आरती जनार्दन वाघमारे | आ.क्र.२ ची पत्नी असुन दरोडयाचे लुटीतील माल जो आरोपी क्र.२ चे वाटयाला आलेला तो जमिनीत लपवुन ठेवला. सोन्याचे बांगडया बनविले. | १. जप्त करण्यात आलेले सोन्याचे दागिने |
| ११ | तान्या ऊर्फ तानाजी विठ्ठल भोसले ऊर्फ भोले. | आरोपी क्रमांक २ ते ६ यांचे सह कट करून खंडेलवाल ज्वेलर्स, येथे चाकु,पिस्तोलचा धाक दाखवुन दरोडा घातला.व दुकान मालक दिपक खंडेलवाल यांना गंभीर दुखापत केली. | १. सिसिटीव्ही फुटेज<br>२. साक्षिदारांचे जबाब.<br>३. जप्त अग्निशस्त्र पंचनामा. |

## गुन्हयाची सुनावणी प्रक्रीया :-

१) फिर्यादी दिपक खंडेलवाल यांची साक्ष चांगली झाली.

२) ज्वलर्स दुकानातील काम करणारे नोकर यांनी CCTV फुटेज बघुन आरोपींताचे सांगितलेल्या वर्णनावरुन त्यांचे बनविण्यात आलेले स्थिरचित्रा वरुन आरोपीतांना त्यांनी ओळखल्याने त्यांची साक्ष महत्तवाची ठरली.

३) ज्वेलर्स दुकनातील सिसिटीव्ही फुटेज असलेली दुकानातील कॉम्प्युटरची हार्ड डिस्क ज्यात आरोपीतांनी दरोडा टाकतांना चित्रीत झालेले चित्रिकरण त्यांचे विरुद्ध पुरावा ठरला

४) सिसिटीव्ही फुटेजचे रेकॉर्डेड सिडी कॉपी तयार करुन मा.कोर्टात सादर करण्यात आली.

५) आरोपी ज्वेलर्सचे दुकानात ज्या ठिकाणी उभे होते त्या ठिकाणाचे फिंगर प्रिंट एक्सपर्ट यांचा अहवाल

६) इतर साक्षिदार असे एकुण सर्व ५५ साक्षिदार व सर्व पंचनाम्यातील पंच यांच्या साक्षी महत्तवाचे ठरल्या.

## तपासातील उणीवा दुर करण्यासाठी / मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना

- यातील आरोपी क्रमांक ७ शिवाजी भोसले आणि आरोपी क्रमांक ११ तानाजी भोसले हे नात्याने भाउ भाउ आहेत. आरोपी शिवाजी भोसले हा आरोपी क्रमांक ९ शेख सलीम यांचे कडे जाउन लुटीतील बांगडया दिल्या.व शेख सलीम याने गोंविद वर्मा या सोनाराला विकल्या.

**मात करण्यासाठी सुचना :-** सदर व्यवहार हा त्यांचे आपआपसात झाला असल्याने त्याबाबत काही एक पुरावा उपलब्ध झालेला नसल्याने पुरावा कायदा क.२७ प्रमाणे आरोपीचे निवेदन घेवुन मेमोरंडम पंचनामा करता आला असता.

- आरोपी जन्या ऊर्फ जनार्दन रामराव वाघमारे याने लुटीचे मालाचे विक्रीचे पैशातुन दिलेल्या नगदी रकमेतुन साक्षिदार बळीराम जगताप याचे नावावर वाशीम येथील सोहम ॲटोमोबाईल्स, शोरूम मधुन नविन हिरो होंडा मोटर सायकल विकत घेतली.

**मात करण्यासाठी सुचना :-** सोहम ॲटोमोबाईल्स,शोरूम मालकाचा व शोरूम मधिल इतर संबंधित कर्मचारी याचा जबाब नोंदविता आला असता. तसेच त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले असतील तर मोटार सायकल घेण्यास कोण कोण आले होते,याबाबत माहीती मिळु शकली असती. सदरची मोटर सायकल आरोपी क्र.१ दिलीप रामराव कोरडे यानेच खरेदी केली होती काय ? या बाबत अधिक पुरावा उपलब्ध करता आला असता.

- नमुद गुन्हयातील टोळी प्रमुख जान्या ऊर्फ जनार्दन रामराव वाघमारे ऊर्फ राजेश माने याने विलासनगर येथील बिच्छुनगर या भागात रूम भाडयाने घेवुन तिन साथिदारांसह राहु लागला.आरोपी रफीक नाबी शेख याने दुकानात जावुन रेकी केली.त्या करीता यवतमाळ व नागपुर येथुन दोन मोटार सायकल चोरून आणल्या.

**मात करण्यासाठी सुचना :-** आरोपी जनार्दन रामराव वाघमारे ऊर्फ राजेश माने याने ज्या ठिकाणी भाडयाने रूम घेवुन राहीला. त्या ठिकाणी असलेल्या पोलीस ठाण्यास संबंधित घरमालकाने घर भाडयाने दिल्याची माहिती पोलीस ठाण्यास देणे आवश्यक होते.तसेच शहर वाहतुक शाखा, स्थानिक पोलीस ठाणे कडील कर्मचारी यांचे सह गुन्हे शाखे कडील कर्मचारी यांचे मदतीने विविध ठिकाणी, वेगवेगळया दिवशी / वेळी नाकाबंदी लावण्यात यावी.

## तपासातील महत्त्वाचे मुद्दे / सबळ मुद्दे

१ ) यातील फिर्यादी किशोर पोहोकार यांनी घटने नंतर दिलेली ०६ आरोपींनी ७९ सोन्याच्या बांगडया लुटुन नेल्याची फिर्याद न्यायालयात सिद्ध झाली.

२ ) पोलीस तपासी अंमलदार पोलीस निरीक्षक श्री. शिरभाते यांनी तात्काळ घटनास्थळाला भेट देवुन घटनास्थळ पंचनामा तयार केला. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज मध्ये हे सर्व सामिल असल्याने घटनास्थळ पंचनामा न्यायालयात सिद्ध झाला.

३ ) घटनेनंतर लागलीच पोलीस पोहोचल्याने सीसीटीव्ही फुटेज पाहुन संशयीतांचे स्थिरचित्र तयार करण्यात आली. व ती वेगवेगळया प्रकारात प्रकाशित करण्यात आली.

१०) फुटेज मध्ये १० सेकंदासाठी आलेल्या फोन कॉल मुळे सर्व मोबाईल कंपन्यांचे संबंधित दिवसाचे घटनेच्या वेळेचे रेकॉर्ड मागविण्यात आले.त्यावरून आरोपीतांचा शोध घेवुन तपास करण्यात आला.व आरोपीतांना अटक करण्यात येवुन दरोडयातील लुटुन नेलेला माल हस्तगत करण्यात आला.

५) आरोपीताचे घटनास्थळी घेतलेले फिंगरप्रिंटचा अहवाल वरुन आरोपी घटनेच्या दिवशी ज्वेलर्सचे दुकानात होते हे सिद्ध झाले.

६) १७ सीसीटीव्ही कॅमेरे मध्ये झालेले चित्रीकरणच्या फुटेज चा उत्तम पुरावा.ज्यात ज्वेलर्सच्या दुकानात प्रवेश करणा-या सर्व आरोपींना स्पष्टपणे त्यांच्या जवळच्या नातेवाईकांनी ओळखले. आणि हे न्यायालयात सिद्ध झाले.

७) खंडेलवाल ज्वेलसमधिल कॉम्प्युटरचा सीपीयु , हार्ड डिस्क, जप्त केल्याने घटनेच्या दिवशीची सीडी कॉपी करण्यात आली, त्यावेळी कॉम्प्युटर योग्य रितीने काम करीत होता.जप्त सीडी, हार्ड डिस्कच्या माहीतीशी जुळवुन पाहण्यात आली. त्यामुळे सीसीटीव्ही फुटेज पुरावा म्हणुन सर्व कायदेशीर पुर्तता केली गेली.

## तपासाचे विश्लेषण :-

१) सुधारण्यासाठी सुचना :-

(१) घटनेच्या दिवशी सीसीटीव्ही फुटेज नुसार आरोपी क्रमांक २- जनार्दन वाघमारे, आणि आरोपी क्रमांक ८-ओमप्रकाश भटकर यांच्या हातात पिस्तोल होते,असे दिसले.त्यापैकी एकच पिस्तोल जप्त करण्यात आले.

२) **तपास :-** गुन्हा घडल्या नंतर लागलीच सेल आयडी. ट्रॅकरच्या मदतीने घटनास्थळावरील मोबाईल सेवा पुरविणा-या सर्व मोबाईल कंपन्यांचे टॉवर आयडी. घेण्यात आली.त्यावरून सर्व कॉलचे सीडीआर घेवुन त्यातील विशेषतः दुपारी ०२:०० ते ०३:०० वा.दरम्यान १० सेकंदाचा आलेला कॉलची माहीती काढण्यात आली.त्यात व्होडाफोन कंपनीचे टॉवर आयडी २२२११ वरून वरून घटनेच्या वेळी ज्वेलर्स शॉप दुकानात असलेले मोबाईल नंबर (१) ७७९८० ६५१०६ (२) ९५४५६१५४१५ या दोन मोबाईल क्रमांकवर १० सेकंदाचा कॉल दिसुन आल्याने मोबाईल क्रमांक (३) ७७९८० ६५१३४ याचा वरील दोन्ही मोबाईल क्रमांकाशी संपर्क असल्याचे आढळुन आले. तिन्ही क्रमांकाचे मेलद्वारे नाव, पत्ता, व सीडीआर प्राप्त केला. त्या वरून आरोपी क्रमांक ३ - रफीक शेख नाबी शेख ऊर्फ शेखर प्रशांत पाटील ऊर्फ रॉबर्ट जॉन डिसुजा वय ३८ वर्ष, रा. राणीबेन्नुर, जि. हावेरी, कर्नाटक हा निष्पण्ण झाला. सीडीआर मधिल आयएमईआय नंबर वरून आरोपी १) दिलीप ऊर्फ किसनराव वाघ २) तानाजी विठ्ठल भोसले ऊर्फ भोले हे निष्पण्ण झाले. त्यांना ओळखणा-यांचे जबाब नोंदविण्यात आले. इतर आरोपीतांचा शोध पथका मार्फत तपास करण्यात येवुन विविध ठिकाणाहुन आरोपी व दरोडयातील लुटुन नेलेला मुददेमाल त्यांचेकडुन हस्तगत करण्यात आला. दरोडयातील काही आरोपी यांना या स्वरूपाचे गुन्हे करण्याची सवय व ते सराईत असल्याची माहीती मिळाली.तसेच त्यापैकी काही आरोपीतांनी महाराष्ट्र राज्यात इतर ठिकाणी अशा प्रकारचे गुन्हे केलेले आहेत.व अशा गुन्हयांची संबंधीत न्यायालयाने दखल सुद्धा घेतलेली आहे.त्यांची गुन्हेगारी संघटना असल्याचे दिसुन आल्यावरून सदर गुन्हयात आरोपीतां विरूद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (प), (पप), ३(४), ३ (५) हे वाढवुन लावण्याल आले

३) प्रतिबंधात्मक कारवाई :-

४) गुप्तवार्ता संकलन :-

# गुन्हयाचा प्रकार :- बलात्कार

## पोलीस स्टेशन :- बिबवेवाडी पोलीस ठाणे

## तालुका :- पुणे जिल्हा :- पुणे

## तपासी अंमलदार :-

**१) सहा.पोलीस निरीक्षक श्री.अशोक शेळके.**

**२) सहा.पोलीस आयुक्त श्री.सोनवणे.**

## गुन्हयाची प्राथमिक माहीती :-

१) पोलीस स्टेशन :- बिबवेवाडी पोलीस ठाणे, पुणे.
गुरनं. /२०११ ,भादविक.३०२, ३०७, ३९२, ३७६ (ई )
शस्त्र अधिनियम कलम २५ (५), (अ), २७

२) फिर्यादी :- सौ.मनिषा विकास जाधव वय २३ वर्ष धंदा घरकाम रा.प्लॉट नं.१८/३, ३ री गल्ली, व्यंकटेश्वर कॉलनी,बिबवेवाडी, पुणे.

३) आरोपी :- १) संदेश ऊर्फ साईनाथ कैलास अभंग वय २७ वर्ष , धंदा -शेती रा.अवसरी खुर्द, ताो.आंबेगांव जि.पुणे.

४) पिडीत :- १) सौ.मनिषा विकास जाधव वय २३ वर्ष धंदा घरकाम रा.प्लॉट नं.१८ / ३, ३ री गल्ली, व्यंकटेश्वर कॉलनी,बिबवेवाडी, पुणे.

२) श्रीमती विमल जाधव वय वर्ष धंदा घरकाम रा.प्लॉट नं.१८ / ३, ३ री गल्ली, व्यंकटेश्वर कॉलनी,बिबवेवाडी, पुणे. **( मयत )**

५) अ.घ.ता.वे. :- दिनांक १०/०९/२०११ रोजी सकाळी ०९ : ०० वा.

ठिकाण :- .प्लॉट नं.१८ / ३, ३ री गल्ली, व्यंकटेश्वर कॉलनी,बिबवेवाडी, पुणे.

६) थोडक्यात हकीकत :- फिाा.चे पती हे किर्लोस्कर कंपनीत नोकरीस असल्याने ते नेहमी प्रमाणे सकाळी त्यांचे कामावर गेले.तेव्हा घरात फिर्यादी व त्यांचे आजेसासु असे दोघीच घरात होत्या.तेव्हा त्यांचे दारावरची बेल वाजल्याने फिर्यादीचे आजेसासुने दार उघडल्याने बाहेर उभा असल्याने व्यक्तीने " तुमची गाडी पंक्चर झाली आहे.तो पंक्चर काढायला मला बोलाविले आहे.घर मालकांना बोलवा " असे सांगितल्याने फिर्यादीने त्यांचे पतीस फोन लावला परंतु तो लागला नाही.तेव्हा दारात उभ्या असलेल्या व्यक्तीस घरात दोनच महीला असल्याचे लक्षात आल्याने तो अचानक घरात घुसला.व त्याचे जवळील कुकरी उगारून पैसे व दागीन्यांची मागणी केली. घरातील महीलांनी त्यास काय हवय ते घे.पण आम्हांला मारू नको,असे सांगुन देखिल त्याने फिर्यादीचे आजेसासुवर कुकरीच्या सहाय्याने वार करून जीवे ठार मारले. व फिर्यादी गरोदरअसतांना त्यांचे गळयावर कुकरी लावुन जीवे मारण्याची धमकी देवुन बलात्कार केला.

७) दोषारोप क्रमांक :- /२०११ दिनांक :- / /२०११

८) **कोर्टाचा निकाल** :- १ ) जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे यांनी आरोपी संदेश ऊर्फ साईनाथ कैलास अभंग यास खुनाच्या गुन्हयात मरे पर्यंत फाशीची शिक्षा व खुनाच्या प्रयत्ना बद्यल १० वर्ष सक्त मजुरी व ५०००/- रूपये दंड.व दंड न भरल्यास आणखी सहा महीने कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

२) उच्च न्यायालय,मुंबई येथे आरोपी संदेश ऊर्फ साईनाथ कैलास अभंग यास मरे पर्यंत फाशीची शिक्षा कायम ठेवण्यात आली.

३) सर्वाच्च्य न्यायालय, नवी दिल्ली येथे आरोपी संदेश ऊर्फ साईनाथ कैलास अभंग यांस फाशीची शिक्षा रद्य् करून आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा दिली आहे.

## तक्रार / फिर्यादीची थोडक्यात हकीकत :-

दिनांक १०/०९/२०११ रोजी दुपारी ०३:०० वा.चे सुमारास श्री. विकास मनोहर जाधव रा. प्लॉट नं.१८/३, ३ री गल्ली, व्यंकटेश्वर कॉलनी, बिबवेवाडी, पुणे हे नेहमी प्रमाणे त्यांचे किर्लोस्कर कंपनीत कामास गेले. घरात त्यांची आजी श्रीमती विमल दत्ताजीराव जाधव व त्यांची पत्नी सौ.मनिषा विकास जाधव ( नाव बदलले आहे ) असे दोघीही एकटया असतांना, अज्ञात व्यक्तीने त्यांचे घराची बेल वाजविली. श्रीमती विमल जाधव यांनी दार उघडले तेव्हा अज्ञात व्यक्तीने " तुमची गाडी पंक्चर झाली आहे.तो पंक्चर काढायला मला बोलाविले आहे.घर मालकांना बोलवा " असे सांगुन घरातील रोख रक्कम व सोन्याचे दागिणे इत्यादी साहीत्य चोरी करण्याचे उददेशाने त्यांचे घरात घुसुन, कुकरी सारख्या दिसणा-या धारदार शस्त्राच्या सहाय्याने श्रीमती विमल जाधव यांचे वर हल्ला करून त्यांचा खुन केला व सौ.मनिषा यांचे मानेवार कुकरी लावुन, ती गरोदर आहे हे माहीत असतांना, बलात्कार केला.व त्यांचे पाठीवर कुकरीचे सपासप वार करून गंभीर जखमी करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

## तपासाचा आराखडा / क्रमवारी :-

१) घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला

२) घटनास्थळावर मिळालेले आरोपीताचे हाताचे ठसे घेण्यात आले.

३) फिर्यादीने फिर्याद मध्ये अज्ञात आरोपीताचे दिलेल्या वर्णनावरून त्याचे रेखाचित्र तयार करण्यात आले. सदर रेखाचित्र शहरात विविध ठिकाणी लावण्यात आले.तसेच स्थानिक वर्तमानपत्रातुन प्रसिदधी देण्यात आली.

४) आरोपीताचा शोध घेण्यासाठी तपास पथके तयार करण्यात आली.

५) आरोपीने लुटुन नेलेल्या माल मध्ये मोबाईल असल्याने त्यावरून त्याचे लोकेशन शोधण्याचा प्रयत्न केला गेला.

६) पुणे जिल्हा स्तरावर आरोपीताचे वर्णन, रेखाचित्र आणि इतर माहीती कळविण्यात आली.

७) फिर्यादीचे शेजारी राहणारे, तसेच कॉलनीत राहणारे लोक, दुकानदार, फेरीवाले, यांचे कडे चौकशी करण्यात आली.व त्यांचे जबाब नोंदविण्यात आले.

८) गुन्हयाचा तपास सहा.पोलीस आयुक्त श्री.सोनवणे यांचे कडे वर्ग करण्यात आला.

९) गुन्हयाचे ९ व्या दिवशी एका व्यक्तीने आंबेगांव पोलीस स्टेशन, जि. पुणे येथे हजर होऊन सदर गुन्हयातील आरोपी कोण आहे व तो कोठे लपुन बसला आहे याची माहीती दिली. आंबेगांव पोलीसांनी सदरची माहीती पोलीस आयुक्तालयद्वारे बिबवेवाडी पोलीस स्टेशनला कळविली.

१०) बिबवेवाडी पोलीसांनी त्याच रात्री सापळा रचुन गुन्हयातील आरोपी संदेश ऊर्फ साईनाथ अभंग यास अवसरी खुर्द ताो.आंबेगाव, जि. पुणे येथे अभंग मळयातील राहत्या घरातुन अटक केली.आरोपीच्या ताब्यातुन दागिणे, रोख रक्कम, रक्ताचे डाग असलेले कपडे, गुन्हयात वापरलेली कुकरी, व फिर्यादीचा मोबाईल जप्त केले.

११) घटने नंतर आरोपीताने त्याचा मित्र प्रभाकर माने याचे जवळ " आत्ताच दोन बायकांना कापुन आलोय " असे बोलुन गुन्हयाची कबुली दिली होती त्याचा जबाब.

१२) आरोपीताची ओळख परेड घेण्यात आली. आरोपीताने कबुली जबाब दिला.

१३) पोस्टमार्टेम नोटस, जखमी सौ.मनिषा जाधव यांचा वैदयकीय तपासणी अहवाल पोलीसांनी प्राप्त केला.

१४) दोषारोप क्रमांक :- /२००० दिनांक / /२०००

१५) **कोर्टाचा निकाल :-**

१ ) जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे यांनी आरोपी संदेश ऊर्फ साईनाथ कैलास अभंग वय २७ वर्ष यास खुनाच्या गुन्हयात मरे पर्यंत फाशीची शिक्षा व खुनाच्या प्रयत्ना बद्यल १० वर्ष सक्त मजुरी व ५०००/- रूपये दंड.व दंड न भरल्यास आणखी सहा महीने कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

२) उच्च न्यायालय,मुंबई येथे आरोपी संदेश ऊर्फ साईनाथ कैलास अभंग यास मरे पर्यंत फाशीची शिक्षा कायम ठेवण्यात आली.

३) सर्वाच्च्य न्यायालय, नवी दिल्ली येथे आरोपी संदेश ऊर्फ साईनाथ कैलास अभंग यांस फाशीची शिक्षा रद्य् करून आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा दिली आहे.

## पुराव्याचे स्वरूप :-

१ ) साक्षिदार / तोंडी पुरावा Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब

फिर्यादी :- सौ. मनिषा विकास जाधव यांनी दिलेली.

फिर्यादी शेजारी राहणारे, कॉलनीत राहणारे, आजुबाजुचे दुकानदार, फेरीवाले, यांचेकडे चौकशी करून, त्यांचे जबाब नोंदविण्यात आले.

आरोपीने दिलेला कबुली जबाब.

घटने नंतर आरोपीताने त्याचा मित्र प्रभाकर माने याचे जवळ " आत्ताच दोन बायकांना कापुन आलोय " असे बोलुन गुन्हयाची कबुली दिली होती त्याचा जबाब.

२) कागदपत्रीय पुरावा.

PM नोट्स:- पोस्ट मार्टम करणारे वैदयकीय अधिकारी यांनी तयार केलेली.

जखमी सौ. मनिषा विकास जाधव यांचा वैदयकीय तपासणी अहवाल ( मेडीकल सर्टिफिकेट )

३) हस्ताक्षर तज्ञ अहवाल

हस्ताक्षर तज्ञ यांचा जबाब व अहवाल

४) इतर पुरावे. :- कॅलेंडर ऑफ इव्हीडंस ( आरोपीताचा पुरावा तक्ता )

| अ क्र. | आरोपीताचे नाव | आरोपीचा गुन्हयातील सहभाग / कृती | आरोपी विरूद्ध पुरावा |
|---|---|---|---|
| १ | संदेश ऊर्फ साईनाथ कैलास अभंग | श्रीमती विमल दत्ताजीराव जाधव व सौ.मनिषा विकास जाधव असे दोघीही एकटया असतांना, आरोपीताने घराची बेल वाजवुन घरातील रोख रक्कम व सोन्याचे दागिणे इत्यादी साहीत्य चोरी करण्याचे उददेशाने घरात आत प्रवेश करुन कुकरी सारख्या दिसणा-या धारदार शस्त्राच्या सहाय्याने श्रीमती विमल जाधव यांचे वर हल्ला करून त्यांचा खुन केला व सौ.मनिषा यांचे मानेवार कुकरी लावुन,ती गरोदर आहे हे माहीत असतांना बलात्कार केला.व त्यांचे पाठीवर कुकरीचे सपासप वार करून गंभीर जखमी करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. | १. आरोपीने दिलेला कबुली जबाब.<br>२. प्रभाकर माने यांचा जबाब.<br>३. आरोपीता कडुन जप्त करण्यात आलेले चोरीचे दागिणे, मोबाईल, रोख रक्कम, रक्ताचे डाग असलेले कपडे, व गुन्हयात वापरलेले हत्यार यांचा जप्ती पंचनामा.<br>४. आरोपीताची ओळख परेड.<br>५. पोस्ट मार्टेम नोटस<br>६. पिडीताचे मेडीकल सर्टिफिकेट. |

## गुन्हयाची सुनावणी प्रक्रीया :-

१) फिर्यादी :- सौ. मनिषा विकास जाधव यांची साक्ष चांगली झाली.

२) फिर्यादींचे शेजारील , कॉलनीतील साक्षिदार यांनी दिलेल्या जबाबा प्रमाणे साक्ष दिली.

३) कॉलनीतील आजुबाजुचे दुकानदार, फेरीवाले यांचे जबाब.

४) इन्कवेस्ट पंचनाम्यातील पंच

५) घटनास्थळाचे पंचनाम्यातील पंच यांच्या साक्षी उत्तम झाल्या.

६) आरोपीने दिलेला कबुली जबाब.

७) घटने नंतर आरोपीताने त्याचा मित्र प्रभाकर माने याचे जवळ " आत्ताच दोन बायकांना कापुन आलोय " असे बोलुन गुन्हयाची कबुली दिली होती त्याचा जबाब.

८) हस्ताक्षर तज्ञ यांचा अहवाल

९) PM नोट्सः- पोस्ट मार्टम करणारे वैदयकीय अधिकारी यांनी तयार केलेली.

१०) जखमी सौ. मनिषा विकास जाधव यांचा वैदयकीय तपासणी अहवाल ( मेडीकल सर्टिफिकेट )

११) गुन्हा दाखल करणारे पोलीस ठाणे अंमलदार

१२) पोलीस तपासी अंमलदार सहा.पोलीस निरीक्षक श्री.अशोक शेळके.व सहा.पोलीस आयुक्त श्री.सोनवणे यांच्या साक्षी त्यांनी केलेल्या तपासा प्रमाणे झाल्याने आरोपीला शिक्षा झाली.

## तपासातील उणीवा दुर करण्यासाठी / मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना

- यातील आरोपी संदेश ऊर्फ साईनाथ कैलास अभंग याने त्याचा मित्र प्रभाकर माने याचे जवळ " आत्ताच दोन बायकांना कापुन आलोय " असे बोलुन गुन्हयाची कबुली दिली होती.सदर न्यायालया बाहेरचा कबुली जबाब, केव्हा ग्राहय धरता येतो. ?

- **सुचना :-** भारतीय पुरावा कायदा नुसार गैरन्यायीक कबुली जबाब हा एक प्रकारे कबुली जबाबच असतो.तो फक्त दंडाधिकारी किंवा न्यायालया समोर नोंदविलेला नसतो.पण ज्या व्यक्ती पुढे दिला जातो ती व्यक्ती स्वतः न्यायालया समोर आरोपीने गुन्हयांची कबुली दिल्याचे सांगते त्या मुळे अशा व्यक्तीवर अविश्वास न दाखविता पुराव्यात जबाब ग्राहय धरता येते.

- सदर गुन्हयात आरोपीताने **चोरी करतांना** मृत्यु किंवा दुखापत घडवुन आणली. तरीही पोलीसांनी सर्व प्रथम भा.द.वि.कलम ३९२ हे कलम वापरले.

- **सुचना :-** गुन्हयाचा संपुर्ण तपास झाल्या नंतर पोलीस तपासी अंमलदार सहा.पोलीस आयुक्त श्री.सोनवणे यांनी तपासाअंती भा.दं.वि.कलम ३९४ हे लावले आहे.

## तपासातील महत्त्वाचे मुद्दे / सबळ मुद्दे

**१ ) फिर्यादीने आरोपीला ओळखले तेव्हा ती प्रचंड दबावाखाली होती.आरोपी संदेश ऊर्फ साईनाथ कैलास अभंग यास पाहुन मोठमोठयान ओरडल्याने चक्कर येवुन बेशुदध पडली. प्रत्यक्ष घटना बघणारा माफीचा साक्षिदार याची साक्ष चांगली झाली.**

**२ ) आरोपी संदेश ऊर्फ साईनाथ कैलास अभंग याने त्याचा मित्र प्रभाकर माने याचे जबव दिलेला कबुली जबाब.**

**३) आरोपीचा कबुली जबाब.**

**४ ) आरोपीताचे घटनास्थळी घेतलेले फिंगरप्रिंटचा अहवाल.**

**५) ओळख परेड घेणारे कार्यकारी दंडाधिकारी यांची साक्ष.**

**६) पोस्टमार्टेम करणारे ससुण रुगणालयाचे वैदयकीय अधिकारी यांची साक्ष.**

**७) फिर्यादी यांचेवर उपचार करणारे व मेडीकल सर्टिफिकेट तयार करणारे वैदयकीय अधिकारी यांची साक्ष.**

**८) तपासी अंमलदार सहा.पोलीस निरीक्षक व सहा.पोलीस आयुक्त यांची साक्ष.**

## तपासाचे विश्लेषण :-

१) सुधारण्यासाठी सुचना :-

१) सदर गुन्हयात आरोपीताने **चोरी करतांना** मृत्यु किंवा दुखापत घडवुन आणली. तरीही पोलीसांनी सर्व प्रथम भा.द.वि.कलम ३९२ हे कलम वापरले.वास्तविकता आरोपी चोरी करतांना शस्त्रांचा धाक दाखवुन लुटीच्या उददेशाने मारहाण करुन जखमी किंवा मृत्यु घडवुण आणतो, अशा वेळेस भा.द.वि.कलम ३९४ हे कलम इतर भा.द.वि.कलमांचे सह लावावे.

२) सदर गुन्हयात पिडीत ही गरोदर असल्याचे आरोपीतास माहीत असतांना सुदधा त्यांने तिच्यावर बलात्कार केला.म्हणुन त्याचे विरुदध भा.द.वि.कलम ३७६ (ई) हे कलम लावण्यात आलेले आहे.

१) गुप्तवार्ता संकलन :-

सदर गुन्हयाची उकल होण्यासाठी गुप्तबातमीदार यांची फार मोलाची मदत झाली आहे.

# गुन्हयाचा प्रकार :- बलात्कार

## चोरी करण्याचे उद्येशाने बलात्कार करुन खुन.

## पोलीस स्टेशन :- जिन्सी पोलीस ठाणे

## तालुका :- औरंगाबाद जिल्हा :- औरंगाबाद

## तपासी अंमलदार :- १) पोलीस निरीक्षक श्री. बोरसे

## गुन्हयाची प्राथमिक माहीती :-

२) पोलीस स्टेशन :- जिन्सी पोलीस स्टेशन, औरंगाबाद.
गुरनं. ६५/२००९, भा.दं.वि. ३०२, २०१, ३९७, ३९४, ३७६, ४५९,४६०, १०९, ४१२

२) फिर्यादी :- अनिकेत शंकर देशपांडे, वय २६ वर्ष, धंदा- शिक्षण, रा. बी / २, पुर्वा अपार्टमेंट, अहिंसा नगर, औरंगाबाद

३) आरोपी :- १) जावेद खान हबीब खान ऊर्फ टिंगऱ्या.
२) प्रदिप अस्करण चंडालीया
३) राम शेषराव बोडके.

४) पिडीत :- मानसी शंकर देशपांडे, वय १९ वर्ष, धंदा - शिक्षण, रा. बी / २, पुर्वा अपार्टमेंट, अहिंसा नगर, औरंगाबाद

५) अ.घ.ता.वे. :- दिनांक ११/०६/२००९ रोजी सकाळी ११ : १० वा.

ठिकाण :- बी / २, पुर्वा अपार्टमेंट, अहिंसा नगर, औरंगाबाद

६) थोडक्यात हकीकत :- पिडीत मुलगी ही घरात एकटी झोपलेली असतांना यातील आरोपीताने चोरी करण्याचे उद्येशाने घरात प्रवेश केला. आवाजामुळे पिडीतास जाग आली. तीने दबक्या आवाजात चोर चोर ओरडल्याने आरोपी जावेद खान हबीब खान ऊर्फ टिंग-या याने तिचे नाक व तोंड दाबुन बेशुद्ध करुन तिच्यार बलात्कार केला. व मोबाईल इअर फोनच्या वायरने तिचे हात पाठीमागे बांधुन व स्कार्फने तिचे पाय बांधुन कैची व स्क्रु ड्रायव्हरने तिच्या गळयावर व शरीरावर वार करुन गंभीर दुखापत करून खुन केला.

७) दोषारोप :- /२०० दिनांक

## ८) कोर्टाचा निकाल :- सेशन कोर्ट औरंगाबाद

**१)** सेशन कोर्ट औरंगाबाद यांनी मुख्य आरोपी जावेद खान हबीब खान ऊर्फ टिंग-या यास भा.दं.वि. कलम ३०२ खाली खुन केल्याबद्दल जन्मठेपेची शिक्षा व ३०० रुपये दंड. दंड न भरल्यास १० दिवस कैदेची शिक्षा ठोठावली.

२) भा.दं.वि. कलम ४५६ घरफोडी केली म्हणुन एक वर्ष सक्तमजुरी, व ३०० रुपये दंड.दंड न भरल्यास १० दिवस कैदेची शिक्षा ठोठावली.

३) भा.दं.वि. कलम ३९२, ३९७ जबरी चोरी केली म्हणुन १० वर्ष सक्तमजुरी, व ३०० रुपये दंड. दंड न भरल्यास १० दिवस कैदेची शिक्षा ठोठावली.

४) भा.दं.वि. कलम ३७६ बलात्कार केला म्हणुन १०वर्ष सक्तमजुरी, व ३०० रुपये दंड. दंड न भरल्यास १० दिवस कैदेची शिक्षा ठोठावली.

५) भा.दं.वि. कलम २०१ पुरावा नष्ट केला म्हणुन ०१ वर्ष सक्तमजुरी, व ३०० रुपये दंड. दंड न भरल्यास १० दिवस कैदेची शिक्षा ठोठावली.

गुन्हयातील सह **आरोपी प्रदिप अस्करण चंडालीया** वय ४७ तसेच **आरोपी राम बोडके** वय २६ वर्ष यांना भा.दं.वि. कलम ४११ प्रमाणे चोरीची वस्तु खरेदी केल्या प्रकरणी प्रत्येकी १००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली, व दंड न भरल्यास १५ दिवस कैदेची शिक्षा ठोठावली.

२) **उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ** मा.न्यायमुर्ती ए.व्ही.निरगुडे आणि न्यायमुर्ती इंदिरा जैन यांनी आरोपी जावेद खान हबीब खान ऊर्फ टिंगऱ्या यास **फाशीची शिक्षा** दिली आहे.

## तक्रार / फिर्यादीची थोडक्यात हकीकत :-

यातील मयत मानसी शंकर देशपांडे वय १९ वर्ष रा. पुर्वा अपार्टमेंट, अहिंसा नगर, औरंगाबाद ही व तिचा भाउ अनिकेत शंकर देशपांडे वय २६ वर्ष असे एकत्र राहत होते. दि.११/०६/०९ रोजी अनिकेत वाळुंज येथे कंपनीत कामाला गेला. दि.१२/०६/०९ रोजी मानसी हि घरात एकटी झोपलेली असतांना आरोपी क्रमांक १ जावेदखान हबीब खान ऊर्फ टिंगऱ्या वय २१ वर्ष, रा.जाफरगेट , औरंगाबाद, जि.औरंगाबाद याने चोरीच्या उद्येशाने तिच्या घरात प्रवेश केला. त्यावेळी झालेल्या आवाजामुळे तिला जाग आल्याने तिने दबक्या आवाजात चोर चोर ओरडली. त्यामुळे आरोपीताने मानसी हीस एका हाताने गळयास धरुन दुस-या हाताने नाक व तोंड दाबुन बेशुद्ध करुन तिच्यावर बलात्कार केला.

ती तरफडत असल्याने तिचे मोबाईल इअर फोनच्या वायरने तिचे हात पाठी मागे बांधुन स्कार्फने तिचे दोन्ही पाय बांधुन कैची व स्क्रु ड्रायव्हरने गळयावर व शरीरा वर वार करुन गंभीर दुखापत करुन खुन केला.

तसेच अंगातील कपडे काढुन बाथरुममध्ये आंघोळ करुन, फिर्यादीचे कपडे अंगात घालुन सोनी इरीक्सन मोबाईल व सोन्याची अंगठी, पर्स मधिल ४५०/-रुपये चोरले. आरोपीताने त्याचे रक्ताने माखलेले कपडे लपविले. चोरी केलेल्या मोबाईल मधुन सिमकार्ड काढुन पुरावा नष्ट केला. हा मोबाईल आरोपी क्रमांक २ व ३ यांनी आरोपी क्र. १ यास त्यांचे हॉटेल पंचम मध्ये राहण्यास सहारा देऊन त्यास चोरी, घरफोडी करण्यासाठी घरे दाखविले, व बलात्कार, खुन, व चोरी यासारख्या गुन्हयाची माहीती लपवुन ठेवुन, चोरीचा माल घेवुन, गुन्हा करण्यास मदत केली. तसेच गुन्हा करण्यास चिथावणी देवुन गुन्हयाचा पुरावा नष्ट करण्यास मदत केली.

## तपासाचा आराखडा / क्रमवारी :-

**१)** यातील मयत पिडीत मुलगी मानसी हीचा भाउ अनिकेत शंकर देशपांडे याने घटनेची खबर पोलीस ठाणेस खबर दिली.

२) पोलीस घटनास्थळी लागलीच हजर झाले. मयताचे दिसते शरीर परिस्थितीचा इन्कवेस्ट पंचनामा करण्यात आला.त्यात मयताचे अंगावरील सोनी एरीक्सन मोबाईल हेडफोनची वायर, रक्ताचे डाग असलेले एक टी शर्ट व ब्रेसीअर,आणि एक स्कार्फ असे जप्त करण्यात आले. घटनास्थळी फिंगरप्रिंट एक्सपर्ट, डॉग स्क्वॉड, फोटोग्राफर यांना बोलावुन आरोपीताचे चांस प्रिंट घेण्यात आल्या. मयताचे व घटनास्थळाचे फोटो काढण्यात आले.

३) घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला. घटनास्थळावर असलेले रक्ताचे डाग असलेले पांढरे बेडशिट, एक कात्री ,स्क्रु ड्रायव्हर, मयताने लिहीलेले पाच पानांचे प्रेम पत्र, सुविचारांचे तिन चिठ्ठया एका पेपरवर चिकटविलेल्या, एक सलवार, एक निकर त्यामध्ये सॅनेटरी पॅड असलेली असे जप्त करण्यात आले. मयताचे प्रेत पोस्टमार्टम साठी पाठविले.

४) गुन्हयाचे तपासात पोलीसांनी साक्षिदारांचे जाब जबाब नोंदविले.

५) जप्त केलेल्या सर्व वस्तु मुद्येमाल रजिस्टर मध्ये नोंद घेवुन पावती तयार करुन कागदपत्रात सामिल केल्या आहेत.

६) मयताचे रक्त व राखुन ठेवलेला व्हिसेरा, योनी मार्गातील स्त्राव, गुप्तांगावरील केस न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळे मध्ये पाठविण्यात आले.

७) चोरीस गेलेल्या सोनी इरीक्सन कंपनीचा मोबाईल चे CDR / SDR / INEI नंबरवरुन आरोपीचा शोध घेण्यात आला. त्यावरुन सदर मोबाईल फोन प्रदिप अस्करण चंडालीया ही व्यक्ती वापरत आहे, बाबत निष्पण्ण झाल्याने त्याचा पत्ता मिळवुन त्यास फोनसह ताब्यात घेवुन मोबाईल फोन पंचासमक्ष जप्त करण्यात आला. त्यामुळे गुन्हा उघडकीस येवुन महत्त्वाचा पुरावा हस्तगत आला.

८) प्रदिप चंडालीया यास मोबाईल फोन बाबत विचारपुस केली असता त्याने रेकॉर्डवरील गुन्हेगार जावेदखान हबीब खान ऊर्फ टिंग-या याने हॉटेलचे बिलापोटी दिला असल्याचे जबाबात सांगितल्याने जावेद खान हबीब खान यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली.

९) गुन्हयातील आरोपी जावेद खान हबीब खान यास चोरुन नेलेल्या सोन्याचे अंगठीबाबत विचारपुस केली असता त्याने राम बोडखे याचे कडे असल्याचे सांगितल्याने त्यास गुन्हयात अटक करण्यात येवुन त्याने मेमोरंडम पंचनाम्याप्रमाणे सोन्याची अंगठी काढुन दिल्याने जप्त करण्यात आली आहे.

१०) आरोपीताने गुन्हा करते वेळीस त्यांचे अंगावरील कपडे भारतीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे पंचासमक्ष काढुन दिले. त्या कपडयांवर मयताचे रक्ताचे डाग लागलेले असल्याने ते कपडे वैज्ञानिक प्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले .त्यांचा अहवाल प्राप्त करुन घेण्यात आला.

९)     दोषारोप          :-          /२००     दिनांक       /        /२००

## १०)   **कोर्टाचा निकाल :- सेशन कोर्ट औरंगाबाद**

**१)** सेशन कोर्ट औरंगाबाद यांनी मुख्य आरोपी जावेद खान हबीब खान ऊर्फ टिंग-या यास भादवि.कलम ३०२ खाली खुन केल्या बद्यल जन्मठेपेची शिक्षा व ३०० रुपये दंड. दंड न भरल्यास १० दिवस कैदेची शिक्षा ठोठावली.

२) भादवि.कलम ४५६ घरफोडी केली म्हणुन एक वर्ष सक्तमजुरी, व ३०० रुपये दंड.दंड न भरल्यास १० दिवस कैदेची शिक्षा ठोठावली.

३) भादवि.कलम ३९२, ३९७ जबरी चोरी केली म्हणुन १० वर्ष सक्तमजुरी, व ३०० रुपये दंड. दंड न भरल्यास १० दिवस कैदेची शिक्षा ठोठावली.

४) भादवि.कलम ३७६ बलात्कार केला म्हणुन १०वर्ष सक्तमजुरी, व ३०० रुपये दंड. दंड न भरल्यास १० दिवस कैदेची शिक्षा ठोठावली.

५) भादवि.कलम २०१ पुरावा नष्ट केला म्हणुन ०१ वर्ष सक्तमजुरी, व ३०० रुपये दंड. दंड न भरल्यास १० दिवस कैदेची शिक्षा ठोठावली.

गुन्हयातील सह **आरोपी प्रदिप अस्करण चंडालीया** वय ४७ तसेच **आरोपी राम बोडके** वय २६ वर्ष यांना भादवि.कलम ४११ प्रमाणे चोरीची वस्तु खरेदी केल्या प्रकरणी प्रत्येकी १००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.व दंड न भरल्यास १५ दिवस कैदेची शिक्षा ठोठावली.

२)   **उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ** मा.न्यायमुर्ती ए.व्ही.निरगुडे आणि न्यायमुर्ती इंदिरा जैन यांनी आरोपी जावेद खान हबीब खान ऊर्फ टिंग-या यास **फाशीची शिक्षा** दिली आहे.

## पुराव्याचे स्वरूप :-

१ ) साक्षिदार / तोंडी पुरावा Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब.

फिर्याद :- अनिकेत शंकर देशपांडे यांनी दिलेली.

जबाब :- प्रत्यक्ष साक्षिदार नसल्याने गुन्हयात उपयुक्त असे साक्षिदारांचे जबाब नोंदविले आहेत.

पंच :- इन्कवेस्ट पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा, व इतर पंचनाम्यातील सर्व पंच.

वैद्यकीय अधिकारी :- पोस्टमार्टम करणारे घाटी रुग्णालयाचे डॉक्टर.

२) कागदपत्रीय पुरावा :-

१) प्रमाणपत्र :- आरोपी जावेद खान हबीब खान ऊर्फ टिंग-या याची वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र.त्या द्वारे आरोपीताने मयत हिचेवर मृत्युपुर्व बलात्कार केले बाबतचे (ज्यात आरोपीताचा रक्तगट, विर्याचा नमुना, DNA अहवाल.) तसेच आरोपीताचा गुन्हयाचा हेतु ठरविण्यासाठी, त्याची न्यायवैद्यक प्रयोगशाळा, मुंबई येथे मानसशास्त्रीय मुल्यमापण केलेल्या चाचणीचा अहवाल.

२) पोस्टमार्टम नोट्स :- PM नोट्स:- पोस्ट मार्टम करणारे वैदयकीय अधिकारी यांनी मयत मानसी शंकर देशपांडे हिची तयार केलेली.

३) इलेक्ट्रॉनिक पुरावा :- सोनी एरीक्सन मोबाईल खरेदीची मुळ पावती, सिम कार्ड, मोबाईलचे CDR / SDR / IMEI अहवाल.

३) हस्ताक्षर तज्ञ अहवाल :- घटनास्थळी मिळुन आलेले आरोपीताचे बोटांचे ठश्यांचा अहवाल ( चास प्रिंट )

४) इतर पुरावे. :- कॅलेंडर ऑफ इव्हीडंस ( आरोपीताचा पुरावा तक्ता )

| अ क्र. | आरोपीताचे नाव | आरोपीचा गुन्हयातील सहभाग / क्.ती | आरोपी विरूद्ध पुरावा |
|---|---|---|---|
| १ | जावेद खान हबीब खान ऊर्फ टिंग-या | चोरीच्या उद्येशाने फिर्यादीच्या घरात प्रवेश करुन मानसी हीस एका हाताने गळयास धरुन दुस-या हाताने नाक व तोंड दाबुन बेशुद्ध करुन तिच्यावर बलात्कार केला.मोबाईल इअर फोन च्या वायरने तिचे हात पाठी मागे बांधुन स्कार्फने तिचे दोन्ही पाय बांधुन कैची व स्क्रु ड्रायव्हरने गळयावर व शरीरा वर वार करुन गंभीर दुखापत करुन खुन केला. | १. वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र. आरोपीने मयतावर मृत्युपुर्व बलात्कार केले बाबतचे (त्यात आरोपीताचा रक्तगट, विर्याचा नमुना, DNA अहवाल.)<br>२. मयताचे योनीत आढळलेल्या विर्याचे अंशाचा अहवाल.<br>३. आरोपीताने गुन्हा करतेवेळी घातलेले कपडयांवर असलेले रक्ताचे डाग हे मयताचे रक्तगटाचेच असल्याचा अहवाल.<br>३. मोबाईल फोन खरेदीची मुळ पावती, सिम कार्ड, मोबाईलचे CDR / SDR / INEI अहवाल.<br>४.शास्त्रोक्त व परिस्थितीजन्य पुरावे. |
| २<br><br>३ | प्रदिप अस्करण चंडालीया<br><br>राम बोडके | आरोपी क्र. १ यास त्यांचे हॉटेल पंचम मध्ये राहण्यास सहारा देऊन त्यास चोरी, घरफोडी करण्यासाठी घरे दाखविले, व गुन्हा करण्यास मदत केली.तसेच गुन्हा करण्यास चिथावणी देवुन बलात्कार, खुन, व चोरी यासारख्या गुन्हयाची माहीती लपवुन ठेवुन, चोरीचा माल घेवुन, पुरावा नष्ट करण्यास मदत केली. | १. गुन्हयातील चोरीस गेलेला मोबाईल मध्ये वापरत असलेले सिम कार्ड त्याचे मुलाचे नावे असल्याचे मिळुन आले.<br>२. गुन्हयात चोरीस गेलेली सोन्याची अंगठी, पंचासमक्ष मेमोरंडम पंचनाम्याप्रमाणे काढुन दिली.<br>३. फिर्यादीने सोन्याची अंगठी, कपडे ओळखले. |

## गुन्हयाची सुनावणी प्रक्रीया :-

१ ) साक्षिदारांची नावे :-

फिर्यादी :- अनिकेत शंकर देशपांडे

उपयुक्त असे साक्षिदारांचे जबाब

इन्कवेस्ट पंचनाम्यातील पंच :-

घटनास्थळी मयताचे व घटनास्थळाचे छायाचित्रण करणारा / फोटो काढणारा

फोटोग्राफर याचे जबाब व फोटो.

घटनास्थळाचा पंचनाम्यातील पंच

मेमोरंडम पंचनामा / जप्ती पंचनाम्यातील पंच

फिंगर प्रिंट एक्सपर्ट यांचा अहवाल

PM नोट्सः- पोस्ट मार्टम करणारे वैदयकीय अधिकारी यांनी तयार केलेली.

गुन्हा दाखल करणारे पोलीस ठाणे अंमलदार

पोलीस तपासी अंमलदार पोलीस निरीक्षक श्री. बोरसे.

## तपासातील उणीवा दुर करण्यासाठी / मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना

- यातील फिर्यादी अनिकेत शंकर देशपांडे यांचा पुरवणी जबाब ७ दिवसांनी नोदविला.तो पर्यंत मोबाईल फोन, सोन्याची अंगठी व ४५०/ - रु तसेच फिर्यादीचे कपडे चोरीस गेल्याचे तपासात का निष्पण्ण झाले नाही.

  **सुचना :-** फिर्याद दाखल करतांनाच सर्व घटनांचा , चोरीस गेलेल्या वस्तुंचा अंतर्भाव फिर्यादीत नमुद असले पाहीजे. काही कारणां मुळे चोरीस गेलेल्या वस्तुंचा तपशिल किंवा माहीती उपलब्ध झाली नसल्यास फिर्यादीस त्या बाबत विचारपुस करण्यास वेळ वाया घालवु नये.आणि त्यांचा लवकर पुरवणी जबाब नोंदवुन घ्यावा.त्यामुळे तपासी अधिकारी यांना साक्ष दरम्यान अडचण निर्माण होत नाही.व गुन्हा शाबीत होण्यासाठी मदत होते.

- घटनास्थळी फोटोग्राफर यास फोटो काढण्यास बोलाविले नंतर त्यांचे जबाब घेतांना घ्यावयाची काळजी.

  **सुचना :-** अशा महत्त्वाचे गुन्हयांमध्ये गुन्हा दाखल होण्यापुर्वी घटनास्थळी पोलीस त्या ठिकाणी भेट देतात. तेथुनच मग परिस्थिती बघुन पोलीस तपासी अंमलदार किंवा इतर अधिकारी / कर्मचारी वरिष्ठांचे परवानगीने किंवा आदेशाने फोटोग्राफर, व्हिडीओ शुटींग काढणारा , डॉग स्कॉवड, फिंगर प्रिंट एक्सपर्ट यांना बोलाविण्यात येते. परंतु त्यांचे जबाब तयार करण्यात येतात तेव्हा साक्षी दरम्यान ते घटनास्थळी कधी पोहोचले, फोटो केव्हा व किती वाजता काढले.या बाबत विचारले जाते.या गुन्हयात फोटोग्राफर १० : ३० वा.घटनास्थळाचे फोटो काढण्यासाठी गेले व गुन्हा ११ : १० वा.दाखल आहे.त्यामुळे दोन्ही मध्ये विसंगती होतात.

- घटनेची खबर मिळाल्या नंतर पोलीसांनी घटनास्थळी रवाना होतांना आदेश बाबत स्टेशन डायरीत नोंद करणे बाबत.

  **सुचना :-** सदर प्रकरणात फिर्याद घेणे पुर्वीच स्टेशन डायरीत आदेशा बाबत नोंद न करताच पोलीस घटनास्थळी रवाना झाले, ही मोठी उणीव आहे. तसेच घटनास्थळाचा पंचनामा करतांना गुन्हा दाखल झाल्याची वेळ व घटनास्थळाचे अंतर यामध्ये समन्वय साधुन घटनास्थळाचा पंचनामा करण्यात यावा. या गुन्हया मध्ये पंचनामा गुन्हा दाखल झाल्यानंतर ५ मिनिटांनी चालु करण्यात आला.घटनास्थळ पोलीस स्टेशन पासुन १.५ किमी.अंतरावर आहे.त्याचे तारतम्य ठेवण्यात आलेले नाही.

## तपासातील महत्त्वाचे मुद्दे / सबळ मुद्दे

१ ) चोरीस गेलेल्या वस्तु तपासात का निष्पण्ण झाले नाही या मुद्यांवर,तपास अधिकारी यांना साक्षी दरम्यान नीट मांडता आली नाही. आरोपीताच्या वकीलांनी या मुद्यावर खुप प्रश्न विचारले परंतु मा.न्यायालयाने तपास अधिकारी यांच्यावर विश्वास ठेवला.

२ ) मोबाईल फोन जप्त करतेवेळी जप्ती पंचनाम्यातील दोन्ही पंच फितुर झाले. परंतु न्यायालयाने सहा.पो.निरी. पातारे यांचे साक्षिवर विश्वास ठेवला.म्हणुन आरोप शाबीत झाले आहेत.

३ ) आरोपी जावेद खानचे रक्ताचे कपडयांवर मयताचे रक्तगट असलेले डाग वैज्ञानिक तपासणीत शाबीत झाल्याने तो तज्ञांचा वैज्ञानिक पुरावा म्हणुन न्यायालयाने ग्राहय धरला आहे.

४ ) आरोपी राम बोडखे याने गुन्हयात चोरीस गेलेली सोन्याची अंगठी मेमोरंडम पंचनाम्याप्रमाणे पंचासमक्ष काढुन दिली. ती सोन्याची अंगठी महत्त्वाचा पुरावा ठरली.

५) गुन्हयात चोरीस गेलेला मोबाईल आरोपी प्रदिप चंडालीया वापरत असलेले सिम कार्ड त्याचे मुलाचे नावाने असलेला शाबित झाले आहे.

४) फिर्यादीने साक्ष दरम्यान गुन्हयात चोरीस गेलेली सोन्याची अंगठी व त्यांचे कपडे हे न्यायालयात ओळखल्याने गुन्हा शाबीतीसाठी महत्त्वाचा पुरावा ठरली आहे.

५) आरोपी जावेद खान याची घाटी हॉस्पिटल येथिल वैदयकीय तपासणी करुन प्रमाणपत्र दिले, ते न्यायालयात मयत हिचे वर मृत्युपुर्वी झालेल्या बलात्कारा बाबतचा पुरावा म्हणुन शाबीत करता आले.तसेच सदर हॉस्पिटल मधिल वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष महत्तवाची ठरली.

६) इलेक्ट्रॉनिक पुराव्या मध्ये मोबाईल कंपनीचे नोडल ऑफीसर यांची साक्ष ग्राहय ठरली.

## तपासाचे विश्लेषण :-

सुधारण्यासाठी सुचना :

१) गुन्हयात चोरीस गेलेल्या वस्तुंची व्यवस्थित पणे फिर्यादीस यांना विचारपुस करुन त्यांचा पुरवणी जबाब लवकर नोंदवुन घेण्यात यावा.

२) चोरुन नेलेल्या मोबाईलचे CDR, SDR , TOWER LOCATION, ची माहीती संबंधित मोबाईल कंपनी कडुन मागविण्यात आल्या नंतर कंपनीचे नोडल अधिकारी यांचे कडुन CDR, SDR, IMEI. NO.,TOWER LOCATION, चे प्रमाणपत्र भारतीय पुरावा कायदा कलम ६५ ( ब ) प्रमाणे घेणे आवश्यक आहे

३) गंभीर स्वरुपाचे गुन्हयात सरकारी पंच घेण्यात यावे. त्यामुळे दोषसिद्धिचे प्रमाण वाढते.

४) मयताचे अंगावरील कपडे जप्ती पंचनाम्यात रक्ताचे डाग कोठे आहेत, त्यांचे आकारमान, मार्कींग करणे गरजेचे आहे.

५) इन्कवेस्ट पंचनाम्यात जखमांचे प्रकार, आकारमान, स्वरुप तसेच मृत्युचे कारण त्रोटक स्वरुपात लिहु नये.

तपास :-

**१)** यातील मयत पिडीत मुलगी मानसी हीचा भाउ अनिकेत शंकर देशपांडे याने घटनेची खबर पोलीस ठाणेस खबर दिल्यानंतर पोलीस घटनास्थळी लागलीच हजर झाले.मयताचे दिसते शरीर परिस्थितीचा इन्कवेस्ट पंचनामा करण्यात आला.घटनास्थळी फिंगरप्रिंट एक्सपर्ट ,डॉग स्क्वॉड, फोटोग्राफर यांना बोलावुन आरोपीताचे चांस प्रिंट घेण्यात आल्या.मयताचे व घटनास्थळाचे फोटो काढण्यात आले. घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.

२) घटनास्थळावर रक्ताचे डाग असलेले पांढरे बेडशिट, एक कात्री , स्क्रु ड्रायव्हर,व मयताचे अंगावरील कपडे जप्त करण्यात आले. मयताचे प्रेत पोस्टमार्टम साठी पाठविले.तसचे गुन्हयाचे तपासात पोलीसांनी साक्षिदारांचे जाब जबाब नोंदविले

३) मयताचे रक्त व राखुन ठेवलेला व्हिसेरा, योनी मार्गातील स्त्राव, गुप्तांगावरील केस न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळे मध्ये पाठविण्यात आले.

४) चोरीस गेलेल्या सोनी इरीक्सन कंपनीचा मोबाईल चे CDR / SDR / INEI नंबर वरुन आरोपीचा शोध घेण्यात आला.त्यावरुन सदर मोबाईल फोन प्रदिप अस्करण चंडालीया ही व्यक्ती वापरत आहे बाबत निष्पण्ण झाल्याने त्याचा पत्ता मिळवुन त्यास फोनसह ताब्यात घेवुन मोबाईल फोन पंचासमक्ष जप्त करण्यात आला.त्यामुळे गुन्हा उघडकीस येवुन महत्त्वाचा पुरावा हस्तगतआला.

५) प्रदिप चंडालीया यास मोबाईल फोन बाबत विचारपुस केली असता,रेकॉर्डवरील गुन्हेगार जावेदखान हबीब खान ऊर्फ टिंग-या याने हॉटेलचे बिलापोटी दिला असल्याचे जबाबात सांगितल्याने जावेद खान हबीब खान यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली.
६) गुन्हयातील आरोपी जावेद खान हबीब खान यास चोरुन नेलेल्या सोन्याचे अंगठी बाबत विचारपुस केली असता त्याने राम बोडखे याचे कडे असल्याचे सांगितल्याने त्यास गुन्हयात अटक करण्यात येवुन त्याने मेमोरंडम पंचनाम्याप्रमाणे सोन्याची अंगठी काढुन दिल्याने जप्त करण्यात आली आहे.
७) आरोपीताने गुन्हा करते वेळीस त्यांचे अंगावरील कपडे भारतीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे पंचासमक्ष काढुन दिले.त्या कपडयांवर मयताचे रक्ताचे डाग लागलेले असल्याने ते कपडे वैज्ञानिक प्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले.त्यांचा अहवाल प्राप्त करुन घेण्यात आला.
८) वैज्ञानिक व इलेक्ट्रानिक पुराव्याचे आधारे आरोपीस जन्मठेपेची शिक्षा व ३०० रुपये दंड.व दंड न भरल्यास १० दिवस कैदेची शिक्षा दिली. तसेच उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी फाशीची शिक्षा दिली आहे.

प्रतिबंधात्मक कारवाई :-

गुप्तवार्ता संकलन :-

# गुन्हयाचा प्रकार :- बालकांचा लैंगिक छळ.

**पोलीस स्टेशन :- शहापुर पोलीस ठाणे,**

**तालुका :- शहापुर जिल्हा :- ठाणे.**

**तपासी अंमलदार :-**

**१) पोलीस निरीक्षक श्री.बी.एन.शिंदे**

**गुन्हयाची प्राथमिक माहीती :-**

७) पोलीस स्टेशन :- शहापुर पोलीस ठाणे, शहापुर गु र नं. १९९ /२०१४ भादविक.३७६ (२) सह लैंगिक अपराधापासुन बालकांचे संरक्षण अधिनियम सन २०१२ चे कलम ३

२) फिर्यादी :- सोन्या पागा कोरडे वय २५ धंदा मजुरी रा.आतकरपाडा, शहापुर, ताो.शहापुर जि.ठाणे.

३) आरोपी :- अनिल रमेश कोल्हे वय २५ वर्ष रा. सिध्दार्थ नगर, कसारा, शहापुर, जि.ठाणे.

४) पिडीत :- कु.मनकी पागा कोरडे वय १७ वर्ष रा. आतकरपाडा, शहापुर, जि.ठाणे.

५) अ.घ.ता.वे. :- दि. ०२/०५/२०१४ रोजीचे ७ महिन्यापुर्वी नक्की तारीख वेळ माहीत नाही.
ठिकाण :- कसारा येथील पडीक रेल्वे कार्यालयात,कसारा.जि.ठाणे.

६) थोडक्यात हकीकत :- यातील फिर्यादी हे आतकरपाडा येथे त्यांचे मुले व दोन बहीणी राहत असुन त्यांची लहाण बहीण मनकी वय १९ ही मतिमंद असुन रागिट स्वभावाची आहे.तीला कोठे आहे बाबत विचारले असता, ती शिव्या देत असते.ती लोकल रेल्वेने वाशींद, कल्याण, ठाणे, येथे तसेच मुंबई नाशिक हायवेने जात येत असते.ती कोणा कडुनही मागुन खात असते.ती मतिमंद असल्याने तीचा विवाह झालेला नाही.घटनेच्या सात महिन्या अगोदर कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीची बहीण मनकी हीचे बरोबर, ती मतीमंद आहे हे माहीत असल्याचा फायदा घेऊन तिच्यावर बलात्कार केला.

७) दोषारोप क्रमांक :- / दिनांक :- / /

८) **कोर्टाचा निकाल** :- १ ) मा.न्यायालय यांनी आरोपी अनिल रमेश कोल्हे यास पिडीत मुलगी ही, मानसिक दृष्टया विकलांग होती व त्याचा फायदा आरोपीने घेतला आहे म्हणुन त्यास दोषी ठरवुन जन्मठेपेसह दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

**तक्रार / फिर्यादीची थोडक्यात हकीकत :-**

दिनांक ०२/०५/२०१४ रोजी फिर्यादी सोन्या पागा कोरडे वय २५ धंदा मजुरी रा.आतकरपाडा, शहापुर, ताो.शहापुर, जि.ठाणे यांनी फिर्याद दिली कि,वरील ठिकाणी माझे दोन बहीणी व मुलांसह राहतो माझी लहाण बहीण मनकी वय १९ वर्ष ही लहाणपणा पासुन मतीमंद असुन ती घरात राहत नाही.ती दिवसभर कोठेही फिरत असते.तसेच जेवणही बाहेरच कोणाकडुनही मागुन खाते.ती रागिट स्वभावाची आहे.तीला कोठे आहे बाबत विचारले असता, ती शिव्या देते. ती लोकल रेल्वेने वाशींद, कल्याण, ठाणे, येथे तसेच मुंबई नाशिक हायवेने जात येत असते. ती मतिमंद असल्याने तीचा विवाह झालेला नाही.

नमुद तारखेच्या दोन महिन्यापुर्वी फिर्यादीस त्याचे घरातील स्त्रियांनी त्यांना सांगितले कि, मनकीचे पोट दिसत आहे.म्हणुन दिनांक ०५/०५/२०१४ रोजी मनकीची सोनोग्राफी टेस्ट केली असता, ती ७ महिन्याची गरोदर असल्याचे समजले.गरोदरपणा बाबत तीला विचारले असता,त्याबाबत मनकीला काही एक सांगता येत नव्हते. कुमारी मनकी ही

मतिमंद आहे हे माहीत असतांना कोणीतरी अज्ञात आरोपीताने तिचे मतिमंद असल्याचा फायदा घेऊन तिच्या संमतिशिवाय तिच्यावर बलात्कार केला.

**तपासाचा आराखडा / क्रमवारी :-**

१) गुन्हयातील आरोपी अज्ञात असल्याने तसेच पिडीत मुलगी ही मतिमंद असल्याने व तिच्याकडुन अज्ञात आरोपी बाबत काही एक माहीती उपलब्ध झाली नाही.अज्ञात आरोपीताचा शोध घेणे कामी पडीत ज्या ठिकाणी जात होती,त्या विविध ठिकाणाचे-रेल्वे स्टेशन, हायवे येथे अनेक लोकांकडे माहीती घेतली. परंतु काही एक उपयुक्त माहीती मिळुन आली नाही.

८) कु.मनकी ही STDबुथवरुन अनिल नावाच्या मुलास त्याचे मोबाईल फोनवर संपर्क साधत होती.अशी माहीती मिळाली. पिडीतास त्या बाबत विचारपुस केली असता,तिला अनिलचे पुर्ण नाव पत्ता सांगता येत नव्हता.तिला फक्त मोबाईल नंबर लिहीता येत होता.तो तपासी अंमलदाराने लिहुन घेतला.

९) त्यानंतर महीला पोलीस अधिकारी यांचेमार्फत VDOकॉन्फरन्सींगद्वारे पिडीत मुलीचा जबाब नोंदविण्यात आला

१०) आरोपीताचे मोबाईल नंबरवरुन त्याचा तपास करण्यात आला.सदर मोबाईल नंबर त्याचे नावावर नव्हता. त्याचे मोबाईलचे कॉल डिटेल्स रेकॉर्ड वरुन त्याचे पर्यंत पोलीस पोहोचले

११) आरोपी अनिल रमेश कोल्हे वय २५ वर्ष यास अटक करण्यात आली.

१२) आरोपीतास घटने बाबत विचारपुस करण्यात आली. त्याने घटनास्थळ दाखविल्याने त्या ठिकाण चा घटनास्थळ पंचनामा करण्यात आला.

१३) आरोपीताचे रक्ताचे नमुने, पिडीताचे रक्ताचे नमुने,तसेच पिडीत बाळंतिण झाल्यानंतर तिचे बाळाचे रक्ताचे नमुने केमिकल ॲनालायझर यांचे कडे पाठवुन रक्तगट व DNA बाबत अहवाल मागविण्यात आला.

१४)केमिकल ॲनालायझर यांचा अहवाल प्राप्त केल्यानंतर त्यात आरोपी अनिल व लहान मुलाचे DNA जुळले.त्या वरुन अनिल पासुनच मनकी गरोदर असल्याचा पुरावा झाला.सिव्हिल हॉस्पिटल ठाणे येथे पिडीत मनकी ही किती टक्के मतिमंद आहे याबाबत वैद्यकीय मंडळापुढे हजर केले. वैद्यकीय मंडळाने ति ६० टक्के मतीमंद असल्याचे प्रमाणपत्र तपासी अंतलदार यांना दिले.

१५)त्या नंतर जे.जे.हॉस्पिटल, मुंबई यैथे पत्र देऊन पिडीत ६० टक्के मतिमंद आहे. त्या वरुन तिचे मानसिक वया बाबत विचारणा केली असता पिडीत मुलगी ही १५ ते १७ वर्ष दरम्यानचे मुला प्रमाणे वागते असा अभिप्राय मिळाले.

१६) पिडीताचे मानसिक वयावरुन गुन्हयास आरोपी विरुद्ध बालकांचे लैंगिक अपराधा पासुन संरक्षण अधिनियम सन २०१२ चा कायदा लावण्यात आला.व दोषारोप पत्र पाठविण्यात आले.

११) दोषारोप क्रमांक :- १९ / २००९ दिनांक :- १० / ०७ / २००९

**कोर्टाचा निकाल** :- मा.न्यायालय यांनी आरोपी अनिल रमेश कोल्हे यास पिडीत मुलगी ही, मानसिक दृष्टया विकलांग होती व त्याचा फायदा आरोपीने घेतला आहे म्हणुन त्यास दोषी ठरवुन जन्मठेपेसह दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

**पुराव्याचे स्वरूप :-**

१ ) साक्षिदार / तोंडी पुरावा Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब

फिर्याद :- सोन्या पागा कोरडे यांनी दिलेली.

फिर्यादींचे घरात राहणारे यांचेकडे चौकशी करून, त्यांचे नोंदविलेले जबाब.

घटनास्थळाचा केलेला पंचनामा.

२) कागदपत्रीय पुरावा.

१) साक्षिदारांचे जबाब. २) सोनोग्राफी अहवाल.३) आरोपी वापरत असलेल्या मोबाईलचे कॉल डिटेल्स रेकॉर्ड ४) आरोपीताचे रक्ताचे नमुने, पिडीताचे रक्ताचे नमुने, तसेच पिडीताने जन्म दिलेल्या बाळाचे रक्ताचे नमुन्या वरुन आलेला DNA अहवाल ५) पिडीत मुलगी मतीमंद असल्याचे प्रमाणपत्र. ६) पिडीत मुलीचे मानसिक वयाचे प्रमाणपत्र.

३) इतर पुरावे. :- कॅलेंडर ऑफ इव्हीडंस ( आरोपीताचा पुरावा तक्ता )

| अक्र | आरोपीताचे नाव | आरोपीचा गुन्हयातील सहभाग / कृती | आरोपी विरूद्ध पुरावा |
|---|---|---|---|
| १ | अनिल रमेश कोल्हे | कुमारी मनकी ही मतिमंद आहे हे माहीत असतांना आरोपी अनिल रमेश कोल्हे वय २५ वर्ष रा. सिध्दार्थ नगर, कसारा, शहापुर, जि.ठाणे याने तिचे मतिमंद असल्याचा फायदा घेऊन तिच्या संमतिशिवाय तिच्यावर बलात्कार केला. | १. आरोपीचे मोबाईलचे CDR रिर्पोट<br>२. DNA आलेला अहवाल.<br>३. पिडीत मुलगी मतीमंद असल्याचे प्रमाणपत्र.<br>४.पिडीत मुलीचे मानसिक वयाचे प्रमाणपत्र. |

## गुन्हयाची सुनावणी प्रक्रीया :-

फिर्यादी :- सोन्या पागा कोरडे यांची साक्ष महत्तवाची ठरली.

फिर्यादींचे घरातील लोकांचे जबाब हे फिर्यादीचे बाजुने पुरक ठरले.

पिडीत ज्या ठिकाणी जात होती त्या ठिकाणी लोकांना विचारपुस करुन नोंदविलेले जबाब.

घटनास्थळाचा केलेला पंचनाम्यातील पंच

VDO कॉन्फरन्सीद्वारे पिडीत मुलीचा नोंदविण्यात आलेला जबाब.

पिडीत मुलीची सोनोग्राफी करणारे डॉक्टर

गुन्हा दाखल करणारे पोलीस ठाणे अंमलदार

पोलीस तपासी अंमलदार पोलीस निरीक्षक श्री.बी.एन.शिंदे.

## तपासातील उणीवा दुर करण्यासाठी / मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना.

**पिडीत मुलीचे वय १९ वर्ष आहे. तिच्या संमतीने आरोपीताने तिच्याशी संभोग केला आहे.त्याने कोणतीही बळजबरी केलेली नाही.**

**उपाय :-** पोलीस तपासी अंमलदाराने पिडीताचे मानसिक वयाबाबत वैद्येकीय मंडळा कडुन घेतलेले प्रमाणपत्रामुळे पिडीत ही १५ ते १७ वर्षाच्या मुलां प्रमाणे वागते असा अभिप्राय मिळाला. तसेच तिची बौद्धिक पातळी ही १२ वर्ष वयाची असल्याचे प्रमाणपत्र जे.जे.हॉस्पिटल, मुंबई यांचे कडुन प्राप्त करुन घेतले.

**आरोपी हा अज्ञात होता. तसेच सदर गुन्हयातील पिडीत ही मतिमंद होती. तिचा स्वभाग रागिट होता.**

**उपाय :-** पिडीत ही मतिमंद असल्याने ति लोकल रेल्वेने व मुंबइ नाशिक हायवेने कोठेही फिरत असल्याने तपासी अंमलदार यांनी त्या त्या ठिकाणी जाऊन लोकांशी संवाद साधला. पिडीत मुली कडुन कौशल्य वापरुन आरोपीताचा मोबाईल नंबर हस्तगत करुन आरोपीताची माहीती काढली.व आरोपीतास अटक करुन त्याचे विरुद्ध लैंगिक अपराधापासुन बालकांचे संरक्षण अधिनियम सन २०१२ चे कलम ३ सह कलम लावुन आरोपीतास शिक्षा मिळवुन आणली.

**तपासातील महत्त्वाचे मुद्दे / सबळ मुद्दे**

१. सुरुवातीस अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल होऊनही तपासी अंमलदाराने STD बुध वरुन तपास सुरु केला.

२. आरोपीताचे मोबाईलचा CDR अहवाल मा.न्यायालयाने मान्य केला.

३. पिडीत मुलीचे वय १९ वर्ष असले तरी, ती १५ ते १७ वर्षाच्या मुलां प्रमाणे वागते असा अभिप्राय सिव्हिल हॉसिपटचे वैद्यकीय मंडळा कडुन मिळाला. तसेच तिची बौद्धिक पातळी ही १२ वर्ष वयाची असल्याचे प्रमाणपत्र जे.जे.हॉस्पिटल, मुंबई यांचे कडुन मिळाल्याने मा.न्यायालयाने ती मतीमंद असल्याने तिची बलात्कारासाठी संमती नव्ही असे ग्राहय धरले म्हणुन आरोपीतास शिक्षा झाली.

४. पिडीत कु.मनकी ही मतिमंद होती. ती गरोदर राहील्या नंतर तिने एका बाळास जन्म दिला. त्या बाळाचे रक्त आणि आरोपीताचे रक्ताचे नमुने DNA तपासणी साठी पाठविण्यात आले.त्यांचा रक्तगट एकच आला.त्यामुळे आरोपी हाच बाळाचा पिता असल्याचे निष्पण्ण झाले.

**तपासाचे विश्लेषण :-** तपास :-

१) पिडीत मुलीची केलली सोनोग्राफीचे कागदपत्रे हस्तगत केली.

२) साक्षिदारांचे जबाब नोंदविण्यात आले.

३) पिडीत ज्या ठिकाणी जात होती त्या ठिकाणी लोकांना विचारपुस करुन नोंदविलेले जबाब.

४) VDO कॉन्फरन्सीद्वारे पिडीत मुलीचा नोंदविण्यात आलेला जबाब.

५) आरोपी वापरत असलेल्या मोबाईलचे कॉल डिटेल्स रेकॉर्ड काढण्यात येऊन त्यास अटक करण्यात आली.

६) गुन्हयाचे घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.

७) आरोपीताचे रक्ताचे नमुने, पिडीताचे रक्ताचे नमुने, तसेच पिडीताने जन्म दिलेल्या बाळाचे रक्ताचे नमुन्या वरुन DNA आलेला अहवाल मागविण्यात आला.

८) पिडीत मुलगी मतीमंद असल्याचे प्रमाणपत्र सिव्हिल हॉस्पिटलचे वैद्यकीय मंडळा कडुन घेण्यात आले.

९) पिडीत मुलीचे मानसिक वयाचे प्रमाणपत्र जे.जे.हॉसिपटल, मुंबई यांचे कडुन प्राप्त करुन घेतले

# गुन्हयाचा प्रकार :- रात्री घरफोडी

**पोलीस स्टेशन :-** **शिवाजी नगर पोलीस स्टेशन**

**तालुका :- बीड** **जिल्हा :- बीड**

**तपासी अंमलदार :-**

**१) पोलीस उप निरीक्षक श्री.बी.एस.वाकडकर**

## गुन्हयाची प्राथमिक माहीती :-

१७) पोलीस स्टेशन :- शिवाजी नगर, पोलीस ठाणे, बीड
गुरनं. ३६ /२००९ ,भादविक.४५७, ३८०

२) फिर्यादी :- गणेश जनार्दन डोके वय ४८ वर्ष धंदा किराणा दुकान रा. १९, विदयानगर,बीड

३) आरोपी :- १) तक्षक मारोती डांगे वय २५ वर्ष रा.मोंढा नाका, बीड

२) ईस्माईल शेख वय १९ वर्ष रा. परभणी

४) पिडीत :- गणेश जनार्दन डोके वय ४८ वर्ष धंदा किराणा दुकान रा.१९ विदयानगर, बीड

५) अ.घ.ता.वे. :- दिनांक ०७/०५/२००९ रोजीचे २३ : ३० वा ते दिनांक ०८/०५/२००९ चे पहाटे ०५ : ३० वा.चे दरम्यान.

ठिकाण :- .विदयानगर,बीड

६) थोडक्यात हकीकत :- यातील फिर्यादी गणेश जनार्दन डोके हे दिनांक ०७/०५/२००९ रोजी घरातील सर्व कामे आटोपुन रात्री झोपी गेले.दिनांक ०८/०५/२००९ रोजी पहाटै ०५:३० वा.ते नेहमी प्रमाणे उठले असता, त्यांना त्यांचे घराचे दार उघडे दिसले. त्यांनी घरात जाऊन पाहीले असता, घरातील सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले होते.कपाटात ठेवलेले सोन्याचे लॉकेट, अंगठी, व गंठण तसेच टि.व्ही. असा एकुण ९०,०००/- रुपये किंमतीचा मुद्येमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने कुलुप उचकटुन घरात प्रवेश करुन घरफोडी चोरी करुन चोरुन नेला.

७) दोषारोप क्रमांक :- १९ /२००९ , दिनांक :- १० / ०७ /२००९

८)  **कोर्टाचा निकाल** :- १ ) मा.न्यायालय, बीड यांनी आरोपी १) तक्षक मारोती डांगे २) ईस्माईल शेख यांना घरफोडीच्या गुन्हयात ०४ वर्ष सश्रम कारावासाची व ३०००/- रूपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

## तक्रार / फिर्यादीची थोडक्यात हकीकत :-

यातील फिर्यादी गणेश जनार्दन डोके हे दिनांक ०७/०५/२००९ रोजी रात्री २३:३० वा. सर्व घरातील सर्व कामे आटोपुन, गप्पा टप्पा करुन , घरास कुलुप लावुन कुंटुंबासह घरा समोरील अंगणात झोपले होते. रोजच्या सवई प्रमाणे फिर्यादी दिनांक ०८/०५/२००९ रोजी पहाटै ०५:३० वा.ते उठले असता, त्यांना त्यांचे घराचे दार उघडे दिसले. त्यांनी घरात जाऊन पाहीले असता, घरातील सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले होते.बेडरुम सामान ही अस्ताव्यस्त पडलेले होते. एका कोप-यात ठेवलेले कपाटही उघडे दिसले. जवळ जावुन पाहीले असता कपाटाचे दाराचे कुलुप तोडुन, कपाटात ठेवलेले सोन्याचे लॉकेट, अंगठी, व गंठण तसेच टि.व्ही. असा एकुण ९०,०००/- रुपये किंमतीचा मुद्येमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने कुलुप उचकटुन घरात प्रवेश करुन घरफोडी चोरी करुन चोरुन नेले.

## तपासाचा आराखडा / क्रमवारी :-

१) घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला

**२)** घटनास्थळावर तात्काळ डॉग स्कॉड व फिंगर प्रिंट एक्सपर्ट यांना पाचारण केले. फिर्यादीने घटनास्थळावर मिळालेले आरोपीताचे हाताचे ठसे घेण्यात आले.

३) लॅब्रॉडार डॉगला घटनास्थळावर मिळालेले रॉड व विडीच्या थोटकाचा वास देण्यात आला. डॉग ने दाखविलेल्या मार्गावरुन आरोपीतांचा शोध घेतला.डॉग घराच्या पाठी मागे असलेल्या वॉल कंपाउंडवरुन उडी मारुन रस्त्यावर जाऊन तिथेच थांबला.या वरुन चोरटयांनी घरफोडी चोरी करुन अज्ञात वाहना वरुन पळुन गेले.

४) घटनास्थळा वरुन मिळुन आलेले पुरावे - बिडीचे थोटके, पाण्याची बाटली, रॉड,इ. वस्तु स्वतंत्रपणे पॅकींग करुन त्यावर लाखेचे सिल करुन त्यावर पंचाच्या सहीच्या चिठठया लावुन तपासकामी ताब्यात घेण्यात आले.

५) फिर्यादी चे घरातील सदस्य व शेजारी राहणारे यांना विचारपुस करुन जबाब नोंदविण्यात आले. कोणीही गुन्हेगारांना पाहीले नसल्याचे सांगितले.

६) तपास करीत असतांना एका अज्ञात इसमाने नाव न सांगण्याचे अटीवर फोन करुन माहीती दिली कि, फिर्यादीच्या घराच्या पाठीमागे राहत असलेल्या पिंकु राठी नावाच्या एका १३ वर्षाच्या मुलीने आरोपींना पाहीलेले आहे.परंतु पोलीसांच्या भिंतीमुळे व घरातल्या मोठया लोकांच्या दडपणामुळे ती पोलीसांना माहीती देत नाही.

७) सदर माहीती मिळाल्याने साध्या कपडयात एका महीला पोलीस कर्मचारी सोबत घेवुन पिंकु राठीचे घरी गेले.तेथे त्यांना कोणतीही माहीती नसल्याचे सांगितले.परंतु त्यांचे किंवा त्यांचे मुलीचे कोठेही नाव येणार नाही,कोणालाही कळणार नाही, याची खात्री पटवुन शेजारधर्म व प्रकरणाचे गांभिर्य या बाबत जाणिव करुन दिल्या नंतर पिंकु राठी या मुलीने माहीती दिली कि, डोके मामाच्या घराच्या मागच्या रस्त्यावर दोन माणसे मोटर सायकलवर टि.व्ही.घेऊन मोटर सायकल चालु करुन निघुन गेले.व आरोपीतांचे वर्णन सांगितले.

८) पोलीस स्टेशनला जावुन हिस्ट्रीशिट मध्ये व आरोपीतांचे फोटोज वरुन माहीती घेतली. वर्णनाच्या आधारे दोन संशयीत इसमांना तपासले.

९) फिंगरप्रिंट एक्सपर्टचा अहवाला वरुन सदर घरफोडी करणारे आरोपी हे नवखे असल्याचे लक्षात आले.

१०) आरोपी नवखे असल्याने त्यांचे विरुदध आणखी पुरावा सापडतो का म्हणुन आरोपीतांनी फिर्यादीच्या घराच्या पाठीमागील वॉल कंपाउंड वरुन उडी मारुन गेले होते त्या ठिकाणी दोन पंचा समक्ष पुन्हा एकदा भेट देवुन पाहणी केली असता त्या ठिकाणी एका पाकीटात इस्माईल शेख वय १९ वर्ष या नावाचे ड्रायव्हींग लायसन्स, २५०/रु. व एक स्टॅम्प साईज फोटो मिळुन आला.

११) त्यावरुन आरोपीत इस्माईलचे राहते घरी जावुन शोध घेण्यात आला.परंतु तो तेथे मिळुन आला नाही.तो मोंढा येथे त्याचा मित्र तक्षक डांगे याचे कडे गेला असल्याचे त्याची आईने माहीती दिली.

१२) त्या नुसार त्याच रात्री तक्षक डांगे रा.मोंढा नाका, पेठबीड, बीड येथे छापा टाकला.आरोपी सोबत इस्माईल शेख हा सुदधा मिळुन आला.त्यांचे घराचा दोन पंचासमक्ष Cr.P.C. १०० प्रमाणे घरझडती घेण्यात आली. त्यात एक टि.व्ही.मिळुन आला.

१३) आरोपीताना अटक करुन पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली.रिमांड मध्ये असतांना त्यांनी घरफोडी केल्याचे व दागिणे दाखवुन देण्याचे कबुल केल्याने पुरावा कायदा कलम २७प्रमाणे त्यांचे निवेदन घेवुन मेमोरंडम पंचरनामा करण्यात आला.आरोपी तक्षक डांगे याने त्याचे घरात जिथे दागिणे पुरुन ठेवले होते ती जागा दाखवुन त्याने दागिणे काढुन दिले.दारा बाहेर असलेली गुन्हयात वापरलेली मोटर सायकल दाखविल्याने ती तपासकामी जप्त करण्यात आली.

१४) जप्त केलेल्या मालाचा ओळख पंचनामा करण्यात आला.फिर्यादीने दिलेल्या फिर्याद प्रमाणे त्यांचे चोरीस गेलेले सर्व दागिणे व टि.व्ही.ओळखला.

१५) दोषारोप क्रमांक :- १९ / २००९ दिनांक :- १० / ०७ / २००९

**कोर्टाचा निकाल :-**

मा.न्यायालय, बीड यांनी आरोपी १) तक्षक मारोती डांगे वय २५ वर्ष रा.मोंढा नाका, बीड व आरोपी क्रमांक २) ईस्माईल शेख वय १९ वर्ष रा. परभणी यांना ०४ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा दिली आहे.

## पुराव्याचे स्वरूप :-

१ ) साक्षिदार / तोंडी पुरावा Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब.

फिर्याद :- गणेश जनार्दन डोके यांनी दिलेली.

फिर्यादींचे घरात राहणारे, शेजारी राहणारे, यांचेकडे चौकशी करून, नोंदविलेले जबाब.

घटनास्थळाचा केलेला पंचनामा. पंचनाम्यात जप्त केलेल्या आरोपीतांचे वस्तु.

घटनास्थळी मिळुन आलेल्या आरोपीतांच्या हाताचे बोटांचे ठसे.व एका पााकीटात आरोपी इस्माईल शेख वय १९ वर्ष याचे ड्रायव्हींग लायसन्स, २५०/रु. व एक स्टॅम्प साईज फोटो.

आरोपीच्या घरी छापा टाकुन मिळालेला चोरीस गेलेल्या टि.व्ही.चा जप्ती पंचनामा.

आरोपीने भारातीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे दिलेले निवेदन, व मेमोरंडम पंचनामा.

फिर्यादीचे चोरीस गेलेल्या सोन्याचे दागिणे व टि.व्ही. या वस्तु जप्त केल्या नंतर फिर्यादीने त्याच्या वस्तु ओळखल्या त्यांचा केलेला ओळख पंचनामा.

२) कागदपत्रीय पुरावा.

साक्षिदारांचे जबाब.

३) इतर पुरावे. :- कॅलेंडर ऑफ इव्हीडंस ( आरोपीताचा पुरावा तक्ता )

| अ क्र. | आरोपीताचे नाव | आरोपीचा गुन्हयातील सहभाग / कृती | आरोपी विरूद्ध पुरावा |
|---|---|---|---|
| १<br><br>२ | तक्षक मारोती डांगे<br><br>ईस्माईल शेख | त्याचा मित्र इस्माईल शेख याचे सह संगनमताने , फिर्यादीचे राहते घरी, त्यांचे घराचे दाराचे कुलुप रॉडच्या सहाय्याने उचकटुन आत प्रवेश केला. घरातील कपाटाचे कुलुप रॉडच्या सहाय्याने उचकटुन कपाटात ठेवलेले दागिणे व बेडरुम मधिल टि.व्ही. असे फिर्यादीच्या संमती शिवाय लबाडीच्या इरादयाने घरफोडी चोरी करुन चोरुन नेले. | १. घटनास्थळी मिळुन आलेले इस्माईल शेख वय १९ वर्ष याचे ड्रायव्हींग लायसन्स,<br>२. आरोपीने भारातीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे दिलेले निवेदन, व मेमोरंडम पंचनामा.<br>३. आरोपीतांच्या ताब्यातुन जप्त केलेल्या सोन्याचे दागिणे व टि.व्ही.चा जप्ती पंचनामा. |

## गुन्हयाची सुनावणी प्रक्रीया :-

१ ) साक्षिदारांची नावे :-

फिर्याद :- गणेश जनार्दन डोके यांनी दिलेली.

फिर्यादींचे घरात राहणारे, शेजारी राहणारे, यांचे जबाब.

घटनास्थळाचे पंचनाम्यातील पंच.

आरोपीने दिलेला कबुली जबाब.

गुन्हा दाखल करणारे पोलीस ठाणे अंमलदार

पोलीस तपासी अंमलदार पोलीस उप निरीक्षक श्री.बी.एस.वाकडकर.

## तपासातील उणीवा दुर करण्यासाठी / मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना

- गुन्हा घटडल्यानंतर घटनास्थळी तपासी अंमलदार पोलीस उप निरीक्षक यांनी घटनास्थळाचा पंचनामा करण्यात केला.परंतु आरोपी ज्या मार्गाने भिंती वरुन उडी मारुन गेले.तेथे पुन्हा दोन पंचा समक्ष जावुन घटनास्थळाचा पंचनामा करावा लागला.

- **सुचना :-** तपासी अंमलदाराने घटनास्थळाचे बारकाईने चौकस नजरेने निरीक्षण करावे. आरोपीताचा मार्ग काढत असतांना डॉग कोणकोणत्या मार्गाने जात आहे, त्या रस्त्यावरील आजु बाजुचे निरीक्षण करुन अंदाज करावा. व त्या मार्गाने तपासाची दिशा ठरवावी.व गुन्हा उघडकीस आणण्याचे दृष्टीने प्रयत्न करावेत.

- आरोपीतांना गुन्हा करते वेळेस कोणीही प्रत्यक्ष साक्षिदारांनी पाहीले नसल्याने तसेच त्यांचे अगोदरचे रेकॉर्ड नसल्यने त्या बाबत आरोपीतांची माहीती काढण्यास अडचण निर्माण होते.

- **सुचना :-** तपासी अंमलदार यांनी आपले स्वतःचे नेटवर्क / गुप्त बातमीदार तयार करावे.

## तपासातील महत्त्वाचे मुद्ये / सबळ मुद्ये

१ ) फिर्यादीचे घरात कोणीही व्यक्ती विडी पित नव्हता.घटनास्थळी मिळुन आलेले विडीचे थोटक्यांचा घटनास्थळ पंचनाम्यात उल्लेख करुन जप्त करण्यात आले.

२ ) फिर्यादीचे घराचे पाठी मागिल वॉल कंपाउंड च्या बाहेरील बाजुस मिळुन आलेले आरोपीताचे पाकीट, त्यात त्याचे ड्रायव्हिंग लायसन्स, स्टॅम्प साईज फोटो.

३) आरोपीचा भारतीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणेचे निवेदन व मेमोरंडम पंचनामा.

४ ) आरोपीताचे घरात मिळुन आलेले घरफोडी चोरीच्या गुन्हयातील सोन्याचे दागिणे, टि.व्ही. व गुन्हयात वापरलेली मोटर सायकल यांचा केलेला जप्ती पंचनामा.

५) फिर्यादीचे चोरी झालेला मालाचा त्यांनी ओळखल्याचा पंचनामा.

## तपासाचे विश्लेषण :-

सुधारण्यासाठी सुचना :-

१) रेकॉर्ड वरील घरफोडी करणारे गुन्हेगार यांचे फोटो, फिर्यादीस दाखवावे.

२) स्थानिक रेकॉर्ड वरील आरोपीतांची माहीती काढुन त्यांना वेळोवेळी चेक करावे.त्यांचे हालचालींवर गुन्हे शोध पथक मार्फत लक्ष ठेवावे.गुन्हयाचे संदर्भात त्यांचे राहते घराची झडती घेवुन घरझडती पंचनामे करावेत.

२) आरोपीतांनी घरफोडी चोरी करुन नेलेले सोन्याचे दागिणे हे कोणत्या तरी सोनाराचे दुकानात विक्री साठी आणतील, या दृष्टीकोनातुन तपासाकरीता शहरातील धर्म काटा / सराफ असोसिएशन यांना तपासी अंमलदाराने पत्र दयावे.

३) तसेच यासारखे गुन्हे नेहमी घडत असतात त्या करीता , टि.व्ही./ मोबाईल, कार टेप रिपेअरींग दुकाने, भंगार दुकाने, जुने वाहन खरेदी विक्रीचे वाहन बाजार, यांना भेटी देवुन त्यांचेशी संपर्क वाढवावा.आरोपी व गुन्हया बाबत त्यांना माहीती दयावी. आरोपी बाबत काही एक माहीती मिळाल्यास पोलीस ठाणेस किंवा तपासी अंमलदार यांचे वैयक्तिक त्यांचे मोबाईल वर कळविणेस सांगावे.

३) गुन्हा उमाळीस आणण्याचे दृष्टीने प्रयत्न करण्यासाठी गुप्त बातमीदार यांची मदत घ्यावी.

**तपास :-**

१) गुन्हयाचे घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.साक्षिदारांचे जबाब नोंदविण्यात आले.

२) गुन्हयाचे घटनास्थळी पुन्हा भेट देऊन आरोपी इस्माईल शेख याचे घटनास्थळी मिळुन आलेले ड्रायव्हिंग लायसन्स, स्टॅम्प साईल फोटो या मुळे आरोपी निष्पण्ण होऊन त्यांचे पर्यंत पोहोचता आले.

३) त्या नंतर सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन आरोपीतांना अटक करण्यात आली. आरोपीतां कडुन घरफोडी चोरीतला माल :- सोन्याचे दागिणे, टि.व्ही. जप्त करण्यात आले.

२) प्रतिबंधात्मक कारवाई :- या गुन्हयातील आरोपी नविन असल्यामुळे त्यांचे रेकॉर्ड नसल्याने प्रतिबंधात्मक कारवाई होऊ शकली नाही.

३) गुप्तवार्ता संकलन :-

गुन्हयाची उकल होण्यासाठी गुप्तबातमीदाराने फोन वरुन साक्षिदाराने आरोपीतांना टि.व्ही चोरुन घेवुन जातांना बघितल्याची माहीती दिली.

# गुन्हयाचा प्रकार :- प्राणांतिक अपघात

**पोलीस स्टेशन :-** **महात्मा फुले चौक**

**तालुका :- कल्याण** **जिल्हा :- कल्याण**

**तपासी अंमलदार :-**

**१) सहा.पोलीस निरीक्षक श्री.आर.एस.महीरे**

## गुन्हयाची प्राथमिक माहीती :-

१८) पोलीस स्टेशन :- महात्मा फुले चौक पोलीस ठाणे, कल्याण.
गुरनं. ३२६ /२०१२ , भादविक.३०४ अ, २७९, ३३८,
मोटर वाहन कायदा कलम १३४

२) फिर्यादी :- रुपेश तुळशीराम घरत वय २८ वर्ष

३) आरोपी :- कार नंबर MH-04-CD-1452 वरील चालक नामे राजाराम सखाराम भोईर वय ३५ वर्ष, रा.कांताई बंगला, गौरी पाडा तलाव, कल्याण, जि.ठाणे.

४) पिडीत :- कृष्णा शंकर जायभावे वय ३० वर्ष

५) अ.घ.ता.वे. :- दिनांक ०५/१०/२०१२ रोजी १५ : ३० वा

ठिकाण :- मुरबाड रोड ते बिर्ला कॉलेज रोडवर, सर्कल जवळ,कल्याण.

६) थोडक्यात हकीकत :- यातील फिर्यादी हे त्यांचे मोटर सायकल क्रमांक MH-05- AB-1617 वर मुरबाड रोडने कल्याण कडुन शहाडच्या दिशेने जात असतांना निळया रंगाच्या मारुती कार नं. MH-04-CD-1452 वर हीचे वरील चालकाने, बिर्ला कॉलेज रोडने येऊन वेगाने कल्याण कडे जात असतांना सर्कलला वळसा मारुन न जाता सरळ कल्याणच्या दिशेने वळण घोल्याने सदर मोटर सायकलला घेऊन जोराची धडक मारुन अपघात केला.अपघातात मोटर सायकल स्वार चालक कृष्णा शंकर जायभावे यांचे मरणास व मोटर सायकलवर मागे बसलेले इसम नामे रुपेश तुळशीराम घरत यांचे उजवे हाताचे जबर दुखापतीस कारणीभुत होउन अपघाताची खबर न देता पळुन गेला म्हणुन गुन्हा.

७) दोषारोप क्रमांक :- /२०१२ , दिनांक :- ०३ /११ /२०१२

८) **कोर्टाचा निकाल** :- १ ) मा.न्यायालयाने यांनी आरोपी राजाराम सखाराम भोईर यास २ वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

## तक्रार / फिर्यादीची थोडक्यात हकीकत :-

यातील फिर्यादी रुपेश तुळशीराम घरत हे त्यांचा मयत मित्र कृष्णा शंकर जायभावे याचे सह त्यांचे मोटर सायकल क्र. MH-05- AB-1617 वर कल्याण कडुन मुरबाड रोडने शहाडच्या दिशेने जात होते. मोटर सायकल कृष्णा जायभावे हा चालवित होता. मोटर सायकल बिर्ला रोडवरील सर्कल जवळ आली असता मारुती कार नं. MH-04-CD-1452 वर हीचे वरील चालकाने, बिर्ला कॉलेज रोडने येऊन वेगाने कल्याण कडे जात असतांना सर्कलला वळसा मारुन न जाता सरळ कल्याणच्या दिशेने वळण घेऊन फिर्यादीचे मोटर सायकलला जोराची ठोस मारुन अपघात केला. अपघाता नंतर मोटर सायकल चालक व मागे बसलेले फिर्यादी हे रस्त्यावर खाली पडले. त्यामुळे मोटर सायकल चालक कृष्णा शंकर जायभावे यांचे डोक्यावरुन कारचे चाक जाऊन उपचारा दरम्यान ते मयत झाले तसेच फिर्यादीचे उजव्या हातावरुन कारचे चाक गेल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली. कार चालक आरोपी याने कृष्णा शंकर जायभावे यांचे मरणास , फिर्यादी यांचे उजव्या हाताचे गंभीर दुखापतीस कारणीभुत होऊन अपघाताची खबर न देता पळुन गेला.

## तपासाचा आराखडा / क्रमवारी :-

११) अपघातात जखमी मोटर सायकल चालक व मागे बसलेले साक्षिदार यांना लागलीच रुक्मीनीबाई रुग्णालय येथे उपस्थित लोकांच्या मदतीने उपचारासाठी दाखल केले.

१२) पोलीस हेड कॉन्स्टेबल कोळी यांनी अपघाताची खबर दिल्याने मोटर अपघात रजिस्टर नंबर ४५/१२ अन्वये नोंद घेऊन मोटर अपघाताची चौकशी करण्या कामी पोलीस ठाणे अंमलदार यांनी पो.हवा.कोळी यांना आदेश दिला.पो.हवा.कोळी यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला.

१३) घटनास्थळावरुन पळुन गेलेल्या कारचे फ्रंट ग्लास, हेडलाईटचे तुकडै, कारचे रंगाचे तुकडे, असे वेगवेगळया प्लॅस्टीकच्या पिशवीत नमुने घेण्यात आले.रस्त्यावर पडलेल्या रक्तामध्ये मोटर सायकल चालकाचे केस आढळुन आले असल्याने तेथील रक्त व रक्त मिस्त्रीत केस वेगवेगळया पिशव्यां मध्ये घेण्यात आले.

१४) मोटर सायकीलवर मागे बसलेला फिर्यादीचे हातावरुन कारचे चाक गेल्याने त्याचे अंगावरील शर्टाचे बाहीचे तंतु रक्ता मध्ये आढळुन आल्याने रक्तमिस्त्रीत कापडाचे तंतु घेण्यात येऊन वेगवेगळया पिशव्यां मध्ये घेऊन पंच व पोलीसांचे सहयांचे लेबल लावले.

१५) घटनास्थळावर प्रत्यक्ष हजर असलेले साक्षिदारांचे जबाब नोंदविले.

१६) दरम्यान उपचार घेत असतांना मोटर सायकल चालक कृष्णा शंकर जायभावे हा मयत झाल्याने त्याचे दिसते शरीर परिस्थितीचा इंन्कवेस्ट पंचनामा करण्यात आला.पोस्टमार्टम करणारे डॉक्टर यांचे कडुन पोस्ट मार्टम नोटस हस्तगत केली.

१७) जखमी रुपेश तुळशीराम घरत यांचा जबाब नोंदवुन त्यांनी कारचालका विरुद्ध तक्रार दिल्याने गुन्हा दाखल करण्यात येऊन गुन्हयाचा तपास सहा.पोलीस निरीक्षक महीरे यांचे कडेस देण्यात आला.

१८) गुन्हयातील पळुन गेलेल्या मारुती कार नं. MH-04-CD-1452 चा शोध घेण्यात आला.कारचालक
व मालक राजाराम सखाराम भोईर हे मिळुन आल्याने फोटोग्राफर यांना बोलावुन नमुद कारचे स्टेअरींगचे फोटो घेऊन ते डेव्हलप करुन घेतले.

१९) फिंगर प्रिंट एक्सपर्ट यांना बोलावुन आरोपीच्या त्यांचे हाताचे ठसे घेण्यात आले.

२०) कारचे चाकांचे निरीक्षण करुन कारचे फोटो घेण्यात आले.

२१) आरोपी व नमुद कार ही महात्मा पोलीस ठाण्यास आणले.आरोपीला सदर गुन्हयात अटक करण्यात येऊन मा.न्यायालयात हजर करण्यात आले.न्यायालयने आरोपीतास जामिनावर सोडले.

२२) प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कडुन कारची तांत्रिक तपासणी करुन सर्टिफिकेट घेण्यात आले.

२३) कारचे फुटलेल्या काचा, रंग, तुकडे इतर जप्त केलेल्या वस्तु रासायणिक परिक्षक यांचे कडे पाठविण्यात येऊन अहवाल प्राप्त करुन घेतला.

२४) फिर्यादीने विमा कंपनीविरुद्ध दावा दाखल केल्याने त्यांना सर्व आवश्यक कागदपत्रे देण्यात आली.

२५) आरोपी कृष्णा जायभावे याचे विरुद्ध पुरावा झाल्याने कोर्टात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले.

१६) दोषारोप क्रमांक :- १९ / २००९ दिनांक :- १० / ०७ / २००९

**कोर्टाचा निकाल** :- १ ) मा.न्यायालयाने यांनी आरोपी राजाराम सखाराम भोईर यास २ वर्ष कारावासाची

शिक्षा सुनावली आहे.

## पुराव्याचे स्वरूप :-

१ ) साक्षिदार / तोंडी पुरावा Cr.P.C. १६४ प्रमाणे जबाब.

फिर्याद :- :- रुपेश तुळशीराम घरत यांनी दिलेली.

घटनास्थळावर हजर असलेले प्रत्यक्ष साक्षिदार यांचे जबाब.

घटनास्थळी पंचनाम्यात जप्त केलेल्या वस्तु सी.ए.साठी घेऊन जाणारे पोकॉ / परब यांचा जबाब.

अपघात करणारे कारचे फोटो घेणारे फोटोग्राफर यांचा जबाब.

२) कागदपत्रीय पुरावा.

१) घटनास्थळ पंचनामा.
२) इन्कवेस्ट पंचनामा.
३) जप्ती पंचनामा.
४) पोस्ट मार्टम नोट्स
५) कारचे स्टेअरींग चे फोटो.

३) हस्ताक्षर तज्ञ अहवाल :-

१) कार चालक आरोपी याचे बोटांचे ठसे व कार चे स्टेअरीग वर असलेले बोटांचे ठसे घेण्यात आले. ते आरोपीचेच असल्याचा अहवाल प्राप्त झाला.

३) इतर पुरावे. :- कॅलेंडर ऑफ इव्हीडंस ( आरोपीताचा पुरावा तक्ता )

| अ क्र. | आरोपीताचे नाव | आरोपीचा गुन्हयातील सहभाग / कृती | आरोपी विरूद्ध पुरावा |
|---|---|---|---|
| १ | राजाराम सखाराम भोईर | आरोपी कार चालक राजाराम सखाराम भोईर याने मारुती कार नं. MH-04-CD-1452 ही बिर्ला कॉलेज रोडने वेगाने येऊन कल्याण कडे सर्कलला वळसा मारुन न जाता सरळ कल्याणच्या दिशेने वळण घेऊन फिर्यादीचे मोटर सायकलला जोराची ठोस मारुन अपघात करुन मोटर सायकल चालक कृष्णा शंकर जायभावे यांचे मरणास व फिर्यादीचे गंभीर दुखापतीस व मोटर सायकलचे नुकसानीस कारणीभुत होऊन अपघाताची खबर न देता पळुन गेला. | १. प्रत्यक्षदर्शी यांचे जबाब.<br>२. घटनास्थळ पंचनामा.<br>३. अपघातामुळे कारला झालेले नुकसानीचे फोटो.<br>४.आरोपीताचे हाताचे ठसे. |

## गुन्हयाची सुनावणी प्रक्रीया :-

१ ) साक्षिदारांची नावे :-

फिर्याद :- रुपेश तुळशीराम घरत यांनी दिलेली.

प्रत्यक्षदर्शी यांचे जबाब.

घटनास्थळाचे पंचनाम्यातील पंच.

इन्कवेस्ट पंचनाम्यातील पंच.

घटनास्थळावरील जप्त कारचे तुकडे, रक्त यांचा केलेल्या पंचनाम्यातील पंच.

फौटोग्राफरचा जबाब.

प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचा अपघातग्रस्त कारचा अहवाल.

कारचे तुकडे,फुटलेल्या काचा, रक्त यांचा रासयनिक तज्ञांचा अहवाल.

गुन्हा दाखल करणारे पोलीस ठाणे अंमलदार.

मोटर अपघाताचा तपास करणारे पो.हवा.कोळी.

पोलीस तपासी अंमलदार सहा.पोलीस निरीक्षक श्री.आर.एस.महिरे.

## तपासातील उणीवा दुर करण्यासाठी / मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना

- गुन्हा घटडल्यानंतर घटनास्थळावरुन अपघात करणारी कार चालक ही घेऊन निघुन गला.

**उपाय :-** प्रत्यक्षदर्शी साक्षिदार यांचे तात्काळ जबाब नोंदवुन निघुन गेलेल्या कारचा प्रादेशिक परिवहन कार्यालया कडुन नांव व पत्ता काढुन आरापीचा शोध घेण्यात आला.

## तपासातील महत्त्वाचे मुद्ये / सबळ मुद्ये

**१ ) फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षिदार यांच्या साक्षी चांगल्या झ्राल्या.**

**२ ) घटनास्थळाचा पंचनामा व अपघाता संदर्भात जप्त केलेल्या कारचे फुटलेल्या काचा, रंग, मतयाचे व पिडीताचे सांडलेले रक्त, केस असे रासायणिक विष्लेशनासाठी पाठवुन व त्यांचा अहवाल प्राप्त करुन घेतला.**

**३) अपघात केलेल्या कारचे स्टेअरींगचे घेतलेले फोटा.**

**४ ) आरोपीताचे बोटांचे घेतलेले ठसे.**

**५) मयताचे पोस्टमार्टम करणारे वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष व त्यांनी दिलेली पोस्ट मार्टम नोटस.**

**६) जखमीवर उपचार करणारे वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष व त्यांनी तयार केलेले सर्टिफिकेट.**

**७) फोटोग्राफर यांनी कारचे स्टेअरींचे घेतलेले घेतलेले फोटो.**

**८) प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचा अपघात करणारे कार बाबतचा अहवाल.**

**९) फिंगरप्रिंट एक्सपर्ट यांचा अहवाल.**

## तपासाचे विश्लेषण :-

सुधारण्यासाठी सुचना :-

१) गुन्हयाचे घटनास्थळी पोहोचुन जखमींना तात्काळ हॉस्पिटल मध्ये दाखल करावे.

२) रस्त्यावरील वाहतुक सुरळीत करावी. आवश्यक वाटल्यास वाहतुक शाखे कडील क्रेनचा उपयोग करावा.

३) पोलीस ठाण्यास तात्काळ खबर देऊन मोटर अपघात रजिस्टरी दाखल करावा.

४) गुन्हयाचे घटनास्थळी हजर असलेले प्रत्यक्ष साक्षिदार यांना विचारपुस करुन त्यांचे जबाब नोंदवुन घ्यावे.

५) जखमी बोलण्याचे स्थितीत असल्यास त्यांचा जबाब नोंदवुन जबाबदार वाहन चालकाचे विरुद्ध गुन्हा दाखल करावा.

६) जबाबदार वाहनाचे मालकाचा नाव व पत्ता शोधण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयास पत्र देवुन माहीती काढण्यात यावी.

**तपास :-**

१) गुन्हयाचे घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.प्रत्यक्ष साक्षिदारांचे जबाब नोंदविण्यात आले.

२) गुन्हयाचे घटनास्थळा वरील अपघात करणारे कारचे काचा , हेडलाईटचे तुकडै, कारचे रंगाचे तुकडे, असे वेगवेगळया प्लॅस्टीकच्या पिशवीत नमुने घेण्यात आले.रस्त्यावर पडलेल्या रक्तामध्ये मोटर सायकल चालकाचे केस आढळुन आले असल्याने तेथील रक्त व रक्त मिस्त्रीत केस वेगवेगळया पिशव्यां मध्ये घेवुन त्यांचा रासायणिक विश्लषण अहवाल प्राप्त करुन घेण्यात आला.

३) जखमीस विचारपुस करुन त्यांचा जबाब नोंदवुन गुन्हा दाखील करण्यात आला.

४) प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडुन कारचालाकाचा पत्ता काढुन आरोपीतांना अटक करण्यात आली.

५) आरोपीतास अटक करण्यात येवुन दोषारेप पत्र सादर करण्यात आले.

प्रतिबंधात्मक कारवाई :-

गुप्तवार्ता संकलन :-